ऑनलाइन आवृत्ती

चीनचे स्वप्न आणि
क्षी जिनपिंग यांचा अजेंडा
इंटरनेटवर नियंत्रण

सतीश बागल

संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
२५ जुलै २०२०
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४४)

# झुंडीचे मानसशास्त्र

## वैफल्याकडून सामंजस्याकडे घेऊन जाणारे पुस्तक

संपादकीय











ल बाँ


एरिक हॉपर


विश्वास पाटील

३० जुलै पासून
उपलब्ध




एका विचारप्रवर्तक पुस्तकाची

**नवी आवृत्ती**

# झुंडीचे मानसशास्त्र

## विश्वास पाटील

'नवी क्षितिजे'कार

पृष्ठे ३२६ (हार्ड बाऊंड)
किंमत ३५० रुपये । सवलतीत २५० रुपये
(ट.ख. ५० रुपये वेगळा)

१९७८ मध्ये या पुस्तकाची पहिली आवृत्ती
जनपद प्रकाशन, मुंबई यांच्याकडून आली.
दुसरी विस्तारित आवृत्ती २००० मध्ये
प्रभात प्रकाशन, मुंबई यांच्याकडून आली.
आणि आता तिसरी आवृत्ती
साधना प्रकशनाकडून आली आहे.

झुंडीचे मानसशास्त्र अवगत असणे,
ही गोष्ट अनेक लोकांच्या दृष्टीने फायद्याची असते.
जगातील मोठमोठे कर्तबगार पुरुष, धर्मप्रवर्तक,
साम्राज्यांचे संस्थापक, भिन्न-भिन्न विचारसरणींचे
निष्ठावंत अनुयायी, प्रसिद्ध राजकारणपटू
हे सर्वजण प्रच्छन्न मानसविशारद होते.
झुंडींची मानसिक जडण-घडण कशी असते,
हे या सर्वांना जणू जन्मत: कळते.
या उपजत आणि अचूक ज्ञानाच्या जोरावरच
ही मंडळी स्वत:चे श्रेष्ठत्व प्रस्थापित करू शकतात.
झुंडीचे मानसशास्त्र अवगत असणे, ही गोष्ट
राजकारणामध्ये पुढारीपण करू इच्छिणाऱ्यांना
निकडीची होऊन बसली आहे. हे ज्ञान असेल,
तरच झुंडींवर ताबा चालवता येणे शक्य असते.
अर्थात, ही गोष्ट वाटते तितकी सोपी नसते.
तथापि, हे ज्ञान असेल तर निदान ती व्यक्ती
झुंडीच्या आहारी तरी जात नाही.

संपर्क
**साधना प्रकाशन**
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
Ph. 020 24459635
mediasadhan@gmail.com

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
२५ जुलै २०२०
वर्ष ७२ / अंक - ४९
संपादक :
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्त्रबुद्धे**
अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

‘साधना’ हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 /**
**Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635
वार्षिक वर्गणी :
**एक वर्षांसाठी : ८०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १६०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २४०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक ‘साधना साप्ताहिक’ या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र .६००२५५८६६३४, खत्रह्उ चअक्ह 000000१, **बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रम

४ । संपादकीय
**वैफल्याकडून सामंजस्याकडे घेऊन जाणारे पुस्तक**

७ । **हमाम में सभी नंगे है!**
सुरेश खैरनार

११ । **चीनचे स्वप्न आणि क्षी जिनपिंग यांचा अजेंडा इंटरनेटवर नियंत्रण**
सतीश बागल

१७ । **गंगारामभाऊ म्हस्के : मराठ्यांचा ‘अलक्षित’ महानायक**
दिनेश पाटील

२२ । **जे मजला वेड लागले!**
संजीवनी खेर

२६ । **उदरभरण नोहे! फूड इनकॉर्पोरेशन डॉक्युमेंटरी**
नीलांबरी जोशी

३० । **अभ्यासोनि प्रकटावे**
अपर्णा दीक्षित

३५ । **स्थलांतरित कामगार आणि अर्थव्यवस्था**
छाया दातार

४१ । **प्रतिसाद**
अरुण वि.कुकडे, प्रभा पुरोहित, वंदना साबळे

## संपादकीय

# वैफल्याकडून सामंजस्याकडे घेऊन जाणारे पुस्तक...

लेखनाच्या क्षेत्रात विश्वास पाटील हे नाव ऐकले की मराठी वाचकांना कादंबरीकार विश्वास पाटील आठवतात. कारण मागील तीस वर्षांत, समाजमनाला भिडणाऱ्या विविध विषयांवरील त्यांच्या डझनभर कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत, त्या सर्वच कमी-अधिक प्रमाणात लोकप्रिय झाल्या आहेत. मात्र लेखनाच्या क्षेत्रात तुलनेने छोट्या वर्तुळात माहीत असलेले दुसरे एक विश्वास पाटील (१९३० ते २००२) दोन दशकांपर्यंत होते, त्यांना 'नवी क्षितिजे'कार असे संबोधले जात असे. त्यांनी १९७० नंतरच्या दोन दशकांत 'नवी क्षितिजे' या त्रैमासिकाचे संपादन (नाना जोशी यांच्या साथीने) केले. गहन व गंभीर विषय त्या नियतकालिकातून हाताळले जात असत. त्यातून आणि त्या काळातील काही अन्य नियतकालिकांतून विश्वास पाटील यांनी मोठा आवाका असणारे व दीर्घ पल्ल्याचे म्हणावे असे बरेच वैचारिक लेखन केले. त्यातून आकाराला आलेली डझनभर पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. त्यातील सर्वांत जास्त लक्षवेधी ठरलेले पुस्तक म्हणजे 'झुंडीचे मानसशास्त्र'. १९७८ मध्ये ते सर्वप्रथम (जनपद प्रकाशन, मुंबई यांच्याकडून) प्रकाशित झाले. त्याची दुसरी सुधारित व विस्तारित आवृत्ती २००० मध्ये (प्रभात प्रकाशन, मुंबई यांच्याकडून) प्रकाशित झाली. त्याच पुस्तकाची तिसरी आवृत्ती पुढील आठवड्यात साधना प्रकाशनाकडून येत आहे.

'झुंडीचे मानसशास्त्र' हे मराठी पुस्तक दोन अन्य पुस्तकांवर आधारलेले आहे. त्यातील पहिले 'द क्राऊड हे ल बाँ' (The Crowd : Le Bon) या फ्रेंच लेखकाचे १८९५ मध्ये मूळ फ्रेंच भाषेत आणि नंतर इंग्लिशमध्ये आलेले पुस्तक. आणि दुसरे, 'ट्रू बिलिव्हर हे एरिक हॉफर' (True Believer : Eric Hoffer) या अमेरिकन लेखकाचे १९५५ मध्ये आलेले इंग्लिश पुस्तक. या दोन्ही पुस्तकांतील विवेचन, विश्लेषण व भाष्य हे सर्व 'झुंडीचे मानसशास्त्र' या पुस्तकात आले आहे. पण 'झुंडीचे मानसशास्त्र' हे पुस्तक त्या दोन्हींचे शब्दशः भाषांतर तर नाहीच, पण अनेक वेगळी उदाहरणे यात घेतली आहेत. याचे कारण त्या दोन पुस्तकांत त्या दोन भिन्न काळातील व त्या दोन भिन्न प्रदेशांतील उदाहरणे जास्त असणे साहजिक होते. आणि ते सर्व जसेच्या तसे मराठी पुस्तकात आणले असते तर, अनेक संदर्भ वाचकांना कळले नसते आणि मग ते पुस्तक अवाचनीय व दुर्बोध झाले असते. ती दोन्ही पुस्तके प्रत्येकी दीडशे पाने इतकी लहान आहेत आणि त्या दोन्हींचा आशय एकत्रितपणे आला आहे, असे मराठी पुस्तकही तीनशे पानांच्या दरम्यानच झालेले आहे.

'झुंडीचे मानसशास्त्र' हे पुस्तक कमालीचे गहन, गंभीर व वैचारिक आहे, मात्र ते कमालीचे वाचनीयही आहे. (अर्थातच ज्यांना वैचारिक पुस्तके वाचनाची बऱ्यापैकी सवय आहे त्यांच्यासाठी.) कारण त्याची भाषा आखीव-रेखीव आहे, त्यातील विवेचन सुबोध व प्रवाही आहे. हे पुस्तक सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाचत जाणे केव्हाही चांगलेच. पण बहुतेक वाचकांकडून तसे घडण्याची शक्यता कमी आहे. याचे कारण त्यातील विभाग, प्रकरणे आणि उप्रकरणे यांची सुटसुटीत रचना आणि त्यांची चटकदार व अर्थवाही शीर्षके, यांच्यामुळे वाचकांना मोह आवरता येत नाही. पुस्तक हातात आल्यावर अधल्या-मधल्या कुठल्या तरी प्रकरणावर किंवा उपप्रकरणावर जावे आणि ते-ते आधी वाचावे असे कुतूहल निर्माण होते. ते शमवण्यासाठी त्या-त्या ठिकाणी वाचायला जावे तर मागची किंवा पुढची पाने खुणावत राहतात.

हे पुस्तक हातात आल्यावर पहिला अचंबा वाटत राहतो तो अनुक्रमणिकेवर नजर टाकल्यावर. कारण एका नजरेच्या टप्प्यात ती येतच नाही. अनुक्रमणिकेने या लहानशा पुस्तकाची तब्बल आठ पाने व्यापली आहेत. पुस्तकाचा पूर्वार्ध म्हणजे झुंडी (द क्राऊड), यातील सहा विभागांत मिळून १८ प्रकरणे आहेत. उत्तरार्ध म्हणजे सच्च्या अनुयायी

(ट्रू बिलिव्हर), यात चार विभागांतील १३ प्रकरणांत मिळून १२५ उपप्रकरणे आहेत. शिवाय, सुरुवातीला आटोपशीर प्रास्ताविक आणि शेवटी दीर्घ परिशिष्ट...

वरील सर्वांच्या शीर्षकांवर डोळे फिरवू लागताच आपण विचारांच्या क्षेत्रांतील अभयारण्यात प्रवेश केला आहे, अशी जाणीव होऊ लागते. मग हा सर्व बहुमोल ऐवज आत्मसात करायला बरेच दिवस लागणार, याचा अंदाज येऊ लागतो. पुस्तकाचा प्रारंभ विश्वास पाटील यांनी लिहिलेल्या 'झुंडीत शिरण्यापूर्वी' या आत्मनिवेदनाने होतो, त्यातून पुस्तकाची पार्श्वभूमीवर कळते, प्रास्ताविकातून विषयाचा गाभा व आवाका याचा थोडासा अंदाज येतो. त्यालाच जोडून 'सक्रिय व नक्रिय चळवळी' हा बीजलेख येतो.

आणि मग पुस्तकाचा पूर्वार्ध सुरू होतो– झुंडी. त्यात सहा विभाग येतात : 'झुंडीची मानसिकता', 'झुंडीची मते आणि श्रद्धा,' 'झुंडीच्या भावना आणि धारणा,' 'झुंडीचे नेते आणि त्यांच्या क्लृप्त्या', 'झुंडीची मते आणि मतपरिवर्तन,' 'झुंडीचे वर्गीकरण'. या विभागातील मिळून १८ प्रकरणे काय करतात तर मानवी झुंडींचे आतले आणि बाहेरचे रूप उघडे–नागडे करतात. म्हणजे झुंडी कशाला म्हणायचे, त्या कशा आकार घेतात, त्यांची लक्षणे कोणती, त्यांचे शिक्षण–प्रशिक्षण कसे चालते, त्यांच्या धारणा बळकट कशा होतात, त्यांची कार्यपद्धती कशी चालते, त्यांच्यात फाटाफुटी कशा होतात, त्यांची कर्तबगारी काय असते, त्या किती विध्वंसक काम करतात, त्या कितपत सर्जनशील बनू शकतात, इत्यादी.

त्यानंतर पुस्तकाचा उत्तरार्ध सुरू होतो– सच्चा अनुयायी. त्यात चार विभाग येतात : 'जनता चळवळींचे आकर्षण,' 'चळवळीतील संभाव्य उमेदवार,' 'संघटित कृती आणि आत्मसमर्पणाचे आकर्षण,' 'चळवळींचा प्रारंभ व शेवट'. त्यात १२ प्रकरणे येतात. मात्र हा संपूर्ण उत्तरार्ध सलग अशा १२५ उपशीर्षकांमध्ये पक्का बांधलेला आहे. त्यातील कोणतीही पाच–दहा उपशीर्षके समोर ठेवली तरी मनात कल्लोळ सुरू होऊ लागतो. उदाहरण म्हणून ही काही शीर्षके पहा... 'उठावाचे घोषवाक्य : राष्ट्र संकटात आहे', 'यांना बदल नकोच आणि त्यांना बदल हवाच,' 'बाबा, हे जग बदलायाचे,' 'स्वप्नांचे सौदागर,' 'देव/देश/धर्मासाठी प्राण घेतले हाती,' 'नाना रंगा ढंगाच्या चळवळी,' 'उभ्या जगाशी दावा,' 'स्वर्ग दोन बोटे दूर,' 'सुखाचे बंड,' 'राखेतले निखारे,' 'कुटुंब म्हणजे चळवळीचा शत्रू', 'नाही आसू नाही माया', 'उसासे आणि जांभया', 'हमसे जो टकरायेगा', 'फक्त आपल्या जमातीसाठी', 'दुगाण्या झडण्याचा आनंद', 'सुस्त सुखी आणि द्रष्टे दुःखी', 'भक्ती मोठी म्हणून कार्य मोठे', 'सत्कार्याच्या शोधातला मुसाफिर', 'परद्वेश हे आत्मद्वेशाचे दुसरे रूप', 'एकछापी माणसं', 'पोथी आणि तलवार', 'नेत्याला शरण जाणे हेच ध्येय', 'भित्री भागुबई बनते शूर शिपाई', 'दुर्गुणांना वेड्या उत्साहाची साथ', 'चळवळीचे अपंग अनुयायी', 'चळवळीला चावी देणारे बुद्धिमंत', इत्यादी.

हे पुस्तक वाचत जाऊ तसे आपले झुंडीबद्दलचे आकलन वाढत जाते. झुंडीचे अनेक प्रकार व उपप्रकार असू शकतात. चार–सहा माणसांचा गट, शे–दोनशे माणसांचा जमाव आणि काही लाखांचा समूह हे सर्व झुंडीमध्ये येऊ शकतात. या झुंडी वेगवेगळ्या कारणाने आकार घेऊ शकतात. म्हणजे जात, धर्म, प्रांत, भाषा, लिंग, प्रदेश, वर्ग, देव, देश, वंश, विचारधारा, पक्ष, पंथ आणि अस्मिता जागी करता येईल अशा कोणत्याही कारणाने झुंडी आकार घेऊ शकतात. म्हणजे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अशा विविध प्रकारांत त्यांची वर्गवारी करता येईल. कधी त्या स्थानिक पातळीवर असतील, कधी राष्ट्रीय तर कधी आंतरराष्ट्रीय स्तरावरील. या झुंडी कधी काही मागणी करण्यासाठी असतील, कधी एखादा निर्णय रद्द करण्यासाठी असतील, कधी निषेधासाठी तर कधी सिंहासने उलथवून टाकण्यासाठी. या झुंडी विध्वंसक कृत्ये घडवून आणतील किंवा ती कृत्ये रोखण्यासाठी उपयुक्त ठरतील. बऱ्याच दीर्घकालीन प्रक्रियेतून त्या उदयाला येऊ शकतील किंवा तत्कालीन कारणही त्यासाठी पुरेल. कधी झुंडी नेत्याशिवाय आकाराला येतात, कधी नेता झुंडीला आकार देतो. कधी एखाद्या ठिणगीतून झुंडी अक्राळविक्राळ रूप धारण करतात, तर कधी आता क्रांती होणार, असे वाटत असतानाच झुंडी हवेत विरून जातात.

या झुंडींचे प्रकार बरेच आहेत, मात्र त्यांचे स्वरूप व कार्यक्रम यात परस्परविरोधी व मोठी तफावत असू शकते.

त्यासंदर्भात विश्वास पाटील म्हणतात, ‘टोमॅटो आणि काटेरिंगणी ही दोन्ही फळे वर्गीकरणांच्या दृष्टीने एकाच फॅमिलीमधील असतात, पण एक शरीराला तारक आहे तर दुसरे मारक. मात्र आकार, अंतर्गत रचना वगैरे बाबतींत या दोन्ही फळांमध्ये खूप साम्य आहे.’

तर कोणत्याही प्रकारच्या झुंडी आकाराला यायच्या किंवा आणायच्या असतील तर परिस्थितीचे अतिसुलभीकरण करावे लागते, आपण आणि ते अशी सरळ फाळणी करावी लागते, शत्रू ‘आहे त्यापेक्षा’ मोठा करून दाखवावा लागतो, अतिरिक्त धोका किंवा अवाढव्य स्वप्ने दाखवावी लागतात. झुंडीच्या मनात राग, संताप, द्वेष वाढवत न्यावा लागतो. त्यासाठी चमकदार घोषणा तयार कराव्या लागतात, प्रतीके निर्माण करावी लागतात, नेत्यांचा करिश्मा पुन:पुन्हा अधोरेखित करावा लागतो. अपप्रचारासाठी वेगवेगळी आयुधे वापरावी लागतात, कुजबूज आघाडी चालवावी लागते आणि आणखी बरेच काही...

झुंडी जशा अनेक प्रकारच्या व स्वरूपाच्या असतात, तसेच सच्च्या अनुयायांचेही असते. जात, धर्म, भाषा, प्रांत, लिंग, वंश, वर्ग व तत्सम अस्मितेच्या नावाखाली सच्चे अनुयायी झुंडीत सामील होत असतात. त्यातील काही थोड्या काळासाठी, तर काही दीर्घ काळासाठी. काही विशिष्ट मागणी वा विरोधासाठी तर काही दीर्घकालीन उद्दिष्टांसाठी. ते स्वतःचे आयुष्य पणाला लावतात, आत्मबलिदानाला तयार होतात. कधी ते दुसऱ्याचा जीव घ्यायला तयार होतात. विशिष्ट ध्येयासाठी, राष्ट्रासाठी, देवासाठी, धर्मासाठी. कधी हा जन्म व हे जीवन क्षणभंगुर आहे असे मानून, तर कधी परलोकातील जीवन हेच खरे या सांगण्यावर भाळून. त्या प्रक्रियेत ते पीडा सहन करतात, त्यात आनंद मानतात. श्रमसफल्याचे सुख अनुभवतात.

या सच्च्या अनुयायांना नेहमी काही तरी कार्यक्रम लागतो, काही तरी उद्दिष्ट लागते अन्यथा ते सैरभैर होतात. काळे आणि पांढरे अशी मांडणी त्यांना भावते, जास्त गुंतागुंतीची मांडणी त्यांना विचलित करते. नेत्याने विचार केलेला आहे, आपण श्रद्धा/भक्तिभावाने समर्पित झाले पाहिजे, असे त्यांनी आपल्या मनाला बजावलेले असते. आयुष्य झोकून द्यावे किंवा प्राण पणाला लावावे असा नेता त्यांना हवा असतो. एकाकडून भ्रमनिरास झाला तर ते दुसऱ्या नेत्याच्या मागे जातात, मग तिसऱ्या. एक कार्यक्रम संपला की दुसरा, तिसरा. खूप जास्त अभ्यास किंवा विचार केला तर आपण निष्क्रिय होऊ, आपल्या कृतीची धार बोथट होईल, अशी भीती त्यांच्या सुप्त मनात असते. आणि असे बरेच काही...

असे हे पुस्तक क्रमाक्रमाने किंवा कोणत्याही क्रमाने आपण वाचत गेलो की, आपल्या सभोवतालचे संप्रदाय, संघटना, पक्ष, पंथ, चळवळी, आंदोलने यांच्या संदर्भातील अनुभव, आठवणी, प्रसंग जागे होत राहतात. पूर्वीची निरीक्षणे डोके वर काढतात. या पुस्तकातील काही ना काही विश्लेषण तिथे लागू पडते, याची खात्री वाटू लागते. डोक्यात अधिकाधिक प्रकाश पडू लागतो. किती धूर्तपणाने या झुंडी नियंत्रित केल्या जातात, ती माणसे किती कावेबाज व पाताळयंत्री असतात, हे स्पष्ट होऊ लागते. काही समाजविघातक शक्ती आपण समजत होतो त्यापेक्षा भयानक आहेत, याची जाणीव होऊ लागते. त्या विघातक घटकांपासून स्वतःला व आप्तस्वकीयांना दूर ठेवले पाहिजे, असे मनोमन ठरवावेसे वाटू लागते. आणि मग चांगले सामाजिक कार्य करणारी माणसे व त्यांच्या चळवळीही मन:चक्षूंसमोर तरंगू लागतात. त्यांच्याकडून कळत-नकळत झालेली फसगत आठवू लागते, भ्रमनिरासाचे कटु प्रसंग पुन्हा समोर उभे ठाकतात आणि मग वेगवेगळे साक्षात्कार होऊ लागतात. ते साक्षात्कार वाढत जातात, तसतसे चांगुलपणाविषयी शंका निर्माण व्हायला लागते. मनात घर करून असलेल्या अनेक लहान-थोरांच्या प्रतिमांना तडे जातात. आणि मग वैफल्याची भावना मनात घर करू लागते.

पण हे पुस्तक वाचून होते आणि काळ जस-जसा पुढे सरकत जातो, तस-तसे सर्व प्रकारच्या झुंडी, चळवळी, आंदोलने यांच्यातील वर्गीकरण मनात आकार घेऊ लागते. सुष्ट आणि दुष्ट किंवा सत् आणि असत् प्रवृत्तींमधील संघर्ष म्हणून आपण त्याकडे पाहू लागतो. तो संघर्ष युगानुयुगे चालू आहे आणि त्यापासून आपली सुटका नाही, तर मग सत् प्रवृत्तींच्या मागे आपली सहानुभूती उभी करायला हवी असाच निर्णय येतो. त्यासाठी शक्य तेवढे योगदान द्यावे असे वाटत राहते, मात्र त्यांच्यात असलेल्या मर्यादांचे भान सुटत नाही, अवास्तव स्वप्ने पडत नाहीत आणि अपेक्षाभंगाचे दुःख तुलनेने कमी होते. आणि मग वैफल्याची भावना पुढील काळात सामंजस्याच्या मार्गावर येऊ लागते.

चिकित्सा

सुरेश खैरनार

# हमाम में सभी नंगे है!

प्रश्न फक्त राजकारणी लोकांचा नाही, सामान्यांच्या संवेदनशीलतेचाही आहे, एक वेळ होती की, वाममार्गाने पैसा कमावणारी व्यक्ती आपले तोंड लपवत असत, आज ती उजळमाथ्याने वावरताना दिसतात. त्यांना समाजात मानसन्मान मिळताना दिसतो. गंभीर बाब म्हणजे हे सर्व तथाकथित धर्म व आध्यात्मिक क्षेत्रांत सर्वांत पुढे आहेत. एकूणच त्यांनी संपूर्ण जीवनात वाळवीसारखा प्रवेश केला असून तीच आज नेतृत्व करत आहेत. वर्तमानप्रमुख पदाधिकारी मग ते दिल्लीतील असोत की गल्लीतील, त्याला कीड लागली आहे. चिंताजनक बाब म्हणजे देशातील सर्वसामान्य माणसांच्या संवेदनशीलतेची आहे. आपल्या देशाला स्वतंत्र होऊन ७० वर्षे झाली तरीही भ्रष्टाचार, गरीब, दलित, आदिवासींच्या अत्याचारांत कमी होण्याऐवजी वाढच झाली आहे. आज हे सर्वसामान्य माणसाला हे सगळे काही खटकत नाही, सवय झाली आहे. आपली सार्वजनिक संवेदनशीलता दिवसेंदिवस बोथट होत चालली आहे.

भारतीय संसदीय इतिहासाच्या ७० वर्षांत राजकीय सत्ता मिळवण्यासाठी जे काही करता येईल, ते सर्व करून सत्तेवर येणे– हा मुख्य कार्यक्रम कमी–अधिक प्रमाणात सगळेच राजकीय पक्ष राबवण्यात गुंतलेले दिसत आहेत. म्हणून मी या लेखाचे शीर्षक ‘हमाममे सभी नंगे है!’ असं जाणीवपूर्वक दिलेलं आहे!

महात्मा गांधींनी १११ वर्षांपूर्वी लिहिलेल्या ‘हिंद स्वराज्य’ या छोटेखानी पुस्तकात संसदेला गणिकेची उपमा दिली आहे– १११ वर्षांपूर्वी! जेव्हा भारतात ब्रिटनच्या राणीचा अंमल होता. संसदीय लोकशाही पद्धत सुरू झालेली नव्हती. गांधींनी इंग्लंडच्या संसदीय कामकाजावरून ते वाक्य लिहिलेले आहे. आज ते हयात असते, तर किती कडक लिहिले असते?

१९५२ च्या पहिल्या निवडणुकीपासून सुरुवात होऊन जवळपास ७० वर्षे होत आली आहेत– एकूणच ग्रामपंचायतीपासून संसदेपर्यंतच्या निवडणुका पाहता, काय स्वरूप झालेलं आहे?

बहुतेक राजकीय पक्षांनी आपल्या कार्यकर्त्यांमध्ये काही गुंड पाळले आहेत. त्यावर उपायासाठी १९९३ मध्ये तत्कालीन गृहसचिव श्री.एन.एन.वोरा– १० वर्षांपेक्षा जास्त काळ जम्मू–काश्मीरचे राज्यपाल होते– त्यांच्या नेतृत्वाखाली ‘भारतीय संसदीय राजकारणाचे गुन्हेगारीकरण’ या विषयावर चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती. त्यांनी आपली चौकशी सहा महिन्यांच्या आत पूर्ण करून ऑक्टोबर १९९३ मध्ये रिपोर्ट सादर केला होता. आज या घटनेला २७ वर्षे पूर्ण होत आहेत, पण या २७ वर्षांत किती पक्षांची सरकारे आली आणि गेली, पण त्यांच्यापैकी एकानेही त्या अहवालाची अंमलबजावणी करणे तर दूर राहिले– उलट, २०१७ मध्ये माजी माहिती आयुक्त शैलेश गांधी यांनी माहितीच्या अधिकारात वोरा कमिटीच्या अहवालाची प्रत मागितली असता, त्यांना उत्तर देण्यात आले की– ही माहिती क्लासिफाईड असल्यामुळे देता येत नाही.

ऐंशीच्या दशकात महाराष्ट्र काँग्रेसच्या तिकीटवाटप बैठकीत शंकरराव चव्हाण यांनी पप्पू कलानी व भाई ठाकूर

यांना तिकीट देऊ नका, म्हणून सूचना केली. आत्ताच्या महाराष्ट्र शासनाचे पालक तेव्हा काँग्रेसमध्ये होते. ते म्हणाले, ''दोन्ही उमेदवार निवडून येतील, अशी मला खात्री आहे'' म्हणून त्या दोघांना तिकिट देण्याचा आग्रह धरला आणि ते दोन्ही उमेदवार निवडूनही आले. हा भारतीय संसदीय राजकारणाचा मीटर असून, निवडून येतील ते मग गुन्हेगारी पार्श्वभूमीचे असोत की, वाट्टेल तेवढा पैसा खर्च करू शकणारे– हा प्रकार मी तथाकथित आम आदमी पार्टीचाही पाहिल्यामुळे म्हणतोय, 'हमाम में सभी नंगे है!'

मुंबई येथे २०१४ मध्ये झालेल्या मेधा पाटकर यांच्या निवडणुकीसाठी भारतातून बहुसंख्य कार्यकर्ते गेले होते आणि आपल्या ऐपतीप्रमाणे लोकांनी आर्थिक मदतही केली होती. एकूण मते किती मिळाली, ही वस्तुस्थिती सुन्न करणारी आहे. मी वीस वर्षे आधीच सेवाग्राम एनएपीएमच्या स्थापना अधिवेशनात सांगितले होते की– आज या आश्रमाचे संस्थापक महात्मा गांधी जरी वर्धा मतदारसंघातून उभे राहिले असते वा जेपी पाटणा मतदारसंघात उभे राहिले असते, तरी दोन्ही महात्मा डिपॉझिट वाचवू शकले नसते, असे आजचे निवडणूक तंत्र विकसित झाले आहे. त्यात तुमचा कुणाचाच निभाव लागणार नाही, हे स्पष्ट आहे. कारण गेली सत्तर वर्षे झालेल्या निवडणुकांमधील तंत्र व आपण त्यांचा मुकाबला कसा करायचा त्याचबरोबर गेली तीस वर्षे झाली सांप्रदायिक राजकारण करून जे ध्रुवीकरण सुरू झालेले आहे, ते भयंकर आहे. त्यासाठी संपूर्ण कॉर्पोरेट जगत त्यांनी ताब्यात घेतले. मीडिया व त्यावर करत आहेत तो खर्च पाहिल्यावर मला वाटतं, या निवडणुका म्हणजे लोकशाहीचा फार्स सुरू आहे! म्हणून मी भारतीय संसदीय राजकारणाचा मीटर पाहिल्यावर मांडलेले प्रश्न वेगवेगळे असले, तरी एकूण एकच उत्तर आहे की– सर्वसामान्य माणसासाठी या निवडणुका म्हणजे अशक्य कोटीतील गोष्टी आहेत!

मला वाटतं, आमच्या सार्वजनिक मनावर ज्या–ज्या वाईट गोष्टींनी गारूड केलेले आहे– त्यात पैसा, जात, धर्म व गुन्हेगारी पार्श्वभूमीचे लोक कमी–अधिक प्रमाणात सर्व राजकीय पक्षांनी आपल्या पदरी ठेवले आहेत– यांचा समावेश आहे. ही समस्या १९७४–७५ मध्ये मी एक मजूर नेता– जो मुंबई सोडून बिहारमधील एका मतदारसंघात उभा राहिला असता त्यांनीही निवडणूक बूथ बळकावणे, गुंड कार्यकर्त्यांकरवी हिंसाही केली होती– त्यांना विचारले असता त्यांनी उत्तर दिले की, ''अगर हमारे विरोधी यह सब करेंगे तो हम कैसे चूप बैठे रह सकते? भाई, यहा चुनाव जिससे संसद में पहुँचना है तो यह सब करेंगे, तो हम राजनीतीमें टिक सकते!'' त्यासाठी त्यांनी अविरत संशोधनही केले आणि शेवटी ते सांप्रदायिक राजकारणी लोकांसोबत जाऊन बसलेले आपण पाहिलेले आहे. कारण राजकारणात टिकून राहण्यासाठी काय करावे लागते, याचे सर्वांत ताजे उदाहरण आहे– राजस्थान. काही दिवसांपूर्वी मध्य प्रदेशमध्ये व त्या आधी कर्नाटकात झालेले प्रकार पुरेसे आहेत. एकूणच, भारतीय संसदीय राजकारणाची घसरण पाहिल्यावर मी मांडलेले प्रश्न पटले असतील, असं समजतो.

सप्टेंबर १९९९ मध्ये दिल्ली येथे कॉन्स्टिट्युशन क्लबमध्ये 'हवाला के देशद्रोही' या शीर्षकाच्या विनीत नारायण नावाच्या एका पत्रकाराच्या पुस्तक प्रकाशन समारंभात मी वोरा कमिटीच्या अहवालाची अंमलबजावणी होत नाही, म्हणून खंत व्यक्त केली होती. अनपेक्षितपणे त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी गृहमंत्री इंद्रजित गुप्ता होते! कार्यक्रमानंतर कॉफी घेताना त्यांनी मला सांगितले, ''मी गृहमंत्री असताना तो अहवाल पाहिला होता. फक्त भारतीय संसदीय राजकारणाचे गुन्हेगारीकरण ५० टक्क्यांपर्यंत झालेले आहे, एवढेच त्यात होते; पण नाव कुणाचेच दिलेले नव्हते.'' मी उत्स्फूर्तपणे लगेचच त्यांना म्हटलं, ''बहुतेक गृहसचिव हा गृहमंत्र्यांच्या हाताखाली असतो ना? तर, तुम्ही त्यांच्याकडून ती नावे का नाही मागितली?''

बंगालमध्ये १९८२ ते १९९७ अशी सलग १५ वर्षे मी राहायला होतो, तेव्हा ज्योती बसूंना मुख्यमंत्री होऊन ५ वर्षे पूर्ण होत आली होती आणि १९९७ मध्ये बंगाल सोडत असताना बुद्धदेव भट्टाचार्य मुख्यमंत्रिपदी आलेले होते. म्हणजे जवळपास ३५ वर्षे लेफ्ट फ्रंटचे सरकार सत्तेत होते. बंगालचे बहुसंख्य गुंड सीपीएमच्या कार्यकर्त्यांमध्ये सामील झाले होते. त्यांच्या दहशतीचा त्रास सामान्य माणसालाच होत होता असे नाही; चक्क लेफ्ट फ्रंटच्या घटक पक्षांच्या सीपीआय, फॉरवर्ड ब्लॉक, आरएसपीच्या– किती तरी कार्यकर्त्यांची हत्या करण्यात आली होती! तुमच्याकडे चोरी झाली वा गुन्हा झाल्यावर संबंधित पोलीस ठाण्यात जोपर्यंत त्या परिसरातील सीपीएमचा पदाधिकारी सिग्नल देत नाही, तोपर्यंत तक्रार दाखल होत नव्हती. हा अनुभव मी घेतला आहे. श्रीमती इंदू खैरनार या केंद्रीय विद्यालय फोर्ट विल्यम शाळेच्या प्राचार्या असताना शाळेच्या आवाराशेजारी

सॉफ्टड्रिंक्समधून विद्यार्थ्यांना ड्रग दिले जाते, ही खात्री करून घेतली. त्यावर कारवाई करण्यात आली असताना त्यांच्यावर हल्ला झाला होता, म्हणून हेस्टिंग्ज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून घेण्यास टाळाटाळ करत असलेले पाहून शेवटी मी स्थानिक आमदार व बंगाली चित्रपट अभिनेता श्री.अनिल चटर्जी यांना भेटून सगळी हकिगत सांगितली. त्यांनी लक्ष घालून ती तक्रार दाखल करून घेण्यात सांगितले. हा अनुभव मी घेतला आहे; पण सर्वसामान्य माणसाला हे सगळे कसे शक्य होत असेल, याची कल्पना येते.

बंगालच्या निवडणुका म्हणजे युद्धाचा प्रसंग. खून, बूथ बळकावणे नित्यनेमाने होत असायचे. त्यामुळे बरेच लोक मतदान करत नसत, त्यात आमचाही समावेश आहे. कारण सीपीएमचे अलिखित धोरण होते की– ज्या मतदारांची खात्री नाही, त्यांना मतदान करायला जाऊ द्यायचं नाही. निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करूनही काही झाले नाही. शेषन यांनी थोडीफार कारवाई करायला सुरुवात केली असता, बंगाल सरकारने खळखळ केली. मुख्यमंत्री ज्योती बसू होते! त्यांच्याच सरकारमध्ये महसूलमंत्री असलेले चौधरी यांनी म्हटलं, ‘‘लेफ्ट–फ्रंट सरकार कॉन्ट्रक्टर, प्रमोटर व गुंड चालवत आहेत.’’ तर ज्योती बसू म्हणाले, ‘‘मग त्यांनी अशा सरकारमध्ये राहू नये!’’

मी काही सीपीएमविरोधी नाही. मी १९८३ मध्ये खूप उत्साही होतो, कम्युनिस्ट सरकार असलेल्या राज्याचा रहिवासी, ‘याचि देही याचि डोळा’ पाहायला मिळणार!

दिल्लीच्या रामलीला मैदानात १९९७ मध्ये एनएपीएमच्या जनाधिकार पंचायतीसाठी मी काही काळ दिल्लीत तयारीसाठी तळ ठोकून होतो. एके दिवशी आशिष नंदी यांनी आग्रह केला की, आज सीएसडीएसमध्ये एक कार्यक्रम आयोजित केला आहे आणि तू त्याला हजर राहिले पाहिजेस. मी गेलो तेव्हा पाहिलं, माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांचे साधनशुचितेवर भाषण व त्यावर चर्चा– असा कार्यक्रम आयोजित केला होता. सभेचे अध्यक्ष धीरुभाई सेठ होते! कार्यक्रमात सहभागी लोक ५०–६० असतील– दिल्लीचे क्रीम म्हणता येईल असेच निवडक लोक! चंद्रशेखर साधनशुचितेवर फार सुंदर बोलले. अगदी वेद, उपनिषदे, सॉक्रेटिस, बुद्ध, महावीर, जीझस, पैगंबर, गांधी, जे.कृष्णमूर्ती, ऋषी अरविंदांपर्यंतचा प्रवास त्यांच्या भाषणात होता. मी तर खूपच प्रभावित झालो होतो. त्यांचे भाषण झाल्यावर धीरुभाई म्हणाले की, आता हा विषय चर्चेसाठी तासभर तरी चालेल, मग दुपारचं जेवण होईल. मी प्रथम हात वर केला. मला त्यांनी बोलायला सांगितले. मी सर्वप्रथम चंद्रशेखर फार सुंदर बोलले म्हणून त्यांचे आभार मानले. त्यांना म्हटलं की– मीडियाद्वारे आपण राजकारणात काय करता ते पाहून मी बोलत आहे, ते चूक असेल तर आपण मला सांगावे, मी दुरुस्ती करायला तयार आहे. तुमचे निवडणूक प्रभारी मरेपर्यंत सोबतच होते. धनबादचे कोळसामफिया सूरजदेव सिंह तसेच भागलपूर दंगल घडवून आणण्यात प्रमुख भूमिका असणारे महादेवसिंहही त्यांच्यासारखेच आपले पाठीराखे होते. संपूर्ण उत्तर भारतात ज्याचे माफिया नेटवर्कमध्ये नाव आहे, तो छोटन शुक्ला आपण पंतप्रधान असताना कलकत्ता येथे आले असता, आपल्याला राहण्यासाठी राज भवन असताना आर्थिक गुन्हेगारी खटला सुरू असलेल्या गोएंका यांच्या घरी मुक्काम केला होता. तर, येथे साधनशुचिता का पाळली गेली नाही? त्यांनी उत्तर दिलं, ‘‘आपल्या संस्कृतीत मृत्यू पावलेल्या व्यक्तीविषयी वाईट बोलत नाहीत. आपण उल्लेख केलेली एकही व्यक्ती आता जिवंत नाही!’’ एवढं बोलून ते सरळ चालायला लागले. नंतर जेवण होते. कार्यक्रमात सहभागी असलेले लोक चकित झाले होते. शेवटी मी धीरुभाईंना म्हटलं, ‘‘माझ्यामुळे तुमचा पाहुणा नाराज झाला व न जेवता गेला.’’ तर धीरुभाई म्हणाले, ‘‘अरे बाबा तुला काय वाटतं ते सोड. येथे दिल्लीची खूप मोठी माणसं आलेली आहेत, पण एकाचीही हिंमत नव्हती जी तुझ्यात आहे! अरे भाई, आशिषने जब मुझे बताया की तुम दिल्ली में हो तो मैनेही कहा था की इस कार्यक्रम मे सुरेश को जरूर बुलाओ! और मेरा पर्पज सर्व्ह हो गया है! चलो, खाना खाते है.’’

त्यानंतर माझ्या मुलाच्या शिक्षणासंबंधी पुण्यात असताना भाई वैद्य यांच्याकडून भेट घेऊन परतत असताना ते मला म्हणाले, ‘‘उद्या तुला वेळ असला तर किशोर पवार यांच्या बंगल्यावर सायंकाळी पाच वाजता येशील. चंद्रशेखरसोबत चहाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.’’ मी भाईंना दिल्लीच्या प्रसंगात काय झाले ते सांगितले असता भाई म्हणाले, ‘‘अरे चंद्रशेखर फार मोठा माणूस आहे. असल्या गोष्टी तो काही मनावर घेत नाही!’’ कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नियोजित वेळेनुसार गेलो होतो. नरेंद्र दाभोलकर यांनी डॉ.सुरेश खैरनार म्हणून ओळख करून दिली असता, मधेच तोडून ते म्हणाले, ‘‘अरे भाई, इनको

कौन नहीं पहचानता, ये तो बहुत बडे क्रांतिकारी है!'' तिथे असलेले सगळेच बुचकळ्यात पडले– एकटे भाई सोडून!

पश्चिम बंगालमधील बर्धमान ब्लास्टच्या तपासासाठी मी, कुमार केतकर व शारदा साठे २०१५ च्या मार्चमध्ये गेलो असता, शारदा साठे यांनी माजी लोकसभा अध्यक्ष सोमनाथ चटर्जी यांचे आत्मचरित्र मराठीत अनुवाद केले आहे, ते पुस्तक सोमनाथबाबूंना द्यायचं होतं. माझा शांतिनिकेतनमध्ये मुक्काम होता. सोमनाथ चटर्जींना फोन केला. त्यांनी 'सायंकाळी पाच वाजता या' म्हटलं. आम्ही गेलो. त्यांना पुस्तक देताना कुमार केतकर म्हणले, ''आम्ही सुरेशसोबत बर्धमान ब्लास्टचा तपास करण्यासाठी आलो होतो, तेव्हा ते म्हणाले, 'अरे भाई, यह ममता बॅनर्जी लुम्पेन है!' मी ताड्कन् म्हटलं, 'मी काही ममता बॅनर्जींचा समर्थक नाही, ममता बॅनर्जी सत्तेत यायला आपल्या पूर्वीच्या पक्षाने (सीपीएमने त्यांना पक्षातून काढून टाकलं होतं) लुम्पेनचा रस्ता तयार करून दिला होता. नंदिग्राम, सिंगूर त्याचे ठळक उदाहरण आहे.'' एवढे बोलल्यानंतर सोमनाथबाबू मोकळेपणाने चर्चा करावयास लागले– जवळपास दोन तास. आम्ही परतत असताना म्हणाले, ''अरे भाई, यहाँ मै अकेला बैठा रहता हूँ, जब कभी शांतिनिकेतन में आओ तो जरूर मिलो!''

भारतीय जनता पक्ष स्वत:ला इतर पक्षांच्या तुलनेत खूपच वेगळा पक्ष म्हणवून घेत असतो. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांवर ४८ गुन्हेगारी व १२ खुनांच्या केसेस आहेत. कर्नाटकात नुकतेच झालेले मुख्यमंत्री येडियुरप्पांना भ्रष्टाचार प्रकरणात तुरुंगवास झालेला आहे. त्यांनी मंत्रिमंडळामध्ये वादग्रस्त अशा रेड्डी बंधूंना कर्नाटकचा पर्यावरण विभाग दिला आहे. हे तेच रेड्डी आहेत जे कित्येक वर्षे कर्नाटक, आंध्र प्रदेशच्या अवैध खाणी खणून दोन्ही राज्यांच्या प्रकृतीशी खेळत आहेत, सीबीआयतर्फे तुरुंगवासही झालेले हे लोक आहेत. मध्य प्रदेशमध्ये शिवराजसिंह चौहान यांच्या काळात व्यापम घोटाळा– ज्यात एखादा रहस्यमय चित्रपट बघताना जसे शहारे येतात, तसे कित्येक खून झाले आणि एकाचाही तपास लागला नाही, तरीही परत एकदा तेच मुख्यमंत्री!

भारत सरकारचे सर्वांत महत्त्वाचे खाते कुणाकडे; तर पाच खुनांमध्ये वर्षभर तुरुंगवास– गुजरातचे गृहमंत्री असताना, आता तर देशाचा गृहमंत्री! आणखी जस्टिस लोया मर्डर मिस्ट्री आहेच. कारवान नावाच्या इंग्रजी पत्रिकेच्या अंकात निरंजन टकले यांनी सविस्तर माहिती दिली आहे. तसेच सोहराबुद्दीन एन्काउंटर केस सुरू असलेला माणूस गृहमंत्री.

माननीय पंतप्रधानांचे तर ट्रक भरेल एवढे रेकॉर्ड आहे– २००२ मध्ये गोध्रा कांडानंतर ५६ जळित प्रेते कलेक्टरचा विरोध डावलून विश्व हिंदू परिषदेच्या ताब्यात कोणी दिली होती, दि.२७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सेनेच्या ३००० जवानांना दंगल थोपवण्यासाठी पाठवलेले असताना, त्यांना अहमदाबाद एअरपोर्टच्या बाहेर तीन दिवस पडू दिले नाही, ते मुख्यमंत्री कोण? 'मी नरेंद्र दामोदरदास मोदी आजपासून गुजरातचा मुख्यमंत्री होताना ही शपथ घेत आहे की, 'माझ्या गुजरातमध्ये कुठलाही भेदभाव न करता मी राज्याचे कामकाज करेन.' कुठे गेली होती ती शपथ? वर मांडलेले प्रश्न वेगवेगळे असले, तरी एकूण भारतीय संसदीय राजकारणात काय लायकीचे आहेत– हेच पुन:पुन्हा सांगत असतात. त्यामागचे रहस्य काय आहे? विकास दुबे हे आईसबर्गचे एक छोटेखानी रूप आहे, एवढेच.

प्रश्न फक्त राजकारणी लोकांचा नाही, आमच्यासारख्या सामान्यांच्या संवेदनशीलतेचाही आहे, एक वेळ होती की, वाममार्गाने पैसा कमावणारी व्यक्ती आपले तोंड लपवत असत, आज ती उजळमाथ्याने वावरताना दिसतात. त्यांना समाजात मानसन्मान मिळताना दिसतो. गंभीर बाब म्हणजे हे सर्व तथाकथित धर्म व आध्यात्मिक क्षेत्रांत सर्वांत पुढे आहेत. एकूणच त्यांनी संपूर्ण जीवनात वाळवीसारखा प्रवेश केला असून तीच आज नेतृत्व करत आहेत. वर्तमानप्रमुख पदाधिकारी मग ते दिल्लीतील असोत की गल्लीतील, त्याला कीड लागली आहे. चिंताजनक बाब म्हणजे देशातील सर्वसामान्य माणसांच्या संवेदनशीलतेची आहे. आपल्या देशाला स्वतंत्र होऊन ७० वर्षे झाली तरीही भ्रष्टाचार, गरीब, दलित, आदिवासींच्या अत्याचारांत कमी होण्याऐवजी वाढच झाली आहे. आज हे सर्वसामान्य माणसाला हे सगळे काही खटकत नाही, सवय झाली आहे. आपली सार्वजनिक संवेदनशीलता दिवसेंदिवस बोथट होत चालली आहे.

जवळपास सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यशैली पाहिल्यावर, त्यांचे कार्यकर्ते पाहिल्यावर काय दिसते! म्हणून या क्षेत्रात चांगली माणसं टिकून राहण्यासाठी अत्यंत प्रतिकूल वातावरण निर्माण करत नाही, तोपर्यंत विकास दुबे निर्माण होतच राहतील!

**डॉ. सुरेश खैरनार,** नागपूर
Mob. 8329203734

चिनी महासत्तेचा उदय : २७

सतीश बागल



# चीनचे स्वप्न आणि क्षी जिनपिंग यांचा अजेंडा इंटरनेटवर नियंत्रण

पाश्चिमात्य पद्धतीच्या लोकशाहीमध्ये निवडणुकांपूर्वी जाहीरनामा प्रस्तुत करून राजकीय पक्षांची धोरणे काय असतील, याची ढोबळ मानाने लोकांना/मतदारांना कल्पना दिली जाते आणि त्याच्या आधारावर मतदार राजकीय पक्षाला निवडून देतात. त्यानंतर राजकीय पक्ष जाहीरनाम्याप्रमाणे सरकार चालवितात. चीनमधील एकपक्षीय हुकूमशाहीत त्याउलट पक्षांतर्गत सहमतीने, पडद्याआड, नेतृत्वाविषयीचे निर्णय घेतले जातात. नेत्याची निवड झाल्यावर नॅशनल काँग्रेसमध्ये (चीनचे पार्लमेंट) सरकारची संभाव्य वाटचाल कशी होईल यासंबंधीचा रोडमॅप तयार करून, त्याबद्दलचा आराखडा तयार करून त्यावर सहमती घेतली जाते. त्यानंतर सरकारचे कामकाज सुरू होते. यामुळे नव्या नेतृत्वाला काम करण्यासाठी मोठा वाव असतोच, शिवाय कार्यक्रमावर नेतृत्वाचा ठसाही असतो. अर्थातच हे कार्यक्रम पक्षाच्या कार्यपद्धतीत, सर्वसामान्य विचारधारा व परंपरा यांमध्ये चालविणे आवश्यक असते.

क्षी जिनपिंग २०१३ मध्ये सत्तेत आले आणि प्रथेप्रमाणे त्यांनी २०१३ मधील तिसऱ्या प्लेनमध्ये आपल्या सरकारच्या राजकीय व आर्थिक कार्यक्रमाची रूपरेषा, ढोबळ धोरणे आणि त्यामागची दृष्टी स्पष्ट करणारी भूमिका मांडून त्या कार्यक्रमास संमतीही प्राप्त केली. यात आर्थिक सुधारणा, पर्यावरणाच्या समस्येवरील उपाययोजना, शहरांचे व्यवस्थापन, राजकीय अस्थिरतेवर योजावयाचे उपाय, कायद्याचे राज्य, न्यायिक सुधारणा, अंतर्गत सुरक्षाविषयक उपाययोजना इत्यादी बाबी होत्या. वाटचालीचा हा आराखडा व रोडमॅप सादर करीत असताना त्याबरोबर त्यांनी स्वतः तयार केलेले एक भाषणवजा टिपणही जोडले होते. मूळ आराखड्यात एकूण साठ मुद्दे होते. वैयक्तिक टिपणात क्षी यांनी ११ मुद्दे अंतर्भूत केले. या टिपणात त्यांनी चीनमधील विकास संकल्पनेत महत्त्वाच्या त्रुटी आहेत, हे मान्य केले. विकास असंतुलित व अशाश्वत स्वरूपाचा आहे, त्याच्या विविध उपांगांत समन्वय नाही, हे ते मान्य करतात. काही राज्ये भरभराटीची, तर काही मागासलेली; ग्रामीण भागात गरिबी, तर शहरी भाग संपन्न.

चीनमधील इंटरनेटधारकांना २०१२-१३ पर्यंत अशी अशा होती की, इंटरनेटच्या वापराने सरकारवर दबाव निर्माण होईल आणि त्यातून भविष्यकाळात काही अनुकूल राजकीय बदल घडून येईल. मात्र क्षी जिनपिंग यांनी सरकारचे व पक्षाचे इंटरनेटवरील व त्याच्या माध्यमातून लोकांवरील नियंत्रण शाबूत ठेवले आहे. नव्हे, हे नियंत्रण अधिक प्रभावी केले आहे. इंटरनेटच्या उदाहरणावरून असे दिसेल की, आपल्या स्वप्नपूर्तीसाठी राजकीय अजेंड्याची अंमलबजावणी करताना क्षी यांनी स्वतःकडे अधिकार घेत चीनमधील लोकांच्या स्वातंत्र्याचा संकोच केला आहे. इंटरनेटव्यतिरिक्त इतर बाबी- सुरक्षा, कायद्याचे राज्य, आंतरराष्ट्रीय व्यापार, अंतर्गत सुरक्षा, परराष्ट्र धोरण, शेजारच्या राष्ट्रांशी संबंध- पाहिल्या तरी क्षी यांच्या कार्यपद्धतीत हाच पॅटर्न दिसून येईल.

श्रीमंत व गरीब यांच्यातील दरीही मोठी. पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक मोठी, मात्र दैनंदिन गरजेच्या उपभोग्य वस्तू व विविध प्रकारच्या सेवा मर्यादित प्रमाणात. आर्थिक विकास जलद, मात्र पर्यावरण अतिदूषित आणि ऊर्जेचा अतिरिक्त वापर!

क्षी यांच्या स्वतःच्या टिपणामुळे त्यांच्या राजकीय अजेंड्याचे दर्शन लोकांना झाले. क्षी यांचे चीनबद्दल एक स्वप्नही आहे. हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी काय करायचे, याचासुद्धा विचार आहे. नोव्हेंबर २०१२ मध्ये त्यांच्याकडे कम्युनिस्ट पक्षाच्या प्रमुख पदाची सूत्रे आली, तेव्हा त्यांनी चीनमधील नॅशनल म्युझियमला भेट दिली. त्या वेळी भविष्यातील चीनविषयी त्यांनी काही मते मांडली. ओपिअम युद्धानंतर १७० वर्षांनी चीनला एका उज्ज्वल भविष्याचे दर्शन होऊ लागले आहे. बलशाली चीन, त्याची गौरवशाली संस्कृती व समृद्ध परंपरा यांचे पुनरुज्जीवन करणे आणि चिनी माणसाला सुखी पाहणे हे क्षी जिनपिंग यांचे स्वप्न आहे.

चीनचे स्वप्न काय आहे वा असावे, याबाबत बरीच चर्चा चीनमध्ये व जगात सुरू असे. त्यात चिनी माणसाचे राहणीमान सुधारावे, आर्थिक विकास शाश्वत स्वरूपाचा असावा आणि भौतिक प्रगतीबरोबरच जनतेचे जीवन समाधानी असावे– अशीही संकल्पना असे. क्षी जिनपिंग यांनी सत्तेवर आल्यानंतर त्यांच्या स्वप्नाला मूर्त स्वरूप देण्यासाठी चीनची सर्व ध्येये-धोरणे या स्वप्नाशी निगडित केली. त्यांचे चीनचे स्वप्न या संकल्पनेत चार ढोबळ उद्दिष्टे दडलेली आहेत. राजकीय, आर्थिक, लष्करी, वैज्ञानिक व तंत्रज्ञान दृष्ट्या बलवान चीन हे पहिले उद्दिष्ट. समता, सामाजिक न्याय (fairness), समृद्ध संस्कृती व उच्च नीतिमत्ता यांचे प्राबल्य असणारा चीन हे दुसरे उद्दिष्ट. तिसरे– समाजाच्या विविध वर्गांत संवाद निर्माण करणारा सुसंवादी चीन घडविणे. आणि चौथे उद्दिष्ट म्हणजे– उत्तम पर्यावरण व निसर्गाने बहरलेला सुंदर चीन निर्माण करणे. हु जिंताव यांनी त्यांच्या कार्यकाळात शास्त्रीय विकास विचार मांडला होता. त्यात मार्क्सिस्ट विचारसरणीतून शाश्वत विकास साधून सुसंवादी समाज निर्माण करण्याची संकल्पना होती. या संकल्पनेच्या संदर्भात ठरविलेल्या उद्दिष्टानुसार २०१० पासून २०२० पर्यंत १० वर्षांत चीनचे उत्पन्न दुप्पट करायचे होते. क्षी यांनी त्यांच्या स्वप्नातील भावी चीनचे दोन महत्त्वाचे टप्पे कल्पिले आहेत. चीनमधील कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेला २०२१ मध्ये १०० वर्षे होत आहेत. पक्षाच्या या १०० व्या वर्धापन वर्षापर्यंत चिनी समाज काही प्रमाणात सधन व्हावा आणि सामान्य माणसाच्या मूलभूत गरजा पूर्ण व्हाव्यात, हा पहिला टप्पा. चिनी प्रजासत्ताकच्या स्थापनेला २०४९ मध्ये१०० वर्षे पूर्ण होतील. त्या वर्षात चीन पूर्ण विकसित आणि उच्च उत्पन्न गटातला सर्व बाबतींत प्रगत देश असेल, हा दुसरा टप्पा. या टप्प्यात चीन जगातले सर्वांत शक्तिशाली राष्ट्र असेल.

क्षी जिनपिंग यांना त्यांच्या कार्यक्रमातून विकासातील असमतोल दूर करायचा आहे, तसेच जीवन अधिक सुसह्य करायचे आहे. रचनात्मक व मोठ्या आर्थिक-प्रशासकीय सुधारणा करायच्या आहेत. भ्रष्टाचार निर्मूलन हा त्यांच्या कार्यक्रमातील सर्वांत महत्त्वाचा भाग आहे. पक्षाच्या लोकांप्रति असलेल्या बांधिलकीला त्यांना महत्त्व द्यायचे आहे. जागतिक महासत्तेला शोभेल असे मोठे, प्रभावी सैन्यदलही उभारायचे आहे. राजकीय स्थैर्यासाठी कार्यक्षम अंतर्गत सुरक्षाव्यवस्था उभारायची आहे. क्षी यांचे चीनबद्दलचे मोठे स्वप्न आणि त्यांच्या अकरा कलमी कार्यक्रमातून त्यांचा राजकीय अजेंडा स्पष्ट होतो. क्षी त्यांचे स्वप्न आणि त्यांची धोरणे हे सुबत्तेकडे नेणारे कार्यक्रम वाटले; तरी प्रत्यक्षात धोरणे राबविताना सरकारवर, पक्षावर, राजकारणावर, समाजकारणावर व अर्थकारणावर क्षी आपली पकड अधिकाधिक मजबूत करीत आहेत. या प्रक्रियेत त्यांनी सर्व सूत्रे स्वतःकडे ठेवली आहेत. त्यांचे विशेष महत्त्वाचे व आवडते कार्यक्रम म्हणजे अंतर्गत सुरक्षाव्यवस्था, भ्रष्टाचारविरोधातील मोहीम, इंटरनेटवरील नियंत्रण आणि कायदेविषयक सुधारणा. मात्र त्यांच्या या कार्यक्रमांमुळे चीनमधील लोकांचे राजकीय व अभिव्यक्ती-स्वातंत्र्य आक्रसते आहे. अधिक राजकीय स्वातंत्र्याची अपेक्षा करणाऱ्या वाढत्या सधन मध्यमवर्गाला याचा जाच वाटतो. विशेषतः तिबेट, शिंजियांग व हाँगकाँग येथील जनता आणि चीनमधील बुद्धिमंत व सिव्हिल सोसायटी ॲक्टिव्हिस्ट या मुद्यावर सरकारच्या दडपशाहीविरोधात उभे राहण्याची तयारी दाखवितात. दुसऱ्या बाजूला चीनच्या महत्त्वाकांक्षी सुरक्षा व परराष्ट्र धोरणामुळे– विशेषतः अनेकदा अनावश्यक शक्तिप्रदर्शन केल्याने– जगातील इतर देशही चीनकडे संशयाने पाहायला लागले आहेत. एकंदरीतच क्षी जिनपिंग यांची धोरणे व ती राबविण्याची त्यांची पद्धत चीनच्या गेल्या तीस-चाळीस वर्षांतील

नेतृत्वाच्या धोरणांपेक्षा अधिक आक्रमक आहे. त्याचे काही वैशिष्ट्यपूर्ण परिणाम चीनवर, चीनच्या शेजारी देशांवर व त्याच्याशी संबधित असणाऱ्या जगभरातील देशांवर होत आहेतच; शिवाय चीनकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावरही त्याचा परिणाम होतो आहे. म्हणूनच क्षी यांची धोरणे अभ्यासणे गरजेचे आहे. या आणि यानंतरच्या काही लेखांत त्यांच्या महत्त्वाच्या धोरणांवर आणि कार्यक्रमांवर दृष्टिक्षेप टाकला आहे. येथे क्षी यांच्या इंटरनेटविषयक धोरणावर थोडक्यात चर्चा केली आहे.

इंटरनेटमुळे व्यवसाय, बँकिंग, अर्थव्यवस्थेतील संस्था, सरकारी संस्था, लोकांना विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करून देणाऱ्या संस्था या साऱ्याच अनेक पटीने कार्यक्षम होतात, हे खरेच. सरकार व गव्हर्नन्समध्ये पारदर्शकताही येते. मात्र त्याचबरोबर तत्काळ होणारे संदेशवहन, सोशल मीडियावर काही सेकंदांत व्हायरल होणारी चित्रे, मांडले जाणारे मुद्दे, यामुळे इंटरनेट हे सरकारवर दबाव निर्माण करणारे व विरोधी विचार व्यक्त करण्याचे महत्त्वाचे व्यासपीठही आहे; विरोधकांच्या हातातील प्रभावी हत्यार आहे. जगात इंटरनेटधारकांची संख्या चीनमध्ये सर्वांत जास्त आहे. चीनमध्ये ७५ कोटींहून अधिक लोक इंटरनेटचा वापर करतात. फेसबुक व गुगलचे चीनमध्ये अस्तित्व नाही. त्यांच्याकडे वेझिन (Weixin) आणि वेइबो (Weibo) या मोठ्या वापराच्या सोशल मीडिया साईट्स आहेत. वेझिन हे वेचॅटचे चिनी स्वरूप असून वेइबो हे ट्वीटरसारखे चिनी समाजमाध्यम आहे. ७०-७५ कोटी लोक वेझिन वापरतात तर ५० कोटी लोक वेइबो वापरतात.

पहिला ई-मेल १९८७ मध्ये पाठवून आणि १९९५ मध्ये सरकार व उच्च शिक्षणाच्या संस्थांमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देऊन चीनने इंटरनेटच्या जगात प्रवेश केला. इंटरनेटकडे बघण्याचा सरकारचा दृष्टिकोन २००० नंतर मात्र अधिकाधिक संकुचित होऊ लागला. सरकारच्या दृष्टीने चायना नेट किंवा चिनी इंटरनेट हे राजकीय व अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे माध्यम, कारण त्यातूनच राजकीय असहमती किंवा डिसेंट निर्माण करून समाजात थोडी अस्वस्थता निर्माण करता येते. इंटरनेटवर जलद संदेश-वहनामुळे समविचारी लोकांचे समूह तयार होऊन लोकमताचा रेटा तयार होतो. याला चिनी सरकार घाबरते. चीनमध्ये १९९० च्या दशकापासून उच्च शिक्षण व इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. अनेक




प्रकारचे समूह व वैचारिक ग्रुप्स १९९० मध्ये तयार झाले. त्यातील जे त्रासदायक व समाजाला विघातक होते, त्यांचा बंदोबस्त केला गेला; परंतु जे ग्रुप्स केवळ काही मागण्या आणि राजकीय वा इतर सुधारणांचा आग्रह धरीत होते, त्यांचे काम सुरळीत सुरू होते. उदाहरणार्थ- २००८ मध्ये बीजिंगसारख्या मोठ्या शहरात जिथे हवेतील प्रदूषण घातक प्रमाणावर वाढले, तेव्हा इंटरनेट व ट्वीटरवरून अनेक ग्रुप्स त्याबाबतची माहिती प्रस्तुत करून, त्याबद्दलची सामाजिक जाणीव निर्माण करून सरकारला याबाबत कार्यवाही करण्याबाबत दबाव निर्माण करीत होते. अमेरिकन दूतावासातून त्यांच्या कर्मचाऱ्यांना कार्यालयात येणे सुकर व्हावे म्हणून ट्वीटरवरून प्रदूषणपातळीची माहिती करून दिली जात असे. 'पीपल्स डेली' या सरकारी वृत्तपत्राने येणाऱ्या ई-मेल्सचे वर्गीकरण करून ज्या ठिकाणी सरकारने काही कार्यवाही करणे आवश्यक आहे, त्याबद्दल सरकारला माहिती देणे सुरू केले. त्याचा फायदा असा झाला की, प्रदूषणाविरोधात एक सार्वजनिक मोहीमच जणू निर्माण झाली. सरकारने याबाबत कितीही लपवाछपवी करण्याचा प्रयत्न केला, तरी हे अनौपचारिक दबाव गट सरकारला उघडे पाडीत. त्या काळात कोणत्याही महत्त्वाच्या

सार्वजनिक बाबींवर जनमत तयार करणे, सरकारला फीडबॅक देणे– सरकारच्या चांगल्या आणि सकारात्मक धोरणांची जनतेला माहिती देणे हे सुरू झाले. चांगल्या प्रशासनासाठी व गव्हर्नन्ससाठी हे पूरक होते. एकंदरीतच सुरुवातीला इंटरनेटमुळे चिनी प्रशासन अधिक पारदर्शी होईल, अशी परिस्थिती होती.

फेब्रुवारी २००९ मध्ये दक्षिण चीनमधील युनान प्रांतातील ली शिओमिंग या २४ वर्षीय शेतकऱ्याचा पोलीस कस्टडीत मृत्यू झाला. त्याचा मृत्यू आंधळी कोशिंबीरसारखा खेळ खेळताना झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. परंतु हा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीत झाला, असे स्थानिक चौकशीत उघड झाल्याने ही बाब नेटवर व्हायरल झाली आणि सत्तर हजार नेटिझन्सनी यावर होणाऱ्या चर्चेत भाग घेतला. बहुसंख्य ८७ टक्के लोकांनी ते या बाबतीत सरकारवर विश्वास ठेवणार नाहीत, अशी भूमिका घेतली. शेवटी प्रकरण इतके वाढले की, सरकारी अधिकारी व नागरिक यांची समिती नेमून चौकशी करावी लागली. त्यामुळे दोन पोलीस आणि त्या तुरुंगातील तीन कैदी दोषी सापडले. त्यांना शिक्षा झाली. अशीच दुसरी घटना त्या वर्षात झाली. डेंग युजावो नावाची तरुण मुलगी हुबेई प्रांतातील एका हॉटेलमध्ये काम करीत असे. पक्षाच्या एका पदाधिकाऱ्याने तिच्यावर बलात्काराचा प्रयत्न केला, तेव्हा तिने त्याचा खून केला. पोलिसांनी प्रथम हे प्रकरण दाबून टाकले आणि त्या मुलीला वेड्यांच्या इस्पितळात डांबले. हे प्रकरण तत्काळ व्हायरल झाले आणि यथावकाश यातील साऱ्या बाबी लोकांच्या पुढे आल्या. कोर्टाने असा निकाल दिला की, झालेली हत्या ही त्या मुलीकडून स्वतःचे संरक्षण करताना झाली आणि ती कोर्टातून सुटली.

अशा प्रकरणांमुळे हु जिंताव यांच्या काळात इंटरनेटचा चांगला सामाजिक दबाव निर्माण झाला आणि सिव्हिल सोसायटीला बळ मिळू लागले. सरकारवर दबाव निर्माण करणारे ग्रुप्स तयार होऊ लागले. दरम्यानच्या काळात सरकारी कामकाजातही इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्याने सरकार व सिव्हिल सोसायटी अनेकदा एकत्र काम करीत असल्याचे दिसू लागले. २००८ मध्ये झालेल्या प्रचंड भूकंपात इंटरनेटमुळे, समाजमाध्यमांमुळे संघटन व मदतकार्य उत्तम रीतीने करता आले. पक्षालाही कळून चुकले की, इंटरनेटचा वापर करून पक्षाची व सरकारची मते व भूमिका लोकांपुढे नेता येते. त्यामुळे पक्षही लोकांशी इंटरनेटवरून संवाद करू लागला.

सिचुआन प्रांतात शिफांग येथे मोलिब्डेनम–कॉपरची मिश्र धातू रिफायनरी स्थापन करू नये, अशी चळवळ २०१२ मध्ये सुरू झाली; कारण त्यामुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होणार होते. सरकार हा प्रकल्प पुढे रेटू पाहत होते. याविरोधात इंटरनेटवर निदर्शने सुरू झाली. वेइबो या चिनी सोशल मीडिया साईटवर ५.५ लाख पोस्ट्स चार दिवसांत दिसून आल्या. पारंपरिक माध्यमातून याचा मागमूसही नव्हता, मात्र इंटरनेट पेटून उठले होते. शेवटी लोकांच्या रेट्यापुढे हा प्रकल्प मागे घ्यावा लागला. पुढे २००९ मध्ये शिंजियांगमधील उठावात व त्यातील निदर्शनांमध्ये निदर्शकांनी परस्परांशी संपर्क साधण्यासाठी फेसबुकचा वापर केल्याचे दिसून आले. फेसबुकवर बंदी आलीच; परंतु या घटनांनी इंटरनेटवर अधिक नियंत्रण आणावे, असा विचार सुरू झाला.

हु जिंताव यांच्या कारकिर्दीतील शेवटच्या टप्प्यात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे घडली. चीनमधील अनेक भागांत सशस्त्र उठाव व राजकीय बंडाळी सुरू झाली. त्यामुळे सरकारला इंटरनेटचा जाच होऊ लागला. सरकारवरील दडपणही वाढू लागले. पुढे २०११ मध्ये मध्य–पूर्वेतील इजिप्त व इतर देशांत क्रांतीसदृश परिस्थिती निर्माण झाली. त्यात सरकारला जाब विचारणे हा महत्त्वाचा मुद्दा झाला. चीनमध्ये अशीच जस्मिन क्रांती सुरू करावी, अशा आशयाचे मेसेजेस फिरू लागले. हळूहळू इंटरनेटवर राजकीय मेसेजेस दिसू लागले. राजकीय संघटन करून निदर्शने करण्याची लक्षणे दिसताच सरकारने पोलीस यंत्रणा मोठ्या प्रमाणावर तैनात केली व अनेकांची धरपकड केली. चीनमध्येही सरकारविरोधात वातावरण तापू लागले. त्यात इंटरनेटने फार मोठी भूमिका बजावली. इंटरनेट अक्षरशः रणांगण झाले. तेव्हापासून सरकारने इंटरनेटवर नियंत्रण आणण्याचा विचार गंभीरपणे सुरू केला.

इंटरनेटवरील नियंत्रण आणि त्यासाठीच्या तांत्रिक व कायदेविषयक उपाययोजनांचा विचार चीनने १९९६–९७ पासूनच गंभीरपणे सुरू केला होता. फँग बिझिंग हे चिनी इंटरनेट क्षेत्रात मोठे नाव. त्याने इंटरनेट तांत्रिक क्षेत्रात बरेच काम करून सरकारला इंटरनेटवर नियंत्रण मिळवून देण्यासाठी तंत्रे शोधून काढली. गोल्डन शिल्डसारखी सॉफ्टवेअर्स आणि त्यातून उच्च क्षमतेची फायरवॉल व इतर नियंत्रणाची साधने निर्माण करून त्याने सरकारला नेटवर पूर्ण

नियंत्रण मिळवून दिले. पुढे चीन सरकारमध्ये फँग बिझिंगचे प्रस्थ फारच वाढले. त्याला ‘फादर ऑफ दि ग्रेट फायरवॉल’ असेच म्हणतात. ‘चिनी जनतेचे स्वातंत्र्य हिरावून घेणारा सरकारी हस्तक’ असे शब्द वापरून त्याला सोशल मीडियावर (वेइबो) छळले जात असे. इंटरनेटवर योग्य ती चिनी वैशिष्ट्ये असावीत, यासाठी सरकारने १९९६-९७ पासून कडक कायदे करायला सुरुवात केली. सर्व्हिस प्रोव्हायडर्सकडून चिनी सरकारला व कम्युनिस्ट पक्षाला व्यवस्थित नियंत्रण ठेवता येईल, अशा अटी व शर्तींवर सेवा घेतली. सुरुवातीच्या काळात गुगल व फेसबुक यांचे मोठे प्रस्थ चीनमध्ये होते. मात्र हु जिंताव यांच्या काळापासून गुगल व फेसबुक यांच्यावर अनेक बंधने लादायला सुरुवात झाली. तसेच स्वदेशी समाजमाध्यमे येऊ लागली. सरकारने २००४ मध्ये इंटरनेट सेन्सॉरशिपसाठी आणि नेटवरून होणाऱ्या राजकीय चर्चांना योग्य वळण देण्यासाठी विद्यापीठांमधून खास अधिकारी नेमण्यास सुरुवात केली. त्यामुळे सरकारविरोधात मतप्रदर्शन करणाऱ्या टीकाकारांना हुडकून काढून त्यांच्यावर कार्यवाही होऊ लागली. शिंजियांगमधील सरकारविरोधात कारवाया करणाऱ्या निदर्शकांनी २००९ मध्ये फेसबुकचा वापर केल्याचे निदर्शनास आल्यानंतर फेसबुकवर बंदी आली. गुगलने २००६ मध्ये गुगल.सीएन ही चीनसाठी खास सेवा सुरू केली. मात्र पुढे पुढे चिनी कंपन्यांची स्वतःची सेवा सुरू केली व परदेशी कंपन्यांवर बंधने आल्याने त्यांनी चीनमधून गाशा गुंडाळला.

क्षी जिनपिंग सत्तेत आल्यावर २०१३ नंतर काही ग्रुप्स राजकीय सुधारणांची मागणी करू लागले. वाढती सुबत्ता व वाढता सधन मध्यमवर्ग यामुळे इंटरनेट व सोशल मीडिया हे पक्षाला व सरकारला गंभीर आव्हान देऊ शकतील, याची कल्पना क्षी जिनपिंग यांना आली होती. त्यांनी अनेक बंधने घालीत, तंत्रज्ञानावर नियंत्रण प्रस्थापित करीत, गुगल-फेसबुकवर बंदी घालीत, फायरवॉल अधिक बळकट करीत इंटरनेटच ताब्यात घेतले. सुरुवातीला त्यांनी इंटरनेटचा फायदा करून घेत सोशल मीडियावर फॉलोअर्स निर्माण केले. प्रयत्नपूर्वक केलेले प्रतिमासंवर्धन आणि समाज-माध्यमांचा हुशारीने केलेला वापर यामुळे क्षी जिनपिंग यांचे चीनमध्ये मोठ्या संख्येने भक्त व फॉलोअर्स आहेत, फॅन्सचे क्लब्स आहेत. आदर्श जोडपे कसे असावे याचे उदाहरण क्षी जिनपिंग व पेंग लियून यांच्या जोडीवरून दिले जाते. फेसबुकवर बंदी असली तरी क्षी जिनपिंग यांची आंतरराष्ट्रीय छबी निर्माण करण्यासाठी नियंत्रित प्रमाणात फेसबुकचा वापर होतो. त्यांच्या दृष्टीने Wesin आणि Weibo ही दोन्ही चीनमधील समाजमाध्यमे ॲसेट्स होती. भ्रष्टाचार कोठे होतो, त्याबद्दलची माहिती गोळा करण्यासाठी त्यांच्या भ्रष्टाचारविरोधी मोहिमेत इंटरनेटचा वापर होत असे. तसेच भ्रष्टाचाराविरोधात कार्यवाही झाली की, ती या समाजमाध्यमातून व्हायरल होत असे.

चीनच्या सेन्ट्रल लीडिंग ग्रुप फॉर सायबरस्पेस अफेअर्स या इंटरनेटवर नियंत्रण ठेवणाऱ्या संघटनेचे/समितीचे प्रमुखपद क्षी यांनी २०१४ मध्ये स्वतःकडे घेतले. त्यानंतर त्यांनी इंटरनेट वापरावर अनेक निर्बंध टाकले. त्याबरोबर अस्तित्वात असलेल्या स्टेट इंटरनेट इन्फर्मेशन ऑफिसचे पुनरुज्जीवन करून ते बळकट केले. त्याचे प्रमुख लू वे यांनी इन्फर्मेशन सिक्युरिटी, इन्फर्मेशन कंट्रोल व इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी या उद्दिष्टांसाठी अधिक बंधने घालण्याचे काम सुरू केले. लू वे हे राजकीय दृष्ट्या अतिशय शक्तिशाली झाले. त्यांनी चीनमधील इंटरनेट पूर्णतः सरकार व पक्ष यांच्या नियंत्रणाखाली आणले आणि सेन्सॉरशिपचे कडक धोरण राबविले. पुढे २०१६ मध्ये चीनमध्ये शक्तिशाली राजकारणी व अधिकाऱ्यांचे जे होते, तेच लू वे यांचे झाले. नियंत्रणाचा अतिरेक झाल्याने पुढे त्यांच्यावर भ्रष्टाचार व सत्तेचा दुरुपयोग हे आरोप होऊन त्यांनाच तुरुंगात जावे लागले.

दक्षिण चीनमधील वुझ्हेन या छोट्या गावी डिसेंबर २०१५ मध्ये चीनची दुसरी जागतिक इंटरनेट कॉन्फरन्स भरली होती आणि तिथे क्षी जिनपिंग यांची इंटरनेटबद्दलची व्हिजन स्पष्ट झाली. कोणत्याही देशाचे इंटरनेटवर वर्चस्व असू नये, मात्र त्यांनी इतर देशांत ढवळाढवळही करू नये. देशांना व त्यांच्या सरकारांना त्यांच्या प्रथांनुसार इंटरनेटविषयीचे धोरण ठरवू द्यावे. सरकारचे स्वतःच्या लोकांशी असणारे नाते महत्त्वाचे आहे. लोकांना बाहेरील जगाशी संपर्क साधू देण्यास कितपत स्वातंत्र्य द्यावे, हेही महत्त्वाचे आहे. मात्र यासंबंधीचे निर्णय सरकार व प्रचलित व्यवस्थेने घ्यावेत. एकंदरीतच इंटरनेटवरील सर्व नियंत्रण सरकारकडेच राहील, अशी कार्यक्षम व्यवस्था क्षी यांनी केली आहे. इंटरनेटचा वापर उद्योगधंद्यांसाठी, ऑनलाईन मार्केटिंग, ई-कॉमर्स, शिक्षण व इतर प्रयोजनासाठी करावा; मात्र राजकीय असहमती दर्शविण्यासाठी वा त्याआधारे

संघटन करून मागण्या करणे, जनमत निर्माण करणे वा दबाव गट निर्माण करणे याला क्षींचा विरोध आहे. त्यामुळे सरकार दुबळे होते, असे त्यांना वाटते. त्यातून फार सर्जनशील अभिव्यक्ती होऊ नये, सिव्हिल सोसायटी निर्माण होऊन राजकीय अडचणी वाढू नयेत, असे त्यांना वाटते. चिनी इतिहासात मोठ्या साम्राज्यांची एक परंपरा आहे. सर्वच काळातील राज्यसंस्थांनी लोकांच्या अभिव्यक्तीवर व माहितीच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवले होते. आजचे राज्यकर्ते तेच करीत आहेत.

बायडूसारखे स्वदेशी सर्च इंजिन आणि इतर स्वदेशी समाजमाध्यमांचा वाढता वापर करून, गुगल/फेसबुकवर बंदी घालीत क्षी जिनपिंग यांनी इंटरनेटचे, सोशल मीडियाचे पूर्ण स्वदेशीकरण करून टाकले आहे. शिवाय सरकारचे/पक्षाचे मोठे नियंत्रण इंटरनेट व त्यासंबंधीच्या सर्व उद्योगांवर आहे. इंटरनेटमुळे कम्युनिस्ट पक्ष आणि सरकार लोकांवर व त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवू शकते. लोकांची मते, त्यांचे विचार व त्यांना भावणारे अग्रक्रम अजमावू शकते आणि धोरणआखणी व इतर कारवाईही करू शकते. अभेद्य फायरवॉलच्या साह्याने माहितीच्या 'फ्लो'वर नियंत्रण ठेवून पाश्चिमात्य व इतर देशांतील विचार चीनच्या सामान्य माणसांपर्यंत पोहोचू देत नाही. VPN चा वापर चीनमधील खासगी कंपन्या, मोठ्या बँक्स आणि बहुराष्ट्रीय कंपन्या करतात. नवीन तंत्रज्ञानाचा २०१५ मध्ये वापर करीत क्षी यांच्या सरकारने व्हर्चुअल प्रायव्हेट नेटवर्क्स (VPN) सुद्धा ब्लॉक करून टाकले. त्यामुळे त्यांनाही देशाबाहेरच्या वेबसाईट्स पाहता येणे अशक्य झाले. याशिवाय क्षी यांना सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमातून सर्वच लोकांशी थेट संवाद प्रस्थापित करता येतो, त्यांच्यावर प्रभाव टाकता येतो. इंटरनेटवरील कंटेंटवरही त्यांनी कडक नियंत्रण ठेवले आहे. इंटरनेट नियंत्रण व कंटेंट सेन्सॉर करण्यासाठी चिनी सरकारने २० लाख लोकांची फौज ठेवली आहे. समाजवाद, राष्ट्रीय हित, नागरिकांचे मूलभूत हक्क, कायदा व सुव्यवस्था, नैतिकता इत्यादी पक्षाला जे काही महत्त्वाचे वाटतात, तेच कंटेंट इंटरनेटवर येऊ शकतात. अलीकडे तर क्षी जिनपिंग यांच्या काळात इंटरनेटचा उपयोग अंतर्गत सुरक्षेसाठी- विशेषतः लोकांवर पाळत ठेवण्यासाठी- फेस रेकग्निशनसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी होत आहे. इंटरनेट सॉव्हर्निटी हा शब्दप्रयोग चीनने २०१० मध्ये केला, तरी क्षी यांच्या कारकिर्दीत त्याला अर्थ प्राप्त होतो आहे. त्यानुसार चिनी बाजारपेठांमध्ये चिनी स्वदेशी इंटरनेट कंपन्यांनाच प्राधान्य देण्याचा विचार आहे. पाश्चिमात्यांकडून सर्व काही शिकून घेऊन, त्यांच्या कंपन्यांना बाहेरचा रस्ता दाखवून आपल्याच बायडू, टेनसेंट, रेनरेन या इंटरनेट कंपन्यांना चीनमध्ये स्थिरावू देण्याची चीनची व्यूहनीती आहे. अमेरिका व चीनमध्ये सुरू असलेल्या व्यापारयुद्धात इतर मुद्यांबरोबर हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

क्षी यांच्या धोरणामुळे चीनला हवे असणारे राजकीय स्थैर्य कसेबसे मिळू शकेलही; परंतु दीर्घ मुदतीत या भूमिकेत चीनचे नुकसानही आहे. जागतिक माहितीचा, संकल्पनांचा, इतर घडामोडींचा फ्लो एकदा नाकारला की संशोधन, नव्या सर्जनशील संकल्पना, प्रयोगशीलता यावरही विपरीत परिणाम होतो. शिवाय इतक्या कडक इंटरनेट बंधनांमुळे चिनी सरकारची, त्यांच्या माहितीची विश्वासार्हता कमी होते, हे वास्तवही चीन अनुभवीत आहे. सरकारविरोधात अनेक प्रकारचे नेटिझन्सचे गट कार्यरत होत राहतात, हेही वास्तव आहे.

चीनमधील इंटरनेटधारकांना २०१२-१३ पर्यंत अशी अशा होती की, इंटरनेटच्या वापराने सरकारवर दबाव निर्माण होईल आणि त्यातून भविष्यकाळात काही अनुकूल राजकीय बदल घडून येईल. मात्र क्षी जिनपिंग यांनी सरकारचे व पक्षाचे इंटरनेटवरील व त्याच्या माध्यमातून लोकांवरील नियंत्रण शाबूत ठेवले आहे. नव्हे, हे नियंत्रण अधिक प्रभावी केले आहे.

इंटरनेटच्या उदाहरणावरून असे दिसेल की, आपल्या स्वप्नपूर्तीसाठी राजकीय अजेंड्याची अंमलबजावणी करताना क्षी यांनी स्वतःकडे अधिकार घेत चीनमधील लोकांच्या स्वातंत्र्याचा संकोच केला आहे. इंटरनेटव्यतिरिक्त इतर बाबी- सुरक्षा, कायद्याचे राज्य, आंतरराष्ट्रीय व्यापार, अंतर्गत सुरक्षा, परराष्ट्र धोरण, शेजारच्या राष्ट्रांशी संबंध- पाहिल्या तरी क्षी यांच्या कार्यपद्धतीत हाच पॅटर्न दिसून येईल.

(क्रमशः)

**डॉ. सतीश बागल,** नाशिक
bagals89@gmail.com
Mob. 9820864755

मागोवा

दिनेश पाटील

# गंगारामभाऊ म्हस्के : मराठ्यांचा 'अलक्षित' महानायक

महापुरुष स्वतंत्रपणे अभ्यासण्याच्या आपल्या परंपरेमुळे आपले किती नुकसान होते याचे आत्मपरीक्षण करण्यासाठी तावडेंचे वरील चिंतन फारच उपकारक ठरेल. कारण डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या कार्याचा इतिहास महाराष्ट्राबाहेर बडोद्यात गेल्याशिवाय आपल्याला कळत नाही. १८८५ ला सयाजीरावांनी म्हस्केंना आर्थिक मदत सुरू केली. त्यानंतर लगेच जानेवारी १८८६ ला खासेरावांना लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणाले होते की, या मदतीने आमचे हेतू पूर्ण होण्यास फायदा होईल. आज १४४ वर्षांनंतर आपण जेव्हा महाराजांच्या या पत्राचे वाचन करतो तेव्हा महाराजांचा तो निर्णय किती क्रांतिकारक होता याचा साक्षात्कार होतो. गंगारामभाऊंच्या नेतृत्वाने महाराष्ट्रातील मराठ्यांच्या शैक्षणिक क्रांतीचा 'पाया' घातला. या पायातील 'दगड माती' बडोद्यातून आली होती. हा इतिहास महाराष्ट्रातील बहुजनांमध्ये 'चैतन्याचे झरे' फुलवेल असा आहे.

गंगारामभाऊ म्हस्के हा आधुनिक महाराष्ट्रातील पूर्णतः अलक्षित महानायक आहे. माझे हे विधान महाराष्ट्रातील इतिहास संशोधक, चळवळीतील बुद्धिजीवी आणि शिक्षित वर्गाला चक्रावून सोडेल. परंतु आजच्या मराठा आरक्षण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात मराठ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सर्वाधिक योगदान देणाऱ्या गंगारामभाऊंचे पुनर्वाचन हे मराठ्यांबरोबर बुद्धिजीवींसाठी अनिवार्य आहे. गंगारामभाऊ हे सत्यशोधक समाजाचे सदस्य आणि हितचिंतक होते. म्हस्केंनी पुण्यामध्ये मराठा जातीतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याच्या उद्देशाने १८८५ मध्ये डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन ही संस्था स्थापन केली. मराठ्यांच्या शैक्षणिक उन्नतीचा विकास तपासला असता, जवळजवळ सर्व ज्ञानशाखांतील मराठ्यांमधील पदवीधरांची पहिली पिढी गंगारामभाऊंच्या शिष्यवृत्तीवर शिकलेली होती. इतकेच नव्हे तर बडोदा, ग्वाल्हेर, इंदोर, कोल्हापूर या महत्त्वाच्या संस्थानांमधील प्रशासनात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळणारे बहुतेक उच्चशिक्षित मराठे हे गंगारामभाऊंचे बौद्धिक 'उत्पादन' होते.

गंगारामभाऊंच्या शिष्यवृत्तीवर शिकलेल्या महाराष्ट्रातील कर्तबगार लोकांची यादी हजारांत जाईल. १८८३ ते १९३५ या ५२ वर्षांत त्यांच्या शिष्यवृत्तीद्वारे ३३८ मराठे पदवीधर झाले. आजही ही संस्था कार्यरत आहे. तिचा पत्ता पुढीलप्रमाणे– ९९१, म्हस्के स्मारक मंदिर, हिरा बाग, लोकमान्य बाळगंगाधर टिळक रोड, सारस्वत सह. बँकेच्या वर, शुक्रवार पेठ, पुणे. बहुजनांच्या शिक्षणासाठी १८८५ पासून आजअखेर १३५ वर्षे कार्यरत महाराष्ट्रात किती संस्था आहेत? हा मुद्दासुद्धा विचार करण्यासारखा आहे. परंतु महाराष्ट्रात याबाबत पूर्ण अज्ञान असल्यामुळे म्हस्केंचे योगदान महाराष्ट्राला माहिती नाही आणि बगाडेंसारखे संशोधक गंगारामभाऊंवर अन्याय करताना दिसतात. विठ्ठल रामजी शिंदे, भास्करराव जाधव, वासुदेव लिंगाजी बिर्जे, पांडुरंग चिमाजी पाटील, रामचंद्र शामराव माने–पाटील, दाजीराव विचारे, शाहू महाराजांनी करवीरपीठाचे क्षात्रगुरू म्हणून ज्यांची नेमणूक केली ते

सदाशिव पाटील बेनाडीकर, दत्तात्रय रामचंद्र भोसले, सीताराम तावडे, इतिहास संशोधक डॉ.अप्पासाहेब पवार यांसारखे शेकडो कर्तबगार लोक त्यांच्या शिष्यवृत्तीमुळे पुरोगामी महाराष्ट्र घडवू शकले याचे भान आपल्याला ठेवावे लागेल. या लोकांनी केलेले शैक्षणिक कार्य मराठ्यांबरोबर अस्पृश्य जातींच्या उद्धारालाही उपकारक ठरले आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पन्नास वर्षांपूर्वी सुरू झालेल्या अनेक शिक्षण संस्थांचे सूत्रधार हे गंगारामभाऊंच्या दातृत्वाचे लाभार्थी आहेत. त्यामुळेच महाराष्ट्रातील बहुजनांनी त्यांच्याप्रती कृतज्ञता ठेवणे गरजेचे आहे. यासंदर्भात ८५ वर्षांपूर्वी शिक्षणतज्ज्ञ सीताराम तावडे यांनी म्हस्केंच्या कार्याचे मूल्यमापन करताना काढलेला निष्कर्ष आजही चिंतनीय आहे. तावडे म्हणतात, 'मराठा समाजात आज जी शैक्षणिक जागृती दिसत आहे, त्याचे सर्व श्रेय कै.गंगारामभाऊ म्हस्के यांना आहे.'

ज्याप्रमाणे विठ्ठल रामजी शिंदे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कामाची पार्श्वभूमी तयार केली, त्याचप्रमाणे गंगारामभाऊंनी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कामासाठी जमीन नांगरून ठेवली. लोकसंख्येत तसेच सामाजिक आणि राजकीय नेतृत्वात आघाडीवर असणाऱ्या मराठा जातीच्या उन्नतीसाठी पायाभूत काम केलेल्या गंगारामभाऊ म्हस्केंचे नावही आज महाराष्ट्रात कुणाला माहीत नाही. म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राचा 'तुटलेला' इतिहास 'जोडून' तातडीने अभ्यासण्याची गरज आहे. सयाजीराव गायकवाड यांचे या संस्थेला स्थापनेपासूनच सर्वाधिक आर्थिक साह्य होते. या संस्थेची स्थापना करण्याचे निश्चित झाल्याबरोबर गंगारामभाऊंनी आर्थिक साह्यासाठी सयाजीरावांची मदत घेण्याचे ठरवले. १८८१ मध्ये महाराजांनी राज्यकारभार हाती घेतला. पुढे लगेचच १८८३-८४ ला म्हस्केंनी आर्थिक मदतीसाठी सयाजीरावांची भेट घेतली असावी. यासंदर्भात सीताराम तारकुंडे म्हणतात, श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांची स्वारी पुणे मुक्कामी आली होती. श्रीमंताकडे रा.ब. महादेव गोविंद रानडे, रा.रा.गंगाराम म्हस्के, वकील रा.रा.राजन्ना लिंगू व आणखी दोन तीन सभ्य गृहस्थ यांचे डेप्युटेशन गेले. रा.ब.रानड्यांनी गायकवाड सरकारास डेप्युटेशचा उद्देश सांगितला. डेप्युटेशनचा उद्देश हा होता की, मराठे लोकांची, त्यांस विद्या नसल्यामुळे किती शोचनीय स्थिती झाली आहे हे श्रीमंतास विदित आहेच. तरी मराठ्यांच्या गरीब व होतकरू मुलांस हायस्कुलाचे शिक्षण मिळण्याकरता त्यांस स्कॉलरशिप दिल्या पाहिजेत. या कामाकरता आम्ही फंड काढला आहे, त्यास श्रीमंतांनी हातभार लावावा.

सयाजीरावांनी या शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेऊन अर्थसहाय्य सुरू केले. या संस्थेचे महाराष्ट्रासाठीचे महत्त्व ओळखून १८८५ पासून ते १९३९ पर्यंत अशी ५४ वर्षे अखंडपणे आर्थिक पाठबळ सयाजीरावांनी दिले. ही मदत ५ लाख २९ हजार ५५६ रुपये इतकी होती. आजच्या रुपयाच्या दरात या रकमेचे कमीतकमी मूल्य ७२ कोटी ४५ लाखांहून अधिक होईल. मराठा जातीच्या शैक्षणिक उन्नतीसाठी आधुनिक काळात सयाजीरावांनी जेवढे प्रयत्न केले, तेवढे आजतागायत कोणीही केलेले नाहीत. यामध्ये गंगारामभाऊंची डेक्कन मराठा असोसिएशन हे एक प्रमुख माध्यम होते. यासंदर्भात २३ जानेवारी १८८६ ला खासेराव जाधवांना लंडनला लिहिलेल्या पत्रात सयाजीराव म्हणतात, 'आपल्या समाजाला शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून पुण्यात स्थापन झालेल्या एका मराठा संस्थेला आम्ही दरमहा दोनशे रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे. आमचा हेतू पूर्ण होण्याच्या दृष्टीने ते अनुदान उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे

म्हस्केंचा जन्म नाशिक जिल्ह्यातील ओढे रंगराव या गावात १८३१ मध्ये झाला. त्यांचे वडील घरच्या गरिबीमुळे पोटापाण्याच्या शोधात पुण्यात आले, तेथे ते हमालीचे काम करत होते. गंगारामभाऊंचे शिक्षण पुण्यातील मिशन शाळेत झाले. शिक्षण झाल्यावर त्यांनी छोट्यामोठ्या नोकऱ्या केल्या. पुणे कँटोन्मेंट मॅजिस्ट्रेटचे शिरस्तेदार म्हणून त्यांना नोकरी मिळाली. याचदरम्यान त्यांनी वकिलीचे शिक्षण घेतले. १८७६ मध्ये त्यांनी पुण्यात वकिली सुरू केली. वकिलीच्या व्यवसायात मोठा लौकिक आणि चांगला पैसा त्यांनी मिळवला. १८७३ मध्ये फुल्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे ते स्थापनेपासूनच सदस्य आणि हितचिंतक होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत त्यांचा प्रमुख सहभाग होता. पुणे येथील कॅम्प एज्युकेशन सोसायटी त्यांच्याच पुढाकाराने स्थापन झाली. १९०१ मध्ये विषमज्वराने त्यांचा बळी घेतला. न्यायमूर्ती रानडे आणि गंगारामभाऊ यांची मैत्री होती. डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेवेळी रानडे आणि सत्यशोधक राजन्ना लिंगू ही प्रमुख मंडळी त्यांच्याबरोबर



गंगारामभाऊ म्हस्के



सयाजीराव गायकवाड

होती. १८८० च्या जनगणना अहवालात मराठा जात शैक्षणिक क्षेत्रात मागास असल्याचे त्यांना आढळले. म्हणूनच त्यांनी १८८४ मध्ये सर डब्ल्यु. वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखाली मराठा जातीच्या शैक्षणिक प्रगतीबाबत चर्चा करण्यासाठी सभा भरवली. पुढे १८८५ ला डेक्कन मराठा एज्युकेशन संस्थेची स्थापना झाली. स्थापनेपासूनच सयाजीरावांनी या संस्थेला २४०० रुपयाचे वर्षासन दिले होते. कोल्हापूरच्या शाहू महाराजांनीही पुढे या संस्थेस आर्थिक साह्य केले होते. यासंदर्भात डॉ.रमेश जाधव म्हणतात, न्या.रानडे यांच्या प्रेरणेने मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्यासाठी 'डेक्कन मराठा एज्युकेशन असोशिएशन' निर्माण झाली होती. या संस्थेचे प्रमुख गंगारामभाऊ म्हस्के हे होते. म्हस्के यांच्या विनंतीवरूनच शाहू छत्रपतींनी या संस्थेला कोल्हापूर दरबारमार्फत ३० रुपयांचे वर्षासन मंजूर केले होते.

न्या.रानडे, गोपाळकृष्ण गोखले आणि बाळ गंगाधर टिळक हे पुण्यातील तीन महत्त्वाचे नेते गंगारामभाऊंचा वारंवार सल्ला घेत. गंगारामभाऊ म्हस्के हे किती मोठे होते हे समजण्यासाठी वरील उदाहरण पुरेसे आहे. महाराष्ट्रातील एक महान पण दुर्लक्षित सुधारक विठ्ठल रामजी शिंदे यांच्या फर्ग्युसन कॉलेजमधील शिक्षणासाठीसुद्धा गंगारामभाऊंच्या डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटीची शिष्यवृत्ती होती. १८९३ पासून पहिली तीन वर्ष म्हस्केंची दरमहा १० रुपये शिष्यवृत्ती आणि १८९६ पासून पुढे पाच वर्ष सयाजीरावांच्या दरमहा २५ रुपयांच्या शिष्यवृत्तीवर शिंद्यांचे शिक्षण झाले होते. शिष्यवृती मिळवण्यासाठी शिंदे जेव्हा पहिल्यांदा म्हस्केंना भेटायला गेले तेव्हाची आठवण शिंदेंनी आपल्या आत्मचरित्रात नोंदवली आहे. शिंदे म्हणतात, 'गंगारामभाऊ म्हस्के ह्या गृहस्थाचे मराठा जातीवर मोठे उपकार आहेत. त्या काळचे एक फर्डे इंग्रजी शिकलेले, सुधारकी बाण्याचे हुशार वकील अशी त्यांची प्रसिद्धी होती. पुणे लष्करात मेन स्ट्रीटवर त्यांचे मोठे चांगले स्वतःचे घर आहे. रानडे-भांडारकर वगैरेंसारखी त्या काळच्या सुधारक पक्षात त्यांची चांगली मान्यता होती. वकिलीत त्यांनी बरेच पैसे मिळवले होते. हिराबागेत असलेल्या कॉस्मोपॉलिटन क्लबच्या दिवाणखान्यात पुण्याच्या तत्कालीन मोठमोठ्या माणसांच्या तैल-तसबिरी टांगल्या आहेत, त्यात त्यांचीही एक तसबीर अद्याप लटकत आहे. त्यांची मराठा संस्थानिक, राजे व इतर जातीचे प्रागतिक शिक्षणप्रेमी श्रीमंत गृहस्थ यांच्यामध्ये त्या काळी छाप होती.

शिंदेंच्या मनावर पहिल्या भेटीत म्हस्केंचा पडलेला

प्रभाव त्यांच्यावरील आठवणीतून व्यक्त होतो. याबरोबरच मराठा जातीवर त्यांचे असणारे उपकार याचीही कल्पना येते. पुण्यासारख्या शहरात त्या काळात मराठा जातीतील व्यक्तीने आपला प्रभाव कसा निर्माण केला असेल आणि पहिल्या भेटीतील आकलनापेक्षा आपल्याला पुण्याची सर्व माहिती झाल्यानंतर त्यांच्या योग्यतेची कशी कल्पना आली याबद्दल शिंदे पुढे लिहितात, त्या काळात मराठ्यांत इतका इंग्रजी शिकलेला गृहस्थ हा एकटाच होता. इतकेच नव्हे तर ते वकिलीतही बरेच पुढारलेले आणि तत्कालीन नागरिकांत मान्यता पावलेले होते. हे माझ्या तेव्हा लक्षात आले नाही. कारण ही तुलना करण्याइतकी माझी पुण्याची माहिती नव्हती. ज्या म्हस्केसाहेबांच्या प्रयत्नाने आज शेकडो मराठे पदवीधर झाले, त्यापैकी एकही आज पुण्यातल्या समाजात अशा मान्यतेने राहात नाही. म्हस्केसाहेब त्यावेळी कसे राहू शकले ही मननीय गोष्ट आहे.

राजर्षी शाहूमहाराजांचा म्हस्केंशी पत्रव्यवहार होता. वसतिगृह, शिक्षण आणि संस्थानी प्रशासनासाठी शिकलेले लोक मिळवण्यासाठी हा पत्रव्यवहार होत होता. १८९४-९५ च्या दरम्यान शाहूमहाराजांनी म्हस्केंना बहुजन समाजातील पदवीधर विद्यार्थ्यांची नावे मागितली होती. यासंदर्भात डॉ.रमेश जाधव म्हणतात, राज्यकारभारात समाजातील सर्व घटकांचा समावेश करून घेण्याचा शाहू छत्रपतींचा निर्धार कायम होता. ते धोरण त्यांनी आयुष्यभर अमलात आणण्याचे जीवापाड प्रयत्न केले. हेच धोरण मनात ठेवून त्यांनी पुण्यातील एक नामवंत वकील आणि ब्राह्मणेतर समाजाचे नेते गंगारामभाऊ म्हस्के यांना बहुजन समाजातील पदवीधर आणि नोकरीस पात्र अशा लोकांची नावे कळविण्यास विनंती केली. गंगारामभाऊ म्हस्के यांनी १८८३ मध्ये डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून या संस्थेमार्फत अनेक गरीब आणि होतकरू अशा विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली होती. त्यांनी दाजीराव अमृतराव विचारे आणि भास्करराव विठुलराव जाधव या दोन होतकरू तरुणांची नावे शाहू छत्रपतींना कळविली. पुढे शाहू महाराजांनी भास्करराव जाधवांची ८ जून १८९५ रोजी असिस्टंट सरसुभे म्हणून कोल्हापूर संस्थानात नेमणूक केली. पुढे २७ वर्ष भास्करराव जाधवांनी कोल्हापूर संस्थानात महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. शाहू महाराजांनी दाजीराव विचारे यांनाही बांधकाम विभागाचे प्रमुख केले. या उदाहरणावरून १८८५ पासून सयाजीरावांनी या संस्थेला दिलेला राजाश्रय महाराष्ट्राला किती उपकारक ठरला हे सूचित होते.

शिक्षणतज्ज्ञ सीताराम तावडे यांनी १९३५ मध्ये डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त प्रकाशित ग्रंथात व्यक्त केलेली खंत आणि मराठा समाजाची आपल्या इतिहासाबद्दलची अनास्था आपल्याला आत्मटीकेकडे घेऊन जाते. तावडे लिहितात, 'मराठा समाजाच्या उन्नतीसाठी डोंगराएवढे काम केलेल्या गंगारामभाऊ म्हस्के हे मराठा समाजाचे एक आद्य नेते ठरतात; पण बहुजन समाजासाठी काम करणाऱ्या मंडळींची ओळख पुढील पिढीस नीटशी होऊ शकली नाही, हाही इतिहास आहे. गंगारामभाऊ एक कर्मवीर होते.' पुणे येथे अनेक माणसांचा इतिहास सांगितला जातोय. तो सांगितलाच पाहिजे; पण त्यांनी फक्त स्वत:पलीकडची गुंतवणूक म्हणून समाजच्या उत्कर्षासाठी आयुष्य झोकून दिले, त्यांचे छोटे चरित्रही एवढ्या काळात उपलब्ध होऊ नये, ही बहुजन कर्मवीरांची खरी परवड आहे. त्यात गंगारामभाऊ लेखक नव्हते, बोलघेवडे वक्ते नव्हते, त्यामुळे त्यांचे बोलणे, विचारही आज समाजासमोर आले नाहीत. मराठा समाजाच्या शैक्षणिक उत्कर्षासाठी पुढे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद ही संस्था उदयास आली; पण तत्पूर्वी गंगारामभाऊ हे जग सोडून निघून गेले होते. मराठा समाजात आज जी शैक्षणिक जागृती दिसत आहे, त्याचे मोठे श्रेय गंगारामभाऊ म्हस्के व त्यांचे आश्रयदाते महाराजा सयाजीराव गायकवाड यांना आहे. महाराष्ट्रात आज संख्येने मोठा असलेल्या मराठा समाजाच्या या नेत्याबद्दल, संस्थेबद्दल आमची अनास्था ही कृतघ्नतेचे व अनास्थेचे उदाहरण अस्वस्थ करणारे आहे.

महापुरुष स्वतंत्रपणे अभ्यासण्याच्या आपल्या परंपरेमुळे आपले किती नुकसान होते याचे आत्मपरीक्षण करण्यासाठी तावडेंचे वरील चिंतन फारच उपकारक ठरेल. कारण डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या कार्याचा इतिहास महाराष्ट्राबाहेर बडोद्यात गेल्याशिवाय आपल्याला कळत नाही. १८८५ ला सयाजीरावांनी म्हस्केंना आर्थिक मदत सुरू केली. त्यानंतर लगेच जानेवारी १८८६ ला खासेरावांना लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणाले होते की, या मदतीने आमचे हेतू पूर्ण होण्यास फायदा होईल. आज १४४ वर्षांनंतर आपण जेव्हा महाराजांच्या या पत्राचे वाचन करतो तेव्हा महाराजांचा तो निर्णय किती क्रांतिकारक होता

याचा साक्षात्कार होतो. गंगारामभाऊंच्या नेतृत्वाने महाराष्ट्रातील मराठ्यांच्या शैक्षणिक क्रांतीचा 'पाया' घातला. या पायातील 'दगड माती' बडोद्यातून आली होती. हा इतिहास महाराष्ट्रातील बहुजनांमध्ये 'चैतन्याचे झरे' फुलवेल असा आहे. डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन, बडोद्यातील मराठा फंड व अखिल भारतीय शिक्षण परिषद या तीन संस्थांच्या माध्यमातून सयाजीरावांनी मराठ्यांच्या शिक्षणासाठी लाखो रुपये खर्च केले. आजच्या रुपयाच्या मूल्यांत ही रक्कम १०० ते १५० कोटींच्या घरात जाईल.

१९३६ मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड हे पुण्याच्या दौऱ्यावर होते, त्यावेळी महाराष्ट्रातील ७४ संस्थांनी एकत्र येऊन महाराजांचा सत्कार केला होता. मुळात एवढ्या संस्थांनी पुण्यासारख्या ठिकाणी एकत्र येऊन 'बडोद्याच्या' महाराजांचा सत्कार का केला असेल, याचा शोध घेणे म्हणजे महाराष्ट्राचा इतिहास पुन्हा लिहिणे आहे. याच सार्वजनिक सत्कारात महाराजांच्या आर्थिक पाठबळाने १८८५ पासून कार्यरत असलेल्या डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनने महाराजांना ३ जानेवारी १९३६ ला जे मानपत्र दिले त्या मानपत्रात सयाजीरावांचे मराठे आणि महाराष्ट्र यांच्या उत्कर्षात काय योगदान आहे ते जाणून घेणे गरजेचे आहे. हे मानपत्र म्हणते, महाराजसाहेबांनी केवळ आपल्याच राज्यातील प्रजेच्या उन्नतीप्रीत्यर्थ प्रयत्न केले नसून राज्याबाहेरही सक्रिय सहानुभूती दाखविली आहे. महाराष्ट्रतील ज्या अनेक संस्थांना महाराजसाहेबांनी मदत केली आहे, त्यापैकी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन ही एक होय. या संस्थेस महाराजांनी सन १८८६ सालापासून मदत केलेली आहे व याच मदतीवर आतापर्यंत या संस्थेने मराठा समाजांत शिक्षण-प्रसाराचे काम केले आहे. या संस्थेची मदत घेऊन पुष्कळ मराठा गृहस्थ नावारूपास येऊन आज मोठमोठ्या हुद्यांवर कामे करीत आहेत. महाराजसाहेबांनी मराठा समाजात शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी दिलेल्या या उत्तेजनामुळे त्या त्या व्यक्तींचाच उत्कर्ष झाला असे नसून सर्व मराठा समाजाचा अप्रत्यक्षत्या उत्कर्ष झालेला आहे. अशा रीतीने महाराजांनी मराठा समाजाला चिरकाल उपकारबद्ध करून ठेविले आहे. याची फेड आमच्या समाजाच्या यापुढील कार्यक्षमतेनेच होणार आहे.

मराठ्यांचे उद्धारकर्ते म्हणून महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांनंतर थेट राजर्षी शाहू महाराजांकडे जातो. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनंतर महाराजा सयाजीराव गायकवाड, खासेराव जाधव यांनी मराठ्यांच्या शैक्षणिक उत्कर्षाचा पायाभूत प्रयत्न अतिशय विचारपूर्वक घातला होता. या दोघांच्या प्रयत्नाशी सुसंगत काम गंगारामभाऊ म्हस्केंनी महाराजा सयाजीराव गायकवाडांच्या भक्कम आर्थिक सहकार्याने १३५ वर्षांपूर्वी सुरू केले होते. मराठ्यांच्या दारिद्र्यामुळे त्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते, या वास्तवाला भिडण्याची दूरदृष्टी गंगारामभाऊंनी त्यावेळी दाखवली नसती तर आज मराठ्यांमध्ये जी शैक्षणिक प्रगती दिसते तीसुद्धा दिसली नसती. त्यामुळे या महानायकाचा पुतळा नव्हे तर कृतिशील व वैचारिक स्मारक त्यांची कर्मभूमी असणाऱ्या पुणे येथे साकारण्यासाठी मराठा आरक्षण आंदोलनाने पुढाकार घ्यावा अशी विनंती शेवटी करावीशी वाटते.

**दिनेश पाटील,** कोल्हापूर
Mob.9623858104

**संदर्भ**

१. पवार गो.मा. व शिंदे, रणधीर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय खंड २ : आत्मपर लेखन, विभाग दुसरा:माझ्या आठवणी व अनुभव, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,२०१६.
२. भांड बाबा, महाराजा सयाजीरावआणि पुणे शहराचे प्रेम, औरंगाबाद, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन प्रशिक्षण संस्था, २०१९.
३. पगार अेकनाथ, (संपा.) ''महाराजा सयाजीराव गायकवाड पत्रसंग्रह भाग १'', औरंगाबाद, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिति, २०१७.
४. जाधव रमेश, लोकराजा शाहू छत्रपती, पुणे, सुरेश एजन्सी, २०१५.



गांधींचे गारूड

संजीवनी खेर

# जे मजला वेड लागले!

गांधींना तिचं कौतुक किती करू–किती नको, असं झालं होतं. त्यांच्या देहबोलीतूनही ते प्रकट होत होतं. तिच्या व्यक्तिमत्त्वात एक डौल होता, कामुकता होती नि विलक्षण आत्मविश्वास होता, जो सहचरी म्हणून गांधींना आवडत होता. सभांव्यतिरिक्तही दोघे तासन्‌तास बोलत बसत असत. तिचं अवतीभवती असणं त्यांच्यातील चैतन्याला पूरक होत होतं. तिचं काव्य, तिचं गाणं, तिचं सहज वावरणं– हा सामान्यांसाठी एक धडा होता. गांधीजींना आपली ही नवी अनुयायी स्वजनांना दाखवायची घाई झाली होती. सर्वांना तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या जादूने ती भारून टाकील याची त्यांना खात्री होती. पण झाले उलटेच! त्यालाही त्यांचाच उतावळा स्वभाव कारणीभूत ठरला. तिला आश्रमात नेऊन आपली जीवनशैली, तत्त्वज्ञान प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयोग त्यांना दाखवायचा होता. पण तिथे गेल्यावर दोघे जण एकमेकांच्या प्रेमात पार बुडाले. सतत परस्परांच्या सहवासाखेरीज त्यांना काही सुचत नव्हते.

गांधींचे पाऊल घसरू शकते? ते कुणा स्त्रीच्या प्रेमात पागल होऊ शकतात? सारं–सारं विसरून तिच्यासाठी तळमळू शकतात? महात्मा गांधी आपली सारी तत्त्वं गुंडाळून टाकून आपलं सर्वस्व ‘तिच्या’पायी पणाला लावू शकतात? हो! अगदी खरं सांगायचं, लिहायचं तर– हो! मोहनदास करमचंद गांधी नामक ५५ वर्षांचा माणूस, ४८ वर्षीय सरलादेवी नामक देखण्या, बुद्धिमान, स्वतंत्र वृत्तीच्या, बंगाली भद्रलोकांतील स्त्रीच्या प्रेमात चक्क पागल होऊ शकतात? फार कडक वाक्यं वाटतात ना? त्रास देतात ना ही वाक्यं? मग घरच्यांना, स्वजनांना किती तगमग सोसावी लागली असेल– आपण कल्पना करू शकतो? त्यांच्या विरोधकांच्या हातात कोलित मिळाले असेल ना? तेव्हा नि आताही!! जे होतं ते स्पष्टपणे, खरं–खरं सांगायचं– हा त्याचा बाणा होता ना? मग ते सत्य कितीही कटू, पीडादायक असलं, त्याचे परिणाम दाहक असले; तरी हा माणूस ते जगजाहीर करून सोडणार!

हे सारं लक्षात घेऊनच हा माणूस समजून घेणं भाग आहे. जे घडलं ते खरंय, विरोधकांचं षडयंत्र नाही. हे घडलं, कारण गांधी माणूस होते. राग–द्वेष, विरुद्धलिंगी व्यक्तीबद्दलची ओढ असणं स्वाभाविक होतं. काही काळ ते बहकले होते, असं म्हणायलाही जागा आहे. देहभान हरपून ते तिच्या सहवासात, गप्पांत रंगून जात असत. पण शारीरिक आसक्तीत त्यांनी त्याचं रूपांतर होऊ दिलं नाही. त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे ‘वेळेवर सावरलो नसतो, तर तो क्षणदेखील दूर नव्हता.’ असं खुल्लम्‌खुल्ला सांगणाऱ्या माणसाचं करायचं काय? जे घडलं ते समजून घ्यायचं, एवढंच आपल्या हाती राहतं नि तेच आपण करणार आहोत. वास्तविक संपूर्ण गांधीचरित्रात त्या घटनेला फूटनोट इतकंसुद्धा महत्त्व नाही. असं असेल, तर मग आपण तरी कशाला हे उकरून काढत आहोत? माझ्या दृष्टीने गांधी हा माणूस कणभर समजायला उपयोग होईलसं वाटतंय, म्हणून!

‘बंगाली वाघीण’ हा शब्द जिच्या दिसण्याला लागू पडेल, असं तिचं व्यक्तिमत्त्व होतं. धनाढ्य नि अभिजन घराण्यात तिचा जन्म झाला होता. बंगालचे प्रथम घराणे

 

म्हणावे इतके त्या घराण्याच्या नावाला ग्लॅमर नि त्याचा दबदबा होता, जोरासांकोचे ठाकूर घराणे हे साहित्य, कला, धनसंपत्ती, प्रसिद्धी सर्वच बाबतींत चर्चेत असलेले होते. त्यांच्या घराण्यातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या कलागुणांनी, स्वतंत्र बाण्याने देश-विदेशात आपला ठसा उमटवला होता. रवींद्रनाथांच्या थोरल्या बहिणीची ही एकुलती एक कन्या. स्वर्णकुमारी आणि जानकीनाथ घोषाल हे माता-पिता सामाजिक, राजकीय व साहित्यिक जीवनात रमलेले, नाव केलेले दांपत्य. श्री.घोषाल हे इंडियन नॅशनल काँग्रेसच्या दोन अधिवेशनांचे सेक्रेटरी म्हणून कार्यरत होते. आई स्वर्णकुमारी ही साहित्यिक होती. वृत्तपत्रांतून नियमितपणे लेखन करीत असे.

सरलादेवीला क्रांतिकारक विचारांचे जबरदस्त आकर्षण होते. त्यामुळे बंकिमचंद्र, भगिनी निवेदिता, विवेकानंद ही तिची दैवतं होती. क्रांतिकारकांना मदत करण्यासाठी तिने एक समितीही तयार केली होती. ती अत्यंत मनस्वी होती. एखादी गोष्ट डोक्यात घेतली की, ती तडीला नेल्याखेरीज तिला चैन पडत नसे. गांधीजींशी भेट झाली ती ते दक्षिण आफ्रिकेहून परतल्यावर झालेल्या काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात. तिथे तिने गांधींना पाहिले, ऐकले. त्याच सुमारास तिची भेट एका धनाढ्य जमीनदार पंजाबी व्यक्तीशी झाली. तिचा स्वभाव पाहता ती संसारात पडेल, अशी शक्यताच नव्हती; पण रामभुज दत्त चौधरी ह्या व्यक्तीने तिला भारावून टाकले. त्याच्या पंजाबी संस्कृतीत ती पार बुडाली. पंजाब तेव्हा घटनांचे केंद्र झाले होते. जालियनवाला बाग हत्याकांडानंतर तर घडामोडी वेगाने होऊ लागल्या. रामभुज चौधरी हे यंग इंडियात नि नवजीवनमध्ये लेखन करू लागले. लाहोरमधील त्यांचे घर हे राजकीय कार्यकर्त्यांचे केंद्र बनले. त्याच वेळी तेथील स्थिती समजून घ्यायला गांधीजी पंजाबला आले. सारी जनता त्यांना ऐकायला, पाहायला जमू लागली. तो माहोलच संमोहित करणारा होता. लाहोर नि चौधरींचे घर म्हणजे राजकीय घटनांची काशी झाली होती. चौधरी जोडपे गांधींबरोबरच तिथला दौरा करणार होते, पण रामभुजना अटक झाली आणि सारं काम सरलादेवींवर पडलं. तिथेच दोघांना मदनबाधा झाली. तुम्ही म्हणाल, मी काय रोमँटिक कहाणी लिहितेय का? उत्तर 'हो' आणि 'नाही' असं आहे.

सगळाच घोळ थोडाफार तसाच होता. काही काळानंतर

सरलादेवी आपल्या पतीहून वेगळ्या झाल्या (त्याला गांधींबद्दल वाटणारं आकर्षण कारणीभूत नव्हतं), तोवर त्या जोडप्याला एक कन्या झालेली होती. लाहोर नि सारा पंजाब हे दोघे दौरे करून लोकांशी संवाद साधत होते. गांधींना ऐकायला नि चौधरानीला पाहायला नि ऐकायला लोक गर्दी करत होते. दोन्ही गोष्टी श्रवणीय नि प्रेक्षणीय नक्कीच होत्या. लोकांना देशप्रेमाचा, ब्रिटिशांच्या चालबाजीचा परिचय होत होता. स्वातंत्र्यप्राप्तीचा नवा नि त्यांच्या आवाक्यात येईल असा मार्ग दिसत होता. संपूर्ण पंजाब प्रांत हा जालियनवाला बाग हत्याकांडानंतर संतापाने खदखदत होता. त्यावर मलम लावायचे काम गांधीजी करीत होते. पण सरलादेवीच्या आकर्षणात स्वत: अंतर्यामी आकंठ बुडालेले होते. त्यांचे हे काही मी 'कही-सुनी' लिहीत नाहीय. 'आपल्याला तिच्याशिवाय काही दुसरं सुचत नसल्याचे' त्या प्रेमी जीवांनी, गांधींनीही नोंदवून ठेवलंय.

तिचे दिसणे, लिहिणे, गाणे, वागणे, तिचा पोशाख सगळ्यातच त्यांना एक दैवी प्रसाद असल्याचे जाणवत होते. ती विजेसारखी प्रकाशमान होत होती. त्यांना ऊर्जा देत होती. अशी सहकारी- जी सर्वच दृष्टीने त्यांना साथ द्यायला साजेशी- देखणी, कामसू, स्वतंत्र प्रतिभेची स्त्री त्यांना लोभावत होती. लोकांना काय वाटेल- इतर सहकाऱ्यांना, आपल्या साध्यासुध्या- भारतीय नारीची मूर्तिमंत प्रतिमा असलेल्या बायकोला, मुलांना काय वाटेल- याचा विचारही त्यांच्या मनाला शिवला नसेल? नवथर तरुण प्रेमाने कावरेबावरे झालेले आपल्याला ठाऊक आहेत... पण जागतिक कीर्तीचा, साऱ्या जगाचं लक्ष ज्यावर केंद्रित झालंय व जो एका बलाढ्य शक्तीशी अहिंसक मार्गाने लढा देतोय, नैतिकतेचे धड लोकांना देतोय, स्वत:ही तसेच जगतोय; तो इतका स्वत:ला हरवून बसेल? तारतम्य गमावून बसेल? हे अशक्य वाटेलसे होते, पण सत्य होते!

केवळ पंजाबच नव्हे, तर त्यानंतर तर त्यांनी साऱ्या देशाचाच दौरा तिच्यासह काढायची योजना कार्यान्वित केली. सरलादेवी चौधरानीने गांधींच्या आवडत्या प्रयोगाला मूर्त रूप दिले. त्यांच्या अनेकानेक कल्पनांमध्ये खादी हे एक महत्त्वाचे तत्त्व होते. ग्रामविकासातले, ग्रामीण स्त्री-पुरुषांना आत्मनिर्भर करण्याचे हे खरोखरीच एक असामान्य हत्यार होते. गांधीजींच्या प्रतिभेतून अशा अनेक क्रांतिकारी आणि व्यवहार्य संकल्पना लोकांसमोर येत. त्या काळच्या गरीब पण सत्त्वनिष्ठ समाजातील लोकांना हे आदर्श आपल्याला झेपतील असे आहेत असं वाटत होतं नि ते त्यांनी करून दाखवलं. घराबाहेर न पडावे लागताही सूत कातता येते, त्याचे वस्त्र विणून ते विकता येते- हे लोकांना माहिती नव्हते की काय? पण या कल्पनेला देशभक्ती, स्वातंत्र्याच्या लढ्याशी गांधींनी जोडलं. त्यातच विदेशी वस्त्रांनी आणि प्रामुख्याने युरोपात झालेल्या औद्योगिक क्रांतीने वस्त्रोद्योगाची गती व व्यापाराची गरज वाढली होती. त्यातून वसाहतींमधील बाजार ब्रिटिशांना आकर्षित करत होता. सत्तेच्या पाशवी शक्तीचा वापर करून, त्यांच्या कापडाची विक्री त्यांनी हिंदुस्थानात सुरू केली. साहजिकच इथले पिढ्यान्‌पिढ्यांचे विणकर बेकार होऊ लागले. साऱ्या उद्योगालाच ग्रहण लागले. त्यामुळे स्वदेशी वस्तूंचा वापर हे भावनिक, आर्थिक, सामाजिक परिवर्तनाचे साधन बनू लागले. गांधीजींनी त्याला तात्त्विक अधिष्ठान दिले.

नुसते खादीबद्दल बोलणे नि त्याचे प्रतीक बनणे, ह्यात जमीन-अस्मानाचा फरक होता. खादी सिल्क हे अभिजनांना वापरायला उचित नि त्यांच्या प्रतिष्ठेला साजेसे वाटत होते. पण केवळ त्यांच्या वापराने सामाजिक बदल नि संदेश देशाच्या कानाकोपऱ्यात जाणं शक्य नव्हतं. ती सर्वसाधारणांच्या वापराची गोष्ट होणे गरजेचं होतं. ही बाब गांधीजींनी सरलादेवीला समजावून सांगितली. नेहमी उच्चभ्रूंच्या स्टायलिश वेषात, निवडक दागिन्यांत वावरणाऱ्या सरलादेवीला जाडीभरडी, वजनदार खादीची साडी नि ब्लाऊज वापरणे अवघडच वाटत होते. तिने आपल्या रविमामालाही विचारले, ''मी काय करू?'' मामाचं उत्तर होतं, ''नेसून बघ. त्या वजनात तुला सहज वावरता येईल असं वाटलं, तरच वापर. कुणाच्या दडपणाखाली नको वापरूस, तू काहीही वापरलंस तरी तू छानच दिसशील.'' गांधींच्या ध्येयाला आपल्या खादी-वापराचा नक्कीच उपयोग होईल, शिवाय साऱ्या देशभर प्रसार होईल- या विचाराने तिने प्रचारसभांमध्ये खादीचाच वेष करून जायला सुरुवात केली. एक देखणी, गोड आवाजाची, तडफदार लिहिणारी-बोलणारी कलकत्त्याच्या अभिजनांतील स्त्री पाहून लोक भारावून गेले. ती खादी प्रचाराची प्रतीक बनली. वृत्तपत्रांत नि समाजमनात सर्वत्र तिचा बोलबाला होऊ लागला.

गांधींना तिचं कौतुक किती करू-किती नको, असं झालं होतं. त्यांच्या देहबोलीतूनही ते प्रकट होत होतं. तिच्या व्यक्तिमत्त्वात एक डौल होता, कामुकता होती नि विलक्षण

आत्मविश्वास होता; जो सहचरी म्हणून गांधींना आवडत होता. सभांव्यतिरिक्तही दोघे तासन्तास बोलत बसत असत. तिचं अवतीभवती असणं त्यांच्यातील चैतन्याला पूरक होत होतं. अशी सहकारी मिळाल्याने ते मनोमन खूश होते. तिचं काव्य, तिचं गाणं, तिचं त्या जाडजूड खादीत सहज वावरणं– हा सामान्यांसाठी एक धडा होता. गांधीजींना आपली ही नवी अनुयायी स्वजनांना दाखवायची घाई झाली होती. सर्वांना तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या जादूने ती भारून टाकील, याची त्यांना खात्री होती. पण झाले उलटेच! त्यालाही त्यांचाच उतावळा स्वभाव कारणीभूत ठरला. तिला आश्रमात नेऊन आपली जीवनशैली, तत्त्वज्ञान प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयोग त्यांना दाखवायचा होता. पण तिथे गेल्यावर दोघे जण एकमेकांच्या प्रेमात पार बुडाले. सतत परस्परांच्या सहवासाखेरीज त्यांना काही सुचत नव्हते.

आश्रमाच्या शिस्तीप्रमाणे भोजनवेळी सर्व जण एकत्र जेवायला बसत. या दोघांची व्यवस्था सर्वांबरोबरच होती. सर्व जण एकत्र बसले. प्रार्थना वगैरे झाल्या. दोघांना निरोपही गेला. पण दोघे एकमेकांशी बोलण्यात इतके गर्क होते की, त्यांनी त्याकडे सरळ दुर्लक्षच केले. मगनलाल, महादेवभाई वैतागले. त्यांना हे फारच खटकले, पुत्र देवदासही खट्टू झाला. बापूंनी शिस्त मोडावी? हे आजवर कधीच झाले नव्हते. आधीच तिथल्या लोकांना ही स्त्री आपल्यातली वाटत नव्हती आणि ती तशी नव्हतीच मुळी. अखेर गांधींच्या हे सारे लक्षात आले. हे प्रकरण हाताबाहेर जाणार नि आपल्या साऱ्या विचारविश्वावर, आपल्या निरिच्छेच्या बोलण्यावर कुणाचा काही विश्वासही बसणार नाही. आपण वासनेत बुडालेला एक प्राणी बनून राहू. आजवर कमावलेली राजकारण–समाजकारणाची पुंजी चुटकीसारशी मातीमोल होईल, हे त्यांना क्षणार्धात उमगले. या विजेसारख्या स्त्रीत्वाने साऱ्याची राखरांगोळी व्हायला वेळ लागणार नाही, हे आश्रमातील नाराजीच्या एका सुराने स्पष्ट केले. त्यांनी आपल्या वागण्याची सगळ्यांसमोर बिनशर्त माफी मागितली. आपण बोलण्याच्या नादात वाहवत गेलो, अशी कबुलीही दिली. शिस्त मोडल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली.

सरलादेवी आणि गांधींमधले मानसिक अंतर हळूहळू वाढत गेले. एके काळी ती साऱ्या लक्ष्मणरेषा उल्लंघायला तयार होती, पण गांधींसाठी ते शक्य नव्हते. त्यांच्या जबाबदाऱ्या फार मोठ्या होत्या. तिने आपले प्रेम स्वच्छ शब्दांत व्यक्त केले होते. ती शक्तीची उपासक होती, त्यामुळे एक शस्त्र म्हणून अहिंसा तिला मान्य होती; पण त्यालाच ती घट्ट धरून बसणारी नव्हती. सारी परिस्थिती हाताबाहेर जाण्याआधी गांधींना सारे सावरायचे होते, परंतु तिला त्यांचे प्लेटॉनिक लव्ह वगैरे मान्य नव्हते. मुलाचा– देवदत्तचा विरोध गांधींना टोचत होता. 'सरलादेवी माझी आध्यात्मिक पत्नी आहे' हे वाक्य सर्वांनाच मानवणे शक्य नव्हते. संपूर्ण शरणागती दोघांपैकी एकाने वा दोघांनी स्वीकारण्याला पर्याय नव्हता. या साऱ्या घटनांत त्या दोघांनी शारीरिक मर्यादा ओलांडल्या नव्हत्या. पूर्ण संयम पाळला होता. त्यांनी तिला पत्रांतून खूप समजावले. 'शांतपणाने, समंजसपणाने वाग. आपल्या प्रेमाच्या आणि मैत्रीच्या माणसात संत वा पापी असे विभाजन नसते. त्यामुळे तुझ्यासाठी माझ्या हृदयातलं स्थान कायम ठेवीन. पश्चात्तप आणि विनम्रतेसाठी सतत प्रार्थना करीन.' पण तिच्या स्वभावाबद्दल काही टिपण्णी केली, ती तिच्या जिव्हारी लागली. तिला त्यांची असहकाराची कल्पना मुळीच मान्य नव्हती. त्यांनी तिला चौथीतली मुलगी समजून नेहमी उपदेश करणं तिला आवडत नव्हतं. या नात्याची मर्यादा तिच्याही लक्षात आली. त्यानंतर दूर व्हायचं ठरवून ती कलकत्त्याला गेली. मुलगा दीपक तिच्याबरोबर असे. इथून गेल्यावर काही काळ ती काम करीत राहिली, पण नंतर तिची प्रकृती ढासळत गेली. ती १९४५ मध्ये वारली. गांधीजींच्या जीवनात ती विजेसारखी तळपून लखलखून मावळली.

**संजीवनी खेर,** मुंबई
sanjeevanikher@gmail.com
Ph. 9821411472, 02224141669



डॉक्युमेंटरी

नीलांबरी जोशी

# उदरभरण नोहे! फूड इनकॉर्पोरेशन डॉक्युमेंटरी

या सगळ्या अन्नचक्राचे अनेक घातक परिणाम झाले आहेत, हीच बाजू जास्त जाणवत राहते. त्यातला महत्त्वाचा परिणाम म्हणजे लठ्ठपणा. लठ्ठपणाचं प्रमाण जगभरात १९७५ पासून तिप्पट झालं आहे. २०१६ मध्ये १८ वर्षांवरच्या १९० कोटी माणसांचं वजन प्रमाणापेक्षा खूप जास्त होतं. १ ते ५ या वयोगटातल्या ३.८ कोटी मुलांचं वजन २०१९ मध्ये लठ्ठपणाकडे झुकणारं होतं, असं जागतिक आरोग्य संघटनेचा अहवाल सांगतो. लठ्ठपणामुळे टाईप-२ मधुमेह, कोलेस्टेरॉल वाढणं, रक्तदाब वाढणं, हृदयविकार, काही प्रकारचे कर्करोग, संधिवात, पचनसंस्थेचे विकार आणि झोपेचं चक्र बिघडणं असे आजार होण्याची दाट शक्यता असते. जास्त वजन असलेल्या मुलांना शाळेत चिडवलं जातं. त्यांना नैराश्य येऊ शकतं. तसंच वाढलेलं वजन कमी करण्याच्या नादात चुकीच्या उपाययोजनांमुळे मुलांमध्ये इटिंग डिसऑर्डरचं प्रमाणही वाढत चाललं आहे.
यामागचं महत्त्वाचं कारण आहे फास्ट फूड.

अमेरिकन टेलिव्हिजनवर १९९६ मध्ये ओप्रा विनफ्री हिच्या एका टॉक शोचा विषय होता : धोकादायक खाद्य पदार्थ- डेंजरस फूड. 'हॅंबर्गर या तिथल्या लोकप्रिय खाद्य पदार्थावर टीका करणं शक्य आहे का?' अशी त्या कार्यक्रमात चर्चा झाली. आपल्याला आधी हा एखाद्या टीव्हीवरच्या कार्यक्रमाचा विषय कसा असू शकतो, हेच कळणं अवघड आहे. पुण्यापुरतं बोलायचं झालं तर 'वैशाली हॉटेलमधल्या इडली-सांबारला पुणेकरांना नावं ठेवता येतील का?' हा टेलिव्हिजन कार्यक्रमाचा विषय होऊच शकत नाही.

पण अमेरिकेत 'फूड लिबेल लॉ' असा एक प्रकार आहे. यात अलाबामा, ॲरिझोना, ओहिओ अशा १३ राज्यांमध्ये खाद्य पदार्थांवर टीका करायला कायद्यानं बंदी आहे. एखाद्यानं खाद्य पदार्थांवर टीका केली, तर तो खाद्य पदार्थ तयार करणारा उत्पादक त्याच्यावर टीका करणाऱ्यावर या कायद्यानुसार फिर्याद दाखल करू शकतो.

यामुळेच १९९७ च्या डिसेंबरमध्ये ओप्रा आणि तिचा कार्यक्रम सादर करण्यात सहभागी असलेला होवार्ड लिमन याच्यावर १ कोटी डॉलर्सची केस झाली. लिमन हा तेव्हा ह्युमेन सोसायटीचा संचालक होता. या दोघांनी कार्यक्रमादरम्यान बीफ या मांसाच्या प्रकाराला नावं ठेवली, असा त्यांच्यावर आरोप होता. आता नावं ठेवली म्हणजे, या दोघांनी नक्की काय केलं होतं, ते पाहू.

ओप्राच्या कार्यक्रमाच्या आधीच्या महिन्यात ब्रिटनमध्ये जनावरांच्या मॅड काऊ या रोगामुळे माणसांना Creuzfeldt-Jakob disease (CJD) हा मेंदूविकार होऊ शकतो, असं तिथल्या आरोग्यसेवा पुरवणाऱ्या अधिकाऱ्यांनी जाहीर केलं होतं. या वक्तव्याचा आधार घेऊन अमेरिकेतही गुरांना मॅड काऊ झाल्यानं (CJD) हा मेंदूविकार माणसांमध्ये पसरू शकतो, असा दावा ओप्राच्या कार्यक्रमात लिमननं केला होता.

मुळात जनावरांना मॅड काऊ कसा होतो? तर- गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, डुकरं, कोंबड्या या पशू-पक्ष्यांना फार्मवर खायला घालताना मेलेल्या जनावरांची हाडं किंवा प्राण्यांच्या शरीराचे इतर भाग स्वस्त प्रोटिनयुक्त अन्न म्हणून

खायला घातले जातात. त्यातून मॅड काऊ पसरू शकतो. खाद्य पदार्थांसाठी ज्यांची कत्तल केली जाते, त्या जनावरांना अशा प्रकारे खायला घालणं हे अमेरिकेतही सर्रास चालत होतं. लिमननं हे समजावून सांगितल्यावर ओप्रानं 'मला हे ऐकून बर्गर खायचीच भीती वाटायला लागली; तुम्हालाही काळजी वाटायला लागली का?' असा प्रश्न प्रेक्षकांना विचारला होता. हा प्रश्न वादग्रस्त ठरला.

या कार्यक्रमानंतर अमेरिकेत मांसाचा खप कमी झाला. मॅड काऊ पसरेल या भीतीनं गुरांना जे अन्न दिलं जातं, त्यात मेलेल्या गाई-म्हशी आणि मेंढ्या यांच्या शरीराचे भाग वापरायला अमेरिकेतल्या कृषी खात्यानं बंदी केली. कॅटल फार्मवाल्यांची चांगलीच पंचाईत झाली.

अमेरिकेत टेक्सास राज्य हे कॅटल फार्म या उद्योगाचं केंद्र होतं. टेक्सास या राज्याचे कृषी विभागाचे संचालक असलेले रिक पेरी तेव्हा अमेरिकेत केंद्र सरकारात एनर्जी सेक्रेटरी होते. त्यांच्या मदतीनं कॅटल फार्म उद्योगाची चक्रं भराभर फिरली. टेक्सासमधल्या कॅक्टस फीडर्स इनकॉर्पोरेशनचा प्रतिनिधी पॉल एंगलर यानं विनफ्री आणि लिमनवर केस ठोकली. याचा परिणाम म्हणून अमेरिकेत 'फूड लिबेल लॉ' हा प्रकार सुरू झाला.

फूड इनकॉर्पोरेशन या रॉबर्ट केन्नरनं दिग्दर्शित केलेल्या डॉक्युमेंटरीमध्ये हे सगळं पाहायला मिळतं. 'फास्ट फूड नेशन' या पुस्तकाचा लेखक एरिक श्लॉसर आणि 'द ओम्निव्होर्स डायलेमा' या पुस्तकाचा लेखक मायकेल पोलान या दोघांनी ही डॉक्युमेंटरी प्रेक्षकांसमोर उलगडत नेली आहे.

या डॉक्युमेंटरीच्या सुरुवातीस लख्ख प्रकाशातल्या, नीटपणे मांडून ठेवलेल्या, भरगच्च खाद्य पदार्थांच्या स्टोअरमधून कॅमेरा हिंडतो. सुपर मार्केट्समध्ये ऋतू नसतात. तिथे १२ महिने हव्या त्या भाज्या, हवी ती फळे ताजी मिळू शकतात. 'हे कसं?' हा प्रश्न आपल्याला पडत नाही. अन्न पिकवणारी जमीन, शेतीचे बदलत गेलेले प्रकार, फास्ट फूड तयार करताना होणारी गुरांची कत्तल, याबाबत निरनिराळ्या देशांतल्या सरकारची कृषिविषयक धोरणं आणि खाद्य पदार्थांच्या रेडिमेड पाकिटांबाबतचे कायदे, एफडीएचं कामकाज, खाद्य पदार्थांच्या सुरक्षिततेसंबंधी नियम, फॅक्टरी फार्मिंग या सर्व गोष्टींबद्दल माहिती मिळवण्याचा आपण फारसा प्रयत्न करत नाही. बदलत गेलेल्या खाद्य संसस्कृतीमुळे अन्नाचं औद्योगिकीकरण कसं झालं, आपलं अन्न जिथून येतं त्या शेतांवर, आपण ज्या सुपर मार्केटसमधून खरेदी करतो आणि रेस्टॉरंट्समध्ये खातो त्या सर्व ठिकाणी कॉर्पोरेट कंपन्यांनी कसा ताबा मिळवला आहे, याबाबत आपण संपूर्ण अनभिज्ञ असतो. जेनेटिकली मॉडिफाईड- जीएम या प्रकारातल्या पिकांवर काम करणाऱ्या मोन्साटोसारख्या कंपन्यांनी शेतीवर आणि अर्थचक्रावर किती भीषण परिणाम केले आहेत, हे आपल्यापर्यंत पोचूही शकत नाही.

या सर्व प्रश्नांचा मागोवा फूड इनकॉर्पोरेशन या



डॉक्युमेंटरीमध्ये चार भागांत घेतला आहे. अमेरिकन लोक काय खातात याबद्दल मुलाखती, तज्ज्ञांचं त्यावरचं विश्लेषण, प्राण्यांच्या कत्तलखान्यातलं शूटिंग, कारखान्यातल्या कन्व्हेयर बेल्टमध्ये लावलेल्या कोंबड्या आणि त्यांची पिल्लं... आजारी गाई, डुकरं, पहाटे अंधारात पकडलेल्या कोंबड्या, शेतकऱ्यांनी आणि कॅटल फार्मच्या मालकांनी मुलाखतीला दिलेले नकार- अशा अनेक गोष्टी या डॉक्युमेंटरीमध्ये आपल्यासमोर वेगानं येत राहतात. मन सुन्न होऊन जातं. ही डॉक्युमेंटरी पाहिल्यानंतर लगेच काहीही खाणं शक्य होत नाही.

भारतापुरतं बोलायचं झालं तर, घरात तयार केलेला ताजा स्वयंपाक ही भारतीयांची आवड आहे. पण जागतिकीकरणानंतर जे घरी मिळत नाही, ते हॉटेलमध्ये जाऊन खाणं- ही परंपरा सुरू झाली. त्यातच अमेरिकाप्रेमाची लाट आल्यानंतर कॅनमधलं, फ्रोझन किंवा जंक फूड आणि त्यानं भरलेली सुपर मार्केट्स याचा भारतात अतिरेक झाला आहे. त्यामुळे खाद्य पदार्थांबाबत आपण कोणत्या दिशेला चाललो आहोत, हे लक्षात घेण्यासाठी आपण ही डॉक्युमेंटरी पाहायलाच हवी.

डॉक्युमेंटरीच्या पहिल्या भागात मका या धान्यानं जगात कसं प्रभुत्व मिळवलं आहे, ते दिसतं. खाद्य पदार्थांच्या पाकिटांवर दिसणाऱ्या कॉर्न फ्लोअर, कॉर्नमील, कॉर्न ग्लुटेन, कॉर्नफ्लेक्स, कॉर्नस्टार्च, स्टार्च, व्हेजिटेबल स्टार्च, कॉर्न ऑईल, कॉर्न सिरप, डेक्स्ट्रिन्स, डेक्स्ट्रोज, फ्रूक्टोज, हायड्रॉल, इथेनॉल, मेझ, सॉर्बिटॉल, सेल्युलोज, सॅकरिन, पॉलिडेक्स्टरोज या सर्व उत्पादनांमध्ये मका कोणत्या ना कोणत्या प्रकारे वापरलेला असतो. सुपर मार्केटमध्ये मिळणाऱ्या खाद्य पदार्थांच्या पाकिटांपैकी ९० टक्के उत्पादनांमध्ये मका किंवा सोयाबीन हा एक घटक पदार्थ असतो. मका आता बॅटरी सेल्समध्येही वापरला जातो. मका स्वस्त असल्यानं तो कोंबड्यांना आणि गाईंनाही खाऊ घालतात. त्यातून त्यांची वाढ भराभर होते. माशांनाही मका खायला शिकवलं जातं. मका खायला घालून वाढवलेल्या कोंबड्यांचं मांस किंवा बीफ हॅंबर्गरसारख्या फास्ट फूडमध्ये वापरलं जातं.

मक्याचं हे प्रस्थ इतकं कसं वाढलं? तर एक म्हणजे, ते स्वस्त आहे. दुसरं म्हणजे, ते धान्य साठवायला तुलनेनं सोपं आहे. त्याचे आरोग्यावर होणारे घातक परिणाम यामुळे दुर्लक्षिले गेले. अमेरिकेतली ३० टक्के जमीन मका या पिकासाठी पोषक आहे. शेतकऱ्यांना मका लावायला भरपूर अनुदान मिळतं. त्या योजनांचा लाभ घेऊन तिथे मका अतिरिक्त प्रमाणात लावला जातो. याचा परिणाम म्हणून, मक्याची अतिपैदास होत गेली. मग संशोधकांनी मक्याचा वापर करणारी नवनवीन उत्पादनं शोधली. तसंच सुपर मार्केटमध्ये पोचल्यावर ही उत्पादनं जास्त काळ टिकावीत यासाठीही अन्ननिर्मितीच्या प्रक्रियेवर, अन्नावर संशोधन करणाऱ्या संशोधकांनी नवनवीन प्रयोग केले.

डॉक्युमेंटरीतला दुसरा भाग हा गाय, म्हैस आणि त्यांचं मांस-बीफ यांवर आधारित आहे. या जनावरांच्या फार्मच्या आकाराची आपण कल्पनाही करू शकत नाही, अशी दृश्यं डॉक्युमेंटरीत दिसतात. अशा फार्ममध्ये तासाला ४०० गाईंची कत्तल केली जाते.

बीफमुळे ज्या प्रकाराचा धोका वाढतो तो म्हणजे, इ कोली या प्रकारच्या जिवाणूंमुळे होणारं फूड पॉयझनिंग. इ कोली हा जिवाणू माणसाच्या आतड्यात असतो. तो काही प्राण्यांच्या आतड्यातही आढळतो. इ कोली प्रकारातले सर्व जिवाणू घातक नसतात, उलट त्यातले काही पचनक्रियेत साह्य करतात. मात्र जर आपण दूषित अन्न खाल्लं किंवा दूषित पाणी प्यायलो, तर काही प्रकारांतल्या इ कोलीमुळे फूड पॉयझनिंग होऊ शकतं. काही वेळा न्यूमोनिया आणि मूत्रमार्गाचा संसर्गही होऊ शकतो. अशा संसर्गांमध्ये ७५ टक्के ते ९५ टक्के कारण इ कोली हा जिवाणू हे असतं. काही प्रकारचे इ कोली तर शिगा हे टॉक्सिन तयार करून तुम्हाला आजारी पाडतात. शिगामुळे आतड्याचा बाहेरचा थर खराब होऊ शकतो. यातलाच एक प्रकार पोटात मुरडा येणं, उलट्या, शौचातून रक्त पडणं इथपर्यंत पोचवू शकतो. मुलांमध्ये किडनी फेल होऊ शकते. ताप, रक्तस्राव, आकडी येणं असे जीवघेणे प्रकार इ कोलीमुळे होऊ शकतात.

इ कोलीचा संसर्ग कसा होतो? वेगवेगळ्या प्राण्यांच्या मांसाच्या तुकड्यांचा एकत्रित भुगा करून ग्राऊंट मीट तयार होतं. ग्राऊंड मीट, अनपाश्चराईज्ड दूध, पाश्चराईज्ड न केलेले फळांचे ज्यूस या पदार्थांमधून इ कोलीचा संसर्ग होऊ शकतो. प्राण्यांची विष्ठा पाण्याच्या स्रोतात मिसळली जाऊन ते पाणी जर शेतीला वापरलं, तर तिथे उगवलेल्या भाज्या/फळं यांमधूनही इ कोली पसरू शकतो.

अमेरिकेत डोले स्पिनॅच या पालक वितरित करणाऱ्या कंपनीनं आपला पालक सगळ्या सुपर मार्केट्समधून २००६ मध्ये परत घेतला होता. याचं कारण शोधलं तर, पालकाची

शेती करणाऱ्या एका शेतकऱ्यानं आपली काही जमीन गुरांच्या फार्मला दिली होती. हा पालक खाल्लेल्या ३१ जणांना किडनी फेल्युअरचा आणि २०५ लोकांना अतिसाराचा त्रास झाला होता. अमेरिकेत इ कोलीच्या संसर्गाच्या अनेक केसेस झाल्या आहेत. उदाहरणार्थ– इ कोलीचा संसर्ग असलेलं मांस वापरलेला हॅंबर्गर खाऊन एका दोन वर्षांच्या निरोगी मुलाचा १२ दिवसांत मृत्यू झाला.

अन्नपदार्थ तयार होण्याच्या प्रक्रियेत भाज्या/फळं/मांस हाताळताना पुरेशी काळजी न घेणं, फार्म्सवरच्या चुकीच्या प्रॅक्टिसेस यातून किंवा खाद्य पदार्थांचं उत्पादन किंवा वितरण करताना इ कोलीचा संसर्ग होऊ शकतो. गाईंना मका खायला दिला तर इ कोलीचं घातक प्रकाराचं म्युटेशन जलद होऊ शकतं. फॅक्टरी फार्ममध्ये हे प्राणी एकाच ठिकाणी दाटीवाटीनं दिवसभर उभे असतात. संसर्गाचा धोका त्यामुळे वाढतो. डॉक्युमेंटरीत ही गुरं कशा प्रकारे अंधारात दिवसभर उभी असतात, फक्त तोंड बाहेर येईल इतक्याच खिडकीतून ते कसं खातात– हे बघणं भयंकर आहे.

डॉक्युमेंटरीतला तिसरा भाग कोंबड्या–चिकन फार्मिंगवर आधारित आहे. १९५० मध्ये कोंबड्यांची तीन महिन्यांत पूर्ण वाढ होत असेल, तर आता फास्ट फूड चेन्सची गरज म्हणून त्या ४९ दिवसांत मका खायला घालून वाढवल्या जातात. कोंबडीचं पिल्लू ७ आठवड्यांत ५.५ पौंड वजनाचं होतं. आपलं वजन पेलवत नसल्यानं ते चार पावलंही चालू शकत नाही, हे डॉक्युमेंटरीतलं दृश्य अंगावर काटा आणतं.

या कोंबड्या मका खाल्ल्यामुळे आधीच्या काळातल्या कोंबड्यांपेक्षा दुप्पट धष्टपुष्ट दिसतात. या कोंबड्यांना खिडकी नसलेल्या अंधाऱ्या जागेत ठेवलं जातं. चिकन फार्म चालवणाऱ्या एका महिलेनं कोंबड्यांना अंधाऱ्या जागेत ठेवायला नकार दिल्यामुळे तिच्याबरोबरचा करार एका मोठ्या कंपनीनं चक्क रद्द केला, हे या डॉक्युमेंटरीत दिसतं.

डॉक्यमेंटरीचा चौथा भाग डुकरांची पैदास यावर आधारित आहे. पिग फार्मवर दिवसाला ३२००० म्हणजे तासाला २००० डुकरांची कत्तल होते. सर्वच प्राण्यांच्या मांसाचं पॅकिंग करणं हे रोगांना आमंत्रण देणं असतं. ते जोखमीचं काम करत असताना कर्मचाऱ्यांना त्यातून इन्फेक्शन्स होतात. हे काम करणारी मंडळी लॅटिन अमेरिकन देशांमधून येऊन बेकायदारीत्या अमेरिकेत राहत असतात. व्हिसा नसल्यामुळे त्यांना पडेल ते काम करावं लागतं. एका छुप्या कॅमेऱ्यामधून केलेलं हे चित्रण डॉक्युमेंटरीत दिसतं.

डॉक्युमेंटरीमध्ये शेवटी काही सकारात्मक गोष्टीदेखील दिसतात. उदा.– जोएल सालाटिन या सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यानं 'तुमच्या कंपनीवर मीच बहिष्कार टाकला आहे' असं वॉल मार्टसारख्या कंपनीच्या प्रतिनिधीला सुनावणं!

पण या सगळ्या अन्नचक्राचे अनेक घातक परिणाम झाले आहेत, हीच बाजू जास्त जाणवत राहते. त्यातला महत्त्वाचा परिणाम म्हणजे लठ्ठपणा. लठ्ठपणाचं प्रमाण जगभरात १९७५ पासून तिप्पट झालं आहे. २०१६ मध्ये १८ वर्षांवरच्या १९० कोटी माणसांचं वजन प्रमाणापेक्षा खूप जास्त होतं. १ ते ५ या वयोगटातल्या ३.८ कोटी मुलांचं वजन २०१९ मध्ये लठ्ठपणाकडे झुकणारं होतं, असं जागतिक आरोग्य संघटनेचा अहवाल सांगतो. लठ्ठपणामुळे टाईप–२ मधुमेह, कोलेस्टेरॉल वाढणं, रक्तदाब वाढणं, हृदयविकार, काही प्रकारचे कर्करोग, संधिवात, पचनसंस्थेचे विकार आणि झोपेचं चक्र बिघडणं असे आजार होण्याची दाट शक्यता असते. जास्त वजन असलेल्या मुलांना शाळेत चिडवलं जातं. त्यांना नैराश्य येऊ शकतं. तसंच वाढलेलं वजन कमी करण्याच्या नादात चुकीच्या उपाययोजनांमुळे मुलांमध्ये इटिंग डिसऑर्डरचं प्रमाणही वाढत चाललं आहे.

यामागचं महत्त्वाचं कारण आहे फास्ट फूड. फास्ट फूडचं जेवण हा कागदी बॅगेतून भेट मिळणारा हृदयविकार असतो. आज भाज्यांपेक्षा वेफर्सची पाकिटं स्वस्त दरात सगळीकडे उपलब्ध आहेत. त्यानं वाढणारा लठ्ठपणा आणि वैद्यकीय खर्च ही त्यातली हिडन कॉस्ट आपल्याला दिसत नाही.

माणसाच्या मूळ तीन गरजांपैकी अन्न ही एक गरज आहे. खाद्य पदार्थांच्या पाककृतींवर गुगलवर शोध घेतला तर २८,८०,००० साईट्स दिसतात. ॲमेझॉनवर ८०,००० इंग्रजी पुस्तकं या विषयांवर आहेत. मराठीतही पाककृतींच्या पुस्तकांचा खप सर्वाधिक असतो. पाककृतींचे टीव्ही कार्यक्रम, युट्यूब आणि इन्स्टाग्रामवरचे व्हिडिओ सर्वाधिक लोकप्रिय असतात. पण पाककृतींबरोबर त्यातल्या घटक पदार्थांच्या स्रोतांची माहिती आपण कधी करून घेणार? नाही तर १००० पौंड वजनाकडे पोचणारा प्रवास एका बर्गरनं सुरू होतो, हे वाक्य आपल्यासाठीही खरं ठरू शकतं.

डॉक्युमेंटरीची लिंक https://vimeo.com/31813990

**नीलांबरी जोशी**, पुणे
neelambari.joshi@gmail.com
Mob. 9922445456





अपर्णा दीक्षित

# अभ्यासोनि प्रकटावे

अनेक ठिकाणी मॅन्सप्लेनिंग निमूटपणे सहन करावं लागणं हे स्त्रियांचं वास्तव आहे. तर दुसरीकडे ज्या स्त्रिया मोकळेपणी किंवा बेधडकपणे व्यक्त होऊ पाहतात, त्यांचे समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणात ट्रोलिंग होताना दिसते. त्यांच्या मतांना फारशी किंमत दिली जात नाही. अशा स्त्रियांच्या शरीराची, कपड्यांची, वैयक्तिक आवडींची येथेच्छ आणि हिणकस चेष्टा केली जाते. ज्ञान मिळवण्यासाठी स्त्रियांना पुरुषांपेक्षा किती तरी तीव्र झगडा करावा लागतो. या सगळ्या श्रमांनंतर स्वत:चे मत-विचार व्यक्त करण्याची किंमत ट्रोलिंगसारख्या मनस्तापाला सामोरे जाऊन चुकवावी लागते. असाही हा दुहेरी तिढा आहे.

अभ्यासोनि प्रकटावे। ना तरी झाकोनि असावे।
प्रकटोनि नासावे। हे बरे नोहे।।

समर्थ रामदासांनी संभाषणामध्ये पाळायच्या शिष्टाचाराची, इतरांशी वागता-बोलताना घ्यायची काळजी किती नेमकेपणाने सांगितली आहे! ज्या विषयात आपल्याला गती आहे, आपले अभ्यासातून आलेले प्रभुत्व आहे- तिथेच व्यक्त व्हावे. बोलण्याची घाई करून आपले अज्ञान उघड करू नये. मात्र सहज सोपा वाटणारा हा सल्ला पाळणे महाकठीण असू शकते. रेबेका सोलनीट या प्रसिद्ध लेखिकेच्या आयुष्यात २००३ मध्ये घडलेला हा प्रसंग पाहा. त्यांनी नुकतेच एडवर्ड मायब्रीज (अमेरिकन फोटोग्राफर आणि मोशन सिनेमा तंत्राचा जनक) याच्या आयुष्यावर आधारित पुस्तक लिहिले होते. मायब्रीजच्या गोष्टीबरोबरच तंत्रज्ञान आणि कला यांचा अमेरिकेतील जीवनातील संबंध याचाही वेध घेणारे हे पुस्तक लक्षणीय ठरले. वाचकांच्या आणि समीक्षकांच्या पसंतीस उतरले. पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर काहीच काळाने लेखिका आपल्या मैत्रिणीबरोबर एका समारंभाला गेल्या. तिथे भरपूर श्रीमंती थाट असणाऱ्या (पुरुष) यजमानांनी बोलता-बोलता मायब्रीजचा उल्लेख आल्यावर, नुकतेच त्याचे चरित्र कसे प्रसिद्ध झाले आहे आणि कशी महत्त्वाची भर या चरित्रामुळे पडली आहे वगैरे सांगायला सुरुवात केली. रेबेकांनी आपणही कसे नुकतेच या विषयावरचे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले आहे, असं सांगायचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्या बोलण्याकडे जवळपास दुर्लक्ष करत, हे नवं पुस्तक कसं खूप महत्त्वाचं आहे, हे यजमान रेटत राहिले. रेबेका लिहितात, त्यांच्या बोलण्यात जवळपास उद्धटपणाकडे जाणारा आत्मविश्वास आणि ठामपणा होता. इतका की, संभाषण जसजसं पुढे जाऊ लागलं तसं रेबेकांना अशी खात्री वाटू लागली की, याच विषयावरचे आणखी एक पुस्तक आले असणार आणि आपल्या नजरेतून कदाचित ते सुटले असेल. मात्र पुस्तकातल्या ज्या संदर्भांचा यजमान उल्लेख करत होते, त्यांचा विचार केल्यावर रेबेकांच्या मैत्रिणीला ही खात्री पटली की, ही चर्चा आपल्याच मैत्रिणीच्या पुस्तकाची चालली आहे. तसं यजमानांच्या लक्षात आणून

द्यायचा प्रयत्नही त्यांनी केला. मात्र स्वत:चे म्हणणे समोरच्याला ऐकून घ्यायला लावण्याच्या भरात अर्थातच पाहुण्यांचे म्हणणे त्यांनी फारसे मनावर घेतले नाही. शेवटी तीन-चार वेळा मोठ्या आवाजात, पुन:पुन्हा ठामपणे मैत्रिणीने हे सांगितल्यावर अचानक यजमानांना मुद्दा कळला. यावर रेबेकांनी त्यांना विचारले, ''तुम्ही पुस्तक वाचलं आहे का?'' त्यावर पांढराफटक चेहरा झालेल्या यजमानांनी कसंनुसं हसून केवळ 'न्यूयॉर्क टाइम्स'मध्ये आलेले पुस्तकाचे परीक्षण वाचले आहे, अशी कबुली त्यांनी दिली. ज्या पुस्तकाची आपण इतकी वाहवा केली, ते एका बाईने लिहिले आहे आणि त्या बाई आपल्यासमोरच उभ्या आहेत, यावरचा त्यांचा अविश्वास त्यांचा चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता, असं रेबेका लिहितात. हा प्रसंग घडल्यावर काही काळाने, २००८ मध्ये रेबेका सोलनीट यांनी Men explain things to me या नावाचा निबंधवजा लेख लिहिला. असे अनुभव त्यांना वारंवार आले आहेत आणि सतत येत राहतात, यामागची भाषेतली व सामाजिक गुंतागुंत या लिखाणात समजून घेतली आहे. त्याचबरोबर अशा घटनांना mansplaining – मॅन्सप्लेनिंग असा शब्दही त्यांच्या लिखाणानंतर रूढ झाला. Man+Explaining हे दोन शब्द एकत्र करून तयार झालेल्या या शब्दाची खूप चर्चा झाली. न्यूयॉर्क टाइम्सने mans plaining ला word of the year २०१० मध्ये घोषित केले आणि २०१० नंतर वेगवेगळ्या इंग्रजी शब्दकोशांमध्ये mansplaining या शब्दाची अधिकृत रीत्या भर घालण्यात आली. -splain या



प्रत्ययाची भरही कालांतराने शब्दकोशात झाली, ज्याचा अर्थ आवश्यक नसताना आक्रमकपणे एखादी गोष्ट समजून सांगणे असा घेतला जातो. अमेरिकी संदर्भात, whitesplaining, baracksplaining असे अनेक शब्द यातून तयार झालेले दिसतात.

आता जवळपास दहा-बारा वर्षांनंतर या शब्दाचा अर्थ आणि त्याचा भाषेतला वापर यासंबंधी काही बाबी प्रस्थापित झाल्या आहेत, त्या अशा-

१. संभाषणातला भाग- ज्यामध्ये स्पष्टीकरण (explaination) आहे.

२. हे स्पष्टीकरण चुकीचे आहे.

३. बहुतेकदा हे स्पष्टीकरण ज्या व्यक्तीला सांगितले जात आहे, त्या व्यक्तीला या स्पष्टीकरणाची गरज नाही.

४. स्पष्टीकरण देणारी व्यक्ती (बहुतेकदा) पुरुष आहे.

५. ज्या व्यक्तीला हे स्पष्टीकरण सांगितलं जात आहे, ती (बहुतेकदा) स्त्री आहे.

६. स्पष्टीकरण देणारी व्यक्ती ठामपणे, अति-आत्मविश्वासानं, समोरच्याला काहीसे तुच्छ लेखण्याच्या हेतूने, समोरच्याला अक्कल शिकवण्याच्या स्वरात, समोरच्याला नामोहरम करण्याच्या हेतूने बोलते आहे.

असे अनुभव स्त्रियांना वारंवार येतात. मॅन्सप्लेनिंगचे भाषिक आणि सांस्कृतिक परिणाम स्त्री-पुरुष दोघांवर होत असतात. सामाजिक भाषाशास्त्राच्या अभ्यासामध्ये silence आणि silencing यावरही सखोल विचार झाला आहे. संभाषणात गप्प राहणे आणि समोरच्याला गप्प करणे याबद्दलचा हा अभ्यास आहे. मॅन्सप्लेनिंगमुळे स्त्रियांना पद्धतशीरपणे आणि व्यवस्थात्मक पातळीवर गप्प केले जाते. एखाद्याच्या मताला, सत्तेला कमी लेखण्यासाठी या तंत्राचा वापर पुरुषांकडून जाणते-अजाणतेपणानं, कधी सवयीनं, तर कधीच कुणीही अशा वागण्या-बोलण्याला आक्षेप न घेतल्यामुळे केला जातो. स्त्रियांचा आवाज, म्हणणं बाद करण्याकरता केले गेलेले हे वर्तन अनेकदा कुणाच्या नेमकं लक्षात येत नाही. यामध्ये एक लक्षात घेणे आवश्यक आहे की- पुरुषांनी दिलेल्या सगळ्याच स्पष्टीकरणांना, सल्ल्यांना मॅन्सप्लेनिंग म्हणत नाहीत. मात्र, रेबेका सोलनीटना वरती आलेला जो अनुभव आहे, त्यातल्या यजमान पुरुषाचा अतिआत्मविश्वास, समोरची स्त्री तज्ज्ञ नसणारच याबद्दलचा ठामपणा, ती व्यक्ती तज्ज्ञ आहे हे कळल्यावरही खजील वाटण्यापलीकडे फारसे मनाला

लावून न घेणे, माफी वगैरे मागणे तर दूरच, ही सर्व मॅन्सप्लेनिंगची लक्षणे आहेत हे ही लक्षात घेतले पाहिजे. आता अशी परिस्थिती कामाच्या ठिकाणी, औपचारिक संदर्भातही स्त्रियांना अनेकदा सहन करावी लागते; तर वैयक्तिक आयुष्यात नवरा, भाऊ, मित्र यांच्याकडूनही अशी वागणूक मिळण्याची शक्यता असतेच. रेबेका सोलनीट त्यांच्या लिखाणात हे दाखवून देतात की, हिंसा ही समोरच्याला गप्प करण्याचे, त्या व्यक्तीचे म्हणणे नाकारण्याचे एक साधन असते. यातून व्यक्तीची विश्वासार्हता आणि विश्वसनीयता (credibility and reliability) डावलणे शक्य होते. हिंसा जशी शारीरिक आणि मानसिक असते, तशी ती शब्दिकही असते. इथे हे ध्यानात ठेवलं पाहिजे की- विश्वासार्हता हे तगून राहण्यासाठी, टिकून राहण्यासाठीचे आवश्यक साधन आहे. कुटुंबात, समाजात, कामाच्या ठिकाणी इतरांचा आपल्या म्हणण्यावर विश्वास असणे, त्या विश्वासातून येणारा पाठिंबा उपलब्ध असणे यावर व्यक्तीचा आत्मविश्वास, स्वबद्दलचा आदर टिकून असतो. अविश्वासाला सतत जर सामोरे जावे लागत असेल तर व्यक्तीच्या जडण-घडणीमध्ये त्रुटी राहतात, आत्मविश्वास डळमळीत होतो. 'मला नाही बाई जमणार', 'उगीच कशाला?', '....तर मला सगळे हसतील, त्यापेक्षा नकोच त्या वाटेला जायला'- असे संवाद मुली-स्त्रियांकडून सर्रास ऐकायला मिळतात. यातून काय लक्षात येतं? तर एकीकडे इतरांनी सतत दाखवलेल्या दीर्घ काळ अविश्वासातून आलेला अनुभव स्त्रिया नवा निर्णय घेताना वापरत असतात. शिवाय आपल्या पुढच्या पिढीतल्या मुलींना असं नामोहरम होण्याचा अनुभव येऊ नये, म्हणून त्यांना एक तर फारसं घराबाहेर पडून जगात जाण्याची संधी नाकारली जाते किंवा सतत सतर्क राहण्याची सूचना केली जाते. यात सर्वांत वाईट भाग म्हणजे- अशा सततच्या संभाषणांमधून आपण खरोखरच पुरुषांपेक्षा दुय्यम आहोत, हा समज मनात घट्ट होण्याची शक्यता असते. मग जेव्हा असे संवाद आणि संभाषणं पिढ्यान्‌पिढ्या तशीच चालू राहतात तेव्हा, पुरुष आणि स्त्रियांच्या वागण्यातले- विशेषत: बोलण्यातले 'फरक' जाणवू लागतात.

असाच एक प्रचलित समज म्हणजे- स्त्रिया खूप जास्त बोलतात, बडबड्या असतात; तर पुरुष कमी, मोजकंच आणि महत्त्वाचंच बोलतात. आज अनेक संशोधनांनी हे दाखवून दिलं आहे की, हे खरं नाही. संभाषणांमध्ये पुरुष कायम वर्चस्व टिकवून असतात आणि इतकंच नव्हे, तर ते स्त्रियांपेक्षा जास्त बोलतातसुद्धा. अनेक प्रयोग-पाहण्या यातून हे दाखवलं गेलं आहे की, पुरुष दुसरं कुणीही- आणि विशेषत: स्त्रिया- बोलत असताना संवादात मधेच खंड पाडून, दुसऱ्याचं म्हणणं खोडून काढण्यासाठी आपलं म्हणणं मांडतात. या घटना आपल्या आजूबाजूला सहज बघायला मिळतात. स्त्रियाही अनेकदा जेव्हा संवादात मधेच उडी घेतात, ते मुख्य करून बोलणाऱ्याच्या मताशी आपण सहमत आहोत हे सांगण्याकरता. मॅन्सप्लेनिंग केवळ कामाच्या ठिकाणी किंवा कुटुंबातच केले जाते असे नाही; तर राजकारणात, धर्मव्यवस्थेत, नेतृत्वाच्या भूमिकांच्या ठिकाणीही दिसतं. समाजाने पुरुषांना स्वत:च्या मताला आपसूक जास्त किंमत द्यायला, तसं पुरुषांनी केलं की स्त्रियांनी त्याच्याशी जुळवून घ्यायला शिकवलेलं असतं- असं या सर्व क्षेत्रांत घडताना दिसून येतं. जोपर्यंत पुरुष आक्रमक असणे (संवादात आणि इतरत्रही) हा आपल्याला सकारात्मक 'पुरुषी गुण' वाटत राहणार आहे तोपर्यंत स्त्रियांना मधेच तोडून, त्यांचे तज्ज्ञ असणे डावलून संवाद घडत राहणार. ही शाब्दिक हिंसा ओळखणे, त्यातले बारकावे समाजातल्या कोणत्या समज-गैरसमजातून तयार झाले आहेत, हे अभ्यासणे गरजेचे आहे.

मॅन्सप्लेनिंग करणारी व्यक्ती आपल्या बोलण्यातील धार कमी करण्यासाठी अनेकदा विविध शब्दप्रयोगांचा हमखास वापर करताना दिसते. उदाहरणार्थ- 'पण मी काय म्हणतो', 'actually', 'खरं तर', 'मी तर फक्त माझं मत मांडत होतो, तुम्ही/तू उगीच इमोशनल झालीस', 'मला तसं म्हणायचं नव्हतं', 'मी फक्त माहिती सांगतोय' (जी अनेकदा चुकीची किंवा अर्धवट बरोबर असते), 'मी इतकं तुला समजवून सांगतोय/ पटवून देण्याचा प्रयत्न करतोय, तर आता मीच वाईट झालो'. मॅन्सप्लेनिंगचे हे बारकावे पाहण्याआधी त्याचे काही नमुनेदार किस्से पाहा. यातले बहुतेक संवाद ट्विटरवर घडलेले आहेत.

मॅन्सप्लेनिंगच्या अनुभवाबद्दल सांगताना एक जण म्हणते -men regularly try to explain that there weren't women writing in the Middle Ages (I have a PhD in medieval women's writing), तर दुसऱ्या एका संवादात विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात स्त्रियांचं प्रमाण कमी का आहे, या विषयावर प्रकाशित झालेल्या शोधनिबंधाबद्दल चर्चा चालू आहे-

She - So many 'solutions' to the lack of women in tech don't get at the actual problems...

He - You should read the full article. There's a chicken and egg problem w/ female tech role models. Men want to be the next Jobs/Gates/etc.

She - No

She - I WROTE THE ARTICLE.

आपल्या पहिल्या अंतराळ प्रवासाचे अनुभव फोटोसोबत शेअर करताना जेसिका मायर यांचा इंटरनेटवर घडलेला अनोळखी पुरुषासोबतचा संवाद बघून त्या इतक्या वैतागतात आणि लिहितात– When you're literally an astronaut and The Situation tries to mansplain space to you. हा संवाद असा घडला–

Jessica - My first ventre 63000', the space equivalent zone, where water spontaneously boils! Luckily I'm suited!

He - Wouldn't say it's spoantaneous. The pressure in the room got below the vapour pressure of the water at room temp. Simple thermo.

अजून एकजण लिहिते -Yesterday a man corrected my pronunciation of my name.

या उदाहरणामध्ये पाहिलं तर लगेच लक्षात येतं की– ज्या स्त्रिया आपापल्या क्षेत्रात उत्तम कामगिरी करताहेत, अगदी अंतराळात पोहोचल्या आहेत; त्या स्त्रियांनाही अनोळखी पुरुष स्वत:च्या किंवा या स्त्रियांच्या पात्रतेचा कोणताही विचार न करता धडाक्याने प्रश्न विचारताहेत, स्त्रियांच्या म्हणण्यावर शंका घेताहेत, त्यांना जास्तीचे पुरावे–दाखले द्यायला भाग पाडताहेत. इतकंच नाही, तर कुणी तरी एखादीला तिच्याच नावाचा बरोबर उच्चार काय आहे, हे समजवायला जातो आहे. हे सगळं भारतातही सतत घडत असतं. त्याबद्दल मुली–स्त्रियांनी मोकळेपणाने आवाज उठवण्याचं प्रमाण मात्र कमी दिसून येतं. अगदी अलीकडे प्रसिद्ध अभिनेत्री, विमान चालवण्याचे प्रशिक्षण घेतलेली, बायकिंगसाठी प्रसिद्ध आणि शिवाय फिटनेस गुरू समजली जाणारी गुल पनांग हिने आपला पुश–अप व्यायाम करतानाचा छोटा व्हिडिओ समाजमाध्यमावर शेअर केला होतं. त्याखाली पहिल्या काही कमेंटमध्येच एकाने असं लिहिलं होतं की– 'पुश–अप करताना तुमचा फॉर्म काही इतका ठीक वाटत नाही. तुम्ही अजून ट्रेनिंग नीट केलंत तर तुम्हाला जमेल.' यावर गुल पनांगने उत्तर म्हणून पुश–अपचे किती प्रकार असतात, हात–पाठ–पाय यांच्या स्थितीवर त्यांचे कसे प्रकार पडतात, शिवाय कोणत्या स्नायूंना कोणत्या पुश–अप व्यायामप्रकारामुळे फायदा होतो, हे सविस्तर उत्तर म्हणून लिहिल्यावर पुढे त्या व्यक्तीकडून कोणतीही कमेंट आली नाही. आता पाहा– या स्त्रीकडे निश्चित जास्त ज्ञान, माहिती आणि अनुभवही आहे. मात्र ते अशा प्रकारे सतत सिद्ध करत राहण्याची एक प्रकारची अलिखित आणि मनस्तापाची सक्तीही आहे. जग्गा जासूस चित्रपटाच्या निमित्ताने समीक्षकांनी कतरिना कैफ आणि रणबीर कपूर यांची एकत्र मुलाखत घेत असताना कतरिनाला काही प्रश्न विचारले. तेव्हा एका मुलाखतीत तिला बोलायची संधीच न देता रणबीरने तिला विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर दिलं, तर अजून एका मुलाखतीत ती बोलत असताना तिचं बोलणं अर्धवट तोडून उत्तर देण्याची आणि पर्यायाने संवादाची सगळी सूत्र आपल्याकडे घेतली. नॅशनल टीव्हीवर आपल्या सहकलाकारांशी असं वागण्याचं धाडस कुठून येतं? यावर बरीच टीका झाल्यावर मग रणबीर कपूरने एका मुलाखतीत आपली चूक मान्य केली.

आता हे सगळं वाचल्यावर, सगळे पुरुष असे नसतात, मग पुरुषांनी काय काहीच बोलायचं नाही का; स्त्रियांच्या चुका होतच नाहीत का; झाल्या तर दाखवूनही द्यायच्या नाहीत का; मी असा नाही तर मी कशाला या सगळ्यात लक्ष घालू– असे प्रश्नही उपस्थित होऊ शकतात. या आणि अशा प्रश्नांची उत्तरं देताना रेबेका सोलनीट स्वत: एका ठिकाणी लिहितात की– मॅन्सप्लेनिंग हा काही पुरुषांकडे अंगभूत असलेला दोष आहे, असं म्हणता येणार नाही. तसंच सगळे पुरुष मॅन्सप्लेनिंग करत नाहीत, हेही खरं आहे. मात्र, बहुतेक सगळ्या स्त्रियांनी याचा एकदा तरी अनुभव घेतला आहे किंवा मॅन्सप्लेनिंगच्या प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष परिणामांना सामोरे जावं लागल्याचा अनुभव बहुतेकींकडे आहे, हे यापुढे नाकारता येणार नाही. आपण ज्या प्रकारे मुलगे व मुली छोटे असल्यापासून जे धडे त्यांना आपल्या वागणुकीतून आणि समाजातल्या इतर संस्कारांतून घालून देत असतो; त्यामधून अशा प्रकारे पुढाकाराने, ठामपणे, चुकीचं असलं तरी आपलं म्हणणं बेधडकपणे मांडण्याची संधी मुलग्यांना मिळत असते. संभाषणात आत्मविश्वास दाखवण्याला काही किंमत असते आणि त्याचे फायदे असतात, हे जणू मुलगे मूल्य म्हणून अंगीकारतात. त्याचेच

पडसाद पुरुषांनी केलेल्या मॅन्सप्लेनिंगमध्ये दिसतात. तर दुसरीकडे- मुलींनी संवादात कायम पडती बाजू घ्यावी, दुसऱ्याचं चुकत असेल तरी त्याच्या सन्मानाचा विचार करून 'उद्धटपणे' त्याला तसं सांगू नये, असे अलिखित नियम/संस्कार/शिष्टाचार मुलीही अंगीकारताना दिसतात. यातूनच रेबेका सोलनीटसारख्या यशस्वी, अभ्यासू लेखिकेच्याही मनात 'माझ्याच नजरेतून हे दुसरं पुस्तक सुटलं असेल' असं न्यून सहज तयार होतं. लौकिक अर्थी यशस्वी स्त्रियांची ही गत असेल तर सर्वसामान्य स्त्रीचा रोजचा झगडा किती मोठा असेल, याची कल्पना केलेलीच बरी. स्त्रियांच्या चुका होत नाहीत का? त्या दाखवून द्यायच्या नाहीत का? तर हे ही मान्य केलं पाहिजे की, काही प्रमाणात स्वत:च्या मतांवर, ज्ञानावर शंका असणे (Self-doubt), उपस्थित केली जाणे, आपल्याकडच्या माहिती-तथ्यांविषयी (facts) पुन्हा पुन्हा खात्री करून घेणे हे शिकण्याच्या प्रक्रियेत नक्की उपयोगाचं असतं. त्यामुळे, समोरच्याने विचारलेले प्रश्न, उपस्थित केलेल्या शंका हे सगळं स्वत:ला घडवण्यासाठी उपयोगाचं ठरू शकतं. मात्र अशा प्रक्रिया संतुलित प्रमाणातच घडाव्यात. सततची शंका घेतल्याने, नाकारल्याने स्त्रियांना शिकायला प्रोत्साहन तर मिळत नाहीच उलट विचार- मतांमध्ये पंगूपण येण्याची शक्यताच खूप असते. वरच्या प्रश्नांच्या उत्तराकडे नेणारा एक सोपा मार्ग म्हणजे, 'मी ज्या स्त्रीशी संवाद करतो आहे ती जर पुरुष असती तर मला तिच्या ज्ञानाविषयी, मतांविषयी शंका वाटली असती का?' हा प्रश्न स्वत:ला विचारण्याचा मोकळेपणा दाखवणे. स्त्रियांची गुणवत्ता अशा प्रकारे पुरुषांच्या काल्पनिक गुणवत्तेशी तपासून पाहणे नक्की दुर्दैवाचे आहे. मात्र, हा सोपा आणि खात्रीशीर मार्ग आहे.

स्त्रियांचा संवादातला झगडा दोन पातळ्यांवर असतो. एक म्हणजे- 'जो काही' नेमका मुद्दा आहे, तो आत्मविश्वासपूर्वक समजून घेणे आणि मांडणे. आणि दुसरं म्हणजे- स्वत:ची स्वतंत्र मतं-विचार असू शकतात, सत्य आणि तथ्य या दोन्हींचे आपण हक्काचे दावेदार असू शकतो हे समोरच्याला पटवून देत राहणं. आता कुणाला जर असं वाटत असेल की- छे : परिस्थिती आता बदलली आहे; आता स्त्रिया मांडतात की मतं, समाजमाध्यमं-टीव्ही यावर बेधडक बोलतात. एकीकडे तर हे चित्र शहरी किंवा निमशहरी भागात काही प्रमाणात दिसतं. मात्र, अनेक ठिकाणी मॅन्सप्लेनिंग निमूटपणे सहन करावं लागणं हे स्त्रियांचं वास्तव आहे. तर दुसरीकडे ज्या स्त्रिया मोकळेपणी किंवा बेधडकपणे व्यक्त होऊ पाहतात, त्यांचे समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणात ट्रोलिंग होताना दिसते. त्यांच्या मतांना फारशी किंमत दिली जात नाही. अशा स्त्रियांच्या शरीराची, कपड्यांची, वैयक्तिक आवडींची येथेच्छ आणि हिणकस चेष्टा केली जाते. ज्ञान मिळवण्यासाठी स्त्रियांना पुरुषांपेक्षा किती तरी तीव्र झगडा करावा लागतो. या सगळ्या श्रमांनंतर स्वत:चे मत-विचार व्यक्त करण्याची किंमत ट्रोलिंगसारख्या मनस्तापाला सामोरे जाऊन चुकवावी लागते. असाही हा दुहेरी तिढा आहे. या सगळ्या गुंतागुंतीतून बाहेर पडण्यासाठी किम गुडविन नावाच्या लेखिका-अभ्यासिकेने चक्क तक्ता तयार करून ट्वीटरवर टाकला आहे. त्या लिहितात, 'माझे सहकारी मला सतत विचारत असतात की खरं मॅन्सप्लेनिंग कसं ओळखायचं, त्यांना सोपं जावं म्हणून हा तक्ता!' या तक्त्याची दखल बीबीसीनेही घेतली आणि या ट्वीटवर आधारित लेख प्रकाशित केला. मूळ इंग्रजीतच तक्ता वाचण्यात त्यातला गाभा आहे, म्हणून तो तसाच देते आहे.




**अपर्णा दीक्षित,** पुणे
aparna.a.dixit@gmail.com

दृष्टिक्षेप

छाया दातार

# स्थलांतरित कामगार आणि अर्थव्यवस्था

केंद्रीय गृहमंत्र्यांनी ८ एप्रिल रोजी प्रेस कॉन्फरन्समध्ये सांगितले की, २ कोटी बांधकाम मजुरांना ३००० कोटी रु. वाटण्यात येत आहेत. त्या वेळी प्रत्यक्षात परिस्थिती काय आहे, हे बघण्यासाठी हफ्पोस्ट इंडिया या ऑनलाईन वृत्तपत्राने अझीम प्रेमजी विद्यापीठाबरोबर काम करण्याचे ठरविले. आधी त्यांनी गृह मंत्रालयाकडे मागणी केली की, आम्हाला प्रत्येक राज्यामधून किती पैसे वाटले गेले आहेत याची माहिती पाहिजे. ती मिळाली नाही. मग त्यांनी प्रत्येक राज्याच्या अधिकाऱ्यांना विचारायला सुरुवात केली. दि.२१ ते २८ एप्रिल यादरम्यान हे सर्वेक्षण झाले. अनेक राज्यांनी सांगितले की, आमच्याकडे या मजुरांचे आधार नंबर नाहीत. बँकेचा तपशील नाही. साधारण ५.३ कोटी कामगारांना डिजिटल पेमेंट करता येणे शक्य नाही, असे लक्षात आले. डिजिटल इंडियाचा गवगवा करणाऱ्या या सरकारचे हे मोठेच अपयश म्हणावे लागेल.

या लॉकडाऊनच्या काळात स्थलांतरित कामगारांबद्दल अनेक लेख वाचायला मिळाले. त्यांच्यावर जी गंभीर परिस्थिती ओढवली आणि त्यांच्या मालकांनी त्यांना वाऱ्यावर सोडून दिले, त्यामुळे घराची वाट धरण्याशिवाय गत्यंतर ठेवले नाही याबद्दल बहुतेक सर्व होते. ज्या शहरांनी त्यांना आसरा दिला, काम दिले, उपजीविकेची साधने पुरविली आणि त्यांनी ज्या शहरातील उत्पन्नांमध्ये भर घातली, तेथील मध्यमवर्गीय व उच्चवर्गीय समाजाची जीवनशैली घडविण्यामध्ये ज्यांनी योगदान दिले; त्या समाजाने त्यांना एक दिवस सहज नाकारले, अपमानित केले, याचा त्यांना राग आला. निराधारासारखे वाटू लागले. उद्या कोरोना झाला तर काय होईल, या वातावरणामध्ये आपला निभाव कसा लागेल याची भीतीही त्यांना वाटत असावी. राहायला घर नाही आणि रस्त्यावर पोलीस राहू देत नाहीत. पोटाला अन्न नाही, प्यायला पाणी नाही. असा ना घराचा ना दारचा- असा भाव त्यांच्यामध्ये उत्पन्न झाला असावा. म्हणून कोणा दात्याची वाट न बघता त्यांनी आपल्या गावचा रस्ता धरला. उन्हातान्हात मैलोन्‌मैल चालावे लागेल, याची कल्पना असूनसुध्दा ते निघाले आणि दृश्यमान झाले. त्यांच्या या मुलाबाळांसकट चालतानाच्या प्रतिमा पाहून अनेकांच्या अंतरात्म्याला काटे टोचले असावेत. पण फार थोड्यांनी या घटनेचा आर्थिक अभ्यास केला असेल. या विषयासंबंधी मला सापडलेले काही लेख फार उपयुक्त वाटले. म्हणून मी त्यांच्यातून शिकून काहीएक मांडणी करणार आहे. त्यांचे संदर्भ खाली देत आहे.

**कोरोना व्हायरसमुळे केल्या गेलेल्या लॉकडाऊनमुळे भारतातील गरिबांचे ४ लाख कोटींचे नुकसान झाले आहे :** आयन जोस थॉमस, स्क्रॉल.इन

देशाचे वार्षिक उत्पन्न जर २०० लाख कोटी धरले, तर या स्थलांतरित कामगारांना दोन महिने काम मिळाले नाही आणि पगार मिळाला नाही याची किंमत जवळजवळ ४ लाख कोटी म्हणजेच राष्ट्रीय उत्पनाच्या २ टक्के एवढी झाली आहे. हे विश्लेषण भारतातील एकूण कार्यबलाचा आकडा लक्षात घेता सहजपणे करता येते. भारतातील एकूण कामगारांपैकी

११ कोटी ४२ लाख कर्मचारी पगारदार किंवा ज्यांना कायदेशीरपणे नियमित वेतन मिळत असे, तर ११ कोटी ५० लाख हे कंत्राटी कामगार आहेत आणि बाकीचे २४ कोटी २३ लाख हे स्वयंरोजगार ह्या वर्गीकरणामध्ये येतात. या स्वयंरोजगारांपैकी १४ कोटी ४१ लाख हे शेतीशी संबंधित व्यवहारांमध्ये मोडतात. उरलेले १० कोटी कामगार हे छोटे व्यापारी, घरगुती उत्पादन करणारे आणि त्याच्याशी संबंधित कामगार आहेत. या कंत्राटी कामगारांचे विश्लेषण करायचे झाल्यास असे म्हणता येईल की, त्यातील ५ कोटी ५० लाख हे शेतमजूर आहेत आणि ६ कोटी ५० लाख हे शेतीबाह्य काम करणारे (उद्योगधंद्यांसाठी) कंत्राटी कामगार आहेत. हे शेतीबाह्य काम करणारे कामगार हे महानगरे व छोटी शहरे येथे राहतात व काम करतात.

२०१८ मध्ये एप्रिल व मे महिन्यांत जे सर्वेक्षण करण्यात आले, त्यात असे दिसून आले की– ग्रामीण भागातील कंत्राटी कामगारांचा रोजीदर पुरुषांचा २८२ रुपये व स्त्रियांचा १७९ रुपये होता. शहरी कंत्राटी कामगारांचा दर पुरुष, ३३५ रुपये व स्त्रिया, २०१ रुपये एवढा होता. यामध्ये लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे, या कामगारांना महिन्यातील सर्व दिवस काम मिळेल याची शाश्वती नसते.

यासंदर्भात ग्रामीण भागातील नियमित कामगारांचे मासिक उत्पन्न सरासरी १४,०२४ रुपये, पुरुष व ९,८९५ रुपये– स्त्री असे होते. तसेच शहरी नियमित कामगारांचे सरासरी मासिक उत्पन्न– पुरुष १८,३५३ रुपये आणि स्त्री १४,४८७ रुपये असे होते.

स्वयंरोजगार करणाऱ्या ग्रामीण भागातील कामगारांचे सरासरी मासिक उत्पन्न ९,६५७ रुपये– पुरुष आणि ३,९२२ रुपये– स्त्री असे दिसते.

या स्थूल चित्राच्या पार्श्वभूमीवर सर्व कामगार व त्यांचे मासिक सरासरी उत्पन्न आणि त्या उत्पन्नाचा देशाच्या वार्षिक उत्पन्नातील (GDP) वाटा काढण्याचा प्रयत्न केला आहे. असे दिसते की, देशाच्या उत्पन्नामध्ये कामगारांच्या वेतनाद्वारे मिळणाऱ्या वार्षिक उत्पन्नाचा वाटा ३०.५ टक्के इतका असतो. बाकी सर्व संपत्तीवरील मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा असतो.

आपण या एकूण कामगारांमध्ये तीन वर्गीकरणातील कामगारांचे प्रमाण बघू आणि त्याचबरोबर त्यांचा एकूण वेतनबिलातील वाटा बघू. आपल्याला कल्पना येईल की, नियमित कामगार व कंत्राटी कामगारांचे प्रमाण सारखेच असूनही उत्पन्नातील वाट्यामध्ये चांगलीच तफावत आहे.

| | |
|---|---|
| नियमित कामगार | २४.२ टक्के |
| उत्पन्नबिल वाटा | ३७.९ टक्के |
| स्वयंरोजगार (शेतकरी धरून) | ५१.४ टक्के |
| उत्पन्नबिल वाटा | ४९.४ टक्के |
| कंत्राटी कामगार | २४.४ टक्के |
| उत्पन्नबिल वाटा | १२.७ टक्के |

या पार्श्वभूमीवर लेखकाचा मुद्दा असा की, मोदींनी जे पॅकेज दिले आहे, ते अतिशय कमी आहे. पहिले पॅकेज जे घोषित झाले ते तर २०–२१ या वर्षांतील बजेटमध्ये ज्या योजना होत्या, त्यासाठीची ती रक्कम होती. नवे किंवा आणखी काही त्यात नव्हते. परंतु वरील गणिते लक्षात घेता, असुरक्षित (कंत्राटी) कामगारांचा तोटा जवळजवळ ३ ते ४ लाख कोटींचा झालेला आहे आणि म्हणून देशाच्या सकल उत्पन्नाच्या १.६ ते २.२ टक्के इतके पैसे कामगारांमध्ये वाटणे जरुरीचे आहे. केवळ शहरी कंत्राटी कामगार किंवा स्थलांतरित कामागारांचा विचार केला तरी, त्यांना १.३ लाख कोटी ते १.८ लाख कोटी (म्हणजेच ०.७ ते ०.९ टक्के सकल उत्पन्न) सरकार देणे लागते. स्त्री कामगारांसाठी तर रुपये ५०००० कोटी ते रुपये ६०००० कोटी खास देण्याची गरज आहे. विविध प्रकारच्या प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना– ज्यामध्ये अन्नसुरक्षेसाठी धान्य वितरण करण्यात आले. ते धरूनही केवळ रुपये ३४,८०० कोटी खर्च झाले आहेत. ते अतिशय कमी आहेत. यावर टीका झाल्यावर मनरेगासाठीच्या बजेटमध्ये वाढ करण्यात आली आणि ती रुपये ५०,००० होती ती ९०,००० झाली. परंतु त्यातही मागील वर्षी झालेल्या कामाचे पैसे दिले गेले नसल्याचे लक्षात आले आहे आणि तेही पैसे यातूनच देण्याची योजना आहे. मागील वर्षी २०१९–२० मध्ये २७ कोटी ४० लाख लोकांनी मनरेगासाठी नोंदणी केली होती. त्यातील फक्त ७ कोटी ९ लाख लोकांना काम मिळाले होते. यंदा सर्व शहरी कंत्राटी कामगार घरवापसी करून आल्यामुळे त्या सगळ्यांना सामावून घेण्यासाठी किती तरी अधिक तरतूद करण्याची गरज आहे. त्यांचा उपयोग करून ग्रामीण भागातील संरचनात्मक कामे/इन्फ्रास्ट्रक्चर– ज्यामध्ये ग्रामीण रुग्णालयेही येतील– बांधावीत, असे लेखकाने सुचविले आहे.

दुसरा एक महत्त्वाचा लेख आहे बांधकाम मजुरांना जी वागणूक मिळाली, त्यासंबंधी.

**सगळ्या राज्यांनी मिळून बांधकाम मजुरांना रोख रक्कम देण्याचे कबूल केले होते. ते दहा लाख कामगार महिना होऊन गेला तरी पैसे मिळाले नाहीत म्हणून वाट बघत आहेत.** हफ्फिंग्टन पोस्ट.इन

काँग्रेस सरकारने सोशल सिक्युरिटी कायदा करून प्रत्येक प्रकारच्या कामगारांसाठी वेल्फेअर बोर्ड स्थापन करण्याची योजना आखली होती. उदा.बांधकाम कामगार, तसेच घरकाम करणारे घरगुती कामगार यांच्यासाठी प्रत्येकी एक याप्रमाणे बोर्ड तयार करून त्यांना त्याचे सभासद करून घ्यायचे आणि मग त्यांच्यासाठी पेन्शन योजना, मुलांना शिष्यवृत्ती, घरबांधण्यासाठी कर्जयोजना अशा तरतुदी त्यात होत्या. बंदरावर काम करणाऱ्या हमालांसाठी अशा तऱ्हेची योजना अनेक वर्षे चालत आली होती. बिडी कामगार स्त्रियांना अशा तऱ्हेच्या बोर्डाचा फायदा मिळत आहे. त्यासाठी बिडी कारखानदारांवर कर आकारण्यात आला आहे. रोजंदारी करणाऱ्या अशा कामगारांसाठी ही चांगली योजना आहे. यापैकी फक्त बांधकाम मजुरांसाठीचे बोर्ड प्रत्येक राज्यात स्थापन झाले आहे आणि बांधकाम कंत्राटदारांकडून हा कर वसूल करण्यात येतो. आश्चर्य म्हणजे, या मजुरांच्या याद्या मात्र त्यांच्याकडे मिळत नाहीत, हे या वेळी जेव्हा मजूर स्थलांतरित होत होते तेव्हा लक्षात आले. कोरोनासारख्या महामारीच्या काळात लॉकडाऊनमुळे अडकून पडलेल्या, एकीकडे नोकऱ्या गेलेल्या, भाड्याच्या घरात भाडे भरता येत नाहीत म्हणून घराबाहेर काढल्या गेलेल्या, हातात मार्चचा पगारही न पडलेल्या, एप्रिलमध्ये लॉकडाऊन उठेल या आशेवर शहरात कसेबसे जीवन कंठणाऱ्या या मजुरांना या प्रकारच्या कल्याणकारी योजनेचा फायदा मिळत नव्हता.

केंद्रीय गृहमंत्र्यांनी ८ एप्रिल रोजी प्रेस कॉन्फरन्समध्ये सांगितले की, २ कोटी बांधकाम मजुरांना ३००० कोटी रु. वाटण्यात येत आहेत. त्या वेळी प्रत्यक्षात परिस्थिती काय आहे, हे बघण्यासाठी हफ्पोस्ट इंडिया या ऑनलाईन वृत्तपत्राने अझीम प्रेमजी विद्यापीठाबरोबर काम करण्याचे ठरविले. आधी त्यांनी गृह मंत्रालयाकडे मागणी केली की, आम्हाला प्रत्येक राज्यामधून किती पैसे वाटले गेले आहेत याची माहिती पाहिजे. ती मिळाली नाही. मग त्यांनी प्रत्येक राज्याच्या अधिकाऱ्यांना विचारायला सुरुवात केली. दि.२१ ते २८ एप्रिल यादरम्यान हे सर्वेक्षण झाले. अनेक राज्यांनी सांगितले की, आमच्याकडे या मजुरांचे आधार नंबर नाहीत. बँकेचा तपशील नाही. साधारण ५.३ कोटी कामगारांना डिजिटल पेमेंट करता येणे शक्य नाही, असे लक्षात आले. डिजिटल इंडियाचा गवगवा करणाऱ्या या सरकारचे हे मोठेच अपयश म्हणावे लागेल. सर्वेक्षणाच्या वेळी कळले की, मार्चमध्ये केंद्र सरकारने राज्यांना विचारले होते की– ५२००० कोटी रुपये या करातून त्यांच्याकडे जमले असले पाहिजेत, त्याची जरा चाचपणी करा.

सर्वेक्षणातून लक्षात आले की, काही राज्यांनी त्यांच्याकडे ज्यांची नावे रजिस्टर्ड झालेली होती त्यांना रुपये १००० ते ५००० अशा वेगवेगळ्या रकमा द्यायला सुरुवात केली होती, पण त्यामध्ये काही तर्क वापरला नव्हता. उदा. कर्नाटक सरकारने २१,६२,००० रजिस्टर्ड कामगारांपैकी १०,०१,००० कमगारांना म्हणजे अर्ध्याच कामगारांना २०० कोटी रुपये दिले. ओडिशामध्ये २२ लाख बांधकाम मजूर होते, त्यांना १६.०७ लाख रुपये रोख रक्कम वाटली गेली. केरळ सरकार हे कम्युनिस्ट असल्यामुळे कामगारांबाबत अधिक सतर्क असण्याची कल्पना होती. पण तेथेही आधार नंबर व बँक अकाऊंट नसल्याची अडचण लक्षात आली होती. एकंदर २०,००,३०४ बांधकाम कमगारांपैकी २५ टक्के लाभार्थ्यांपर्यंत त्यांना पोचता आले होते. २०० कोटींपैकी फक्त ६८ लाख रुपये वाटले गेले होते. उत्तर प्रदेशमध्ये बीजेपीचे सरकार असूनही १९,९८,९०० कामगारांपैकी केवळ १४,७४,३२१ कामगारांपर्यंत ते पोचले होते.

आणखी काही अडचणी अशा होत्या की, त्यामुळे पैसे बँकेत जाऊनही कामगारांना बँकेपर्यंत पोचता येत नव्हते. लॉकडाऊनमुळे बाहेर जाण्याची बंदी होती. एटीएममध्ये जाता येत नव्हते. हरियाणातील बिहारी कामगारांनी सांगितले की, बिहार सरकारने त्यांना सक्ती केली होती की त्यांचे बँक खाते बिहारमध्येच असले पाहिजे. त्यामुळे पैसे बँकेत जमा होऊनही उपयोग नव्हता. त्यांच्याकडे साधा मोबाईल फोन चार्ज करण्यासाठी पैसे नव्हते. राजस्थानमध्ये सरकारने असे पाहिले की, हे पैसे कुटुंबाला मिळतील. त्यामुळे एखाद्या कुटुंबातील दोन वा तीन व्यक्ती– त्यामध्ये महिलाही असेल तरी प्रत्येकाच्या खात्यात पैसे जाणार नाहीत. शिवाय त्या कुटुंबाला इतर काही योजनेअंतर्गत पैसे मिळाले असतील, तर त्यांना बांधकाम कल्याणकारी योजनेचा पैसा मिळणार नाही. या सरकारी अध्यादेशाचा कामगार कार्यकर्त्यांना भयंकर राग आलेला होता. त्यांचा मुद्दा होता की, कुटुंबातील

प्रत्येक व्यक्ती जर बांधकाम करत असेल, रजिस्टर्ड असेल; तर फक्त कुटुंबप्रमुखाच्या हातात पैसे देणे, हा कोणता तर्क आहे? कारण कंत्राटदाराने कर प्रत्येक कामगाराच्या नावे भरला होता. या संकटकाळी त्याचा फायदा झाला नाही, तर काय उपयोग आहे? हरियाणामध्ये हाच तर्क वापरला गेला आणि ज्या कुटुंबामध्ये नवरा-बायको दोघेही काम करतात तिथे ३४,७८२ कामगार वंचित राहिले. तसेच दुसऱ्या एका योजनेखाली काही कामगारांना पैसे मिळाले आणि म्हणून ७१,०४३ कामगार पुन्हा या वैशिष्ट्यपूर्ण बांधकाम कल्याणकारी योजनेखाली वंचित राहिले. ती रक्कमही किती अल्प होती- फक्त रुपये २५०० प्रत्येकी, केवळ एकाच हप्त्यात दिली जाणारी.

या लेखाच्या शेवटी लेखकाने निष्कर्ष काढला आहे की, डिजिटल पद्धतीमुळे लाभार्थींची संख्या कमी करणे शक्य झाले आणि राज्याच्या सरकारांना उरलेल्या पैशांचा फायदा मिळाला.

**कोरोना व्हायरसमुळे २६ कोटी लोकसंख्या गरिबीच्या गर्तेत लोटली जाणार आहे, असे ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी येथील संशोधकांनी अनुमान केले आहे.** हफ्फिंग्टनपोस्ट.इन

युनोने ऑक्सफर्ड विद्यापीठाबरोबर २०१९ मध्ये काम करून भारतात एक संशोधन केले होते. त्यामध्ये गरिबीचे प्रमाण काढण्याकरिता त्यांनी १० प्रकारचे निर्देशक वापरले होते. त्या अभ्यासाप्रमाणे २००६ ते २०१६ या काळात (मुख्यत: काँग्रेसचे शासन असताना) भारतातील तळागाळातील २७ कोटी १ लाख लोक गरिबीच्या रेषेवर उचललेले गेले होते. तरीसुद्धा ३६ कोटी ९ लाख लोक अजूनही गरीब बाकी राहिले होते. सबिना अलकिरे या बाईंनी या अभ्यासामध्ये भाग घेतला होता. त्यांनी आता जाहीर केले की, या लॉकडाऊनमुळे सध्या पुन्हा २६ कोटी लोक गरिबीच्या रेषेखाली ढकलले गेले आहेत. हा निष्कर्ष काढण्यासाठी १० निर्देशांकांपैकी कोणत्याही तीन निर्देशकांमध्ये जर ते वंचित राहत असतील, तर ते गरिबीरेषेखाली गेले असे समजले जाते. त्यांच्यामते, या कोरोनाच्या महामारीमुळे आणि लॉकडाऊनमुळे जे लोकांचे उत्पन्न बुडाले व अन्नधान्याच्या वाहतुकीवर परिणाम झाला, त्यामुळे कुपोषण होणार आहे. मुले जेव्हा कुपोषणाची बळी होतात, तेव्हा त्याचा मुख्य परिणाम त्यांच्या मेंदूवर होतो आणि त्याची प्रगती होत नाही. जे पूर्वी गरिबीचे बळी नव्हते, पण अगदी काठावर होते; त्यांच्यामधील १० टक्के लोकांमध्ये कुपोषण वाढले तर असे म्हणता येते की, ४ कोटी २ लाख पुन्हा एकदा गरिबीच्या खाईत बुडाले आहेत. याच लोकांची मुले जर शाळेत जाऊ शकली नाहीत, तर त्यांना शाळेत मिळणारे मध्यान्ह भोजन मिळणार नाही आणि त्याचा परिणाम त्यांच्या गरिबीच्या स्थानावर नक्कीच होईल.

या अभ्यासात म्हटले आहे की, सुरुवातीला केवळ १.७ लाख कोटी रुपयांचे 'राहत पॅकेज' देण्यात आले. त्यामध्ये जुन्याच योजनांची भरती होती. नव्याने बेरोजगार होणाऱ्या लोकांसाठी काहीच व्यवस्था नव्हती. त्यानंतर ४५ दिवसांनी दुसरे २० लाख कोटींचे पॅकेज आले. त्यामधून आणखी काही प्रमाणात मोफत अन्नधान्य देण्याची सोय झाली, परंतु त्यातही रेशनकार्ड असण्याचा आग्रह होताच. अनेकांकडे रेशनकार्ड नव्हते. भटक्या-विमुक्त जमातींकडे रेशनकार्ड सहसा नसतात. स्थलांतरित कामगारांकडेही रेशनकार्डे नव्हती. त्यामुळे जेवढ्या प्रमाणात अन्नधान्याचे वितरण व्हायला पाहिजे, तेवढे झाले नाही. शिवाय सरकार सतत २०११ च्या जनगणनेचे आकडे प्रमाण मानत आहे आणि त्यावर आधारित गणिते करत आहे. पण आता दहा वर्षे पुढे गेली आहेत आणि लोकसंख्या वाढली आहे, हे गृहीत धरले गेले नाही. त्यामुळेच हिमांशू या जेएनयूमधील अर्थशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की- ज्या लोकांना या अन्नधान्य वितरणाचा फायदा मिळाला नाही, असे किमान १० कोटी लोक असले पाहिजेत. 'ड्रेझ' या अन्नधान्य सुरक्षितता या विषयावर काम करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञाचे म्हणणे आहे की, केवळ तीन महिने मोफत धान्य देऊन काम भागणार नाही. आता पावसाळा येत आहे आणि तेव्हाही लोकांना काम मिळत नाही. त्यासाठी पुढचे धान्य येईतोवर किंवा खरिपाचे पीक निघेतोवर आणखी तीन महिने अन्नधान्याचा पुरवठा करणे आवश्यक आहे. ऋतिका खेरा यांच्यामते, कुपोषण हा केवळ एका पिढीचा प्रश्न नाही तर तो पिढ्यान्‌पिढ्यांचा प्रश्न आहे. गर्भवती आईचे कुपोषण झाले तर तिची मुले जन्मत:च कुपोषित राहतील, मग पुढे कितीही अन्नाचा पुरवठा झाला तरी त्यांचे भवितव्य बदलणार नाही. ऋतिका खेरा या अहमदाबादच्या मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटमध्ये प्राध्यापक आहेत. त्यांच्या मते, २६ कोटी भारतीय याप्रसंगी पुन्हा एकदा गरिबीरेषेच्या खाली गेले, तर त्यांना आश्चर्य वाटणार नाही. जो काही छोटा बदल, नफा आपण २००६ ते २०१६ या काळात मिळविला, तो सर्व या लॉकडाऊनच्या

काळातील अकार्यक्षमतेमुळे मातीत गेला आहे.

गंमत म्हणजे, रंगराजन कमिटीने एक अहवाल तयार केला होता आणि दाखविले होते की, भारतातील गरिबी वाढत आहे. पण मोदी सरकारने तो अहवाल केराच्या टोपलीत टाकून दिला. आता निती आयोग- जो मोदी सरकारने स्थापन केला आहे तो- म्हणत आहे की, आम्ही ही MPI म्हणजेच अनेक निर्देशांकांवर आधारित गरिबीची संकल्पना वापरून पुन्हा एकदा गरिबीचे प्रमाण काढू. अलकिरे यांचे म्हणणे आहे की, या महामारीच्या संधीचा फायदा घेऊन अतिशय सक्षम धोरणे आखून सहा महिन्यांमध्ये त्यांची अंमलबजावणी केली गेली, तर अजूनही हे कुपोषणाचे संकट दूर करता येईल आणि गरिबीमध्ये ढकलले जाण्याच्या स्थितीतून लोकांना बाहेर काढता येऊ शकेल. २००६ ते २०१६ या काळात राष्ट्रीय सकल उत्पन्नामध्ये जी चांगली वाढ झाली, त्याचा फायदा मिळून गरिबी रेषेच्या वर अनेक लोकांना काढता आले. पण आता घसरणीला लागलेल्या अर्थव्यवस्थेमुळे पुन्हा एकदा त्या गरिबी रेषेच्यावर आलेल्या लोकांना खाली जावे लागत आहे. त्यांना जरी वाचविता आले तरी खूप फायदा झाला, असे म्हणता येईल.

**भारतीय उद्योगधंद्यांनी कामगारांकडून वेठ-बिगारीची मागणी केलेली दिसते :** विवेक मेनेज़ेस, कारवान मॅगेझिन

या पार्श्वभूमीवर जेव्हा हे स्थलांतरित मजूर बेरोजगारी आणि अन्नपाण्याचा अभाव यांना कंटाळून आपापल्या गावी जायला निघाले, तेव्हा त्यांच्या जुन्या मालकांनी, ठेकेदारांनी त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. शेवटी कित्येक जण पायीच निघाले, बायका-मुले यांना बरोबर घेऊन. त्यानंतर वार्ताहरांनी दिलेल्या बातम्यांनी आणि फोटोंमुळे केंद्र सरकारला जाग आली आणि मग जवळजवळ ४५ दिवसांनी श्रमिक रेलगाड्या सोडण्यात आल्या. त्याच वेळी गोवा आणि कर्नाटक सरकार यांनी या जाणाऱ्या मजुरांना थांबवून घ्यायचे ठरविले. मुख्यत: तेथील कंपन्यांनी सरकारला साकडे घातले की- आता हे मजूर गेले, तर आम्ही कामे कशी सुरू करणार? गोव्यात ७१००० मजुरांनी गावी जाण्यासाठी नोंदणी केली होती, हे कळताच अनेक कंपन्या सरकारकडे धावून गेल्या. त्यांनी सरकारला विचारणा केली की- आम्ही तर ऐकले आहे की, अनेक मजुरांची राहण्याची व खाण्या-पिण्याची सोय केली गेली होती; असे असताना ते असे लोंबकळत आहेत आणि त्यांना घरी जाण्याची आस लागली आहे, हा समज चुकीचा आहे. सरकारतर्फे मोफत प्रवास करायला मिळतो आहे, हे कळल्यामुळे ते नावे नोंद करण्यासाठी येत आहेत. खरे तर या मजुरांनी मालकांना सोडून देऊन त्यांचा गुन्हा केलेला आहे. आता मालक हतबल झालेले आहेत. तेव्हा तुम्ही या गाड्या रद्द करा आणि पुन्हा सर्वसामान्य जीवन चालू करायला मदत करा. सरकारने समुपदेशन केंद्रे चालू करावीत आणि त्यांना येथेच राहण्यासाठी उद्युक्त करावे. कारण एकदा ते गेले की, एवढ्यात परतणे शक्य नाही. अनेक उत्पादनक्षेत्रांना मजुरांच्या अभावाचा त्रास होणार आहे. या मागणीला समांतर मागणी कर्नाटकातील मालकांच्या संघटनेने केली. विशेषत: बांधकामासाठी मजुरांची आवश्यकता पटविण्याचा त्यांचा प्रयत्न होता. एका बाजूला मालकांनी काम न करता दोन महिन्यांचा पगार मजुरांना दिला पाहिजे, असा अध्यादेश पंतप्रधान मोदी यांनी काढला होता; परंतु किती मजुरांना त्यांच्या मालकाने पगार दिले याची चौकशी केली नाही. एवढेच नव्हे, तर सर्वोच्च न्यायालयात यासंबंधी पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशन दाखल करण्यात आले होते आणि न्यायधीशांनी सरकारी अध्यादेशाचा अवमान केला म्हणून मालकांना शिक्षा द्यावी, असे आवाहन केले होते. त्यावर निर्णय म्हणून न्यायलयाने ही जबाबदारी दोन्ही पक्षांवर सोपविली आणि आपापसात समजुतीने काम करावे, असे सुचविले. शेवटी दोघांनाही एकमेकांची गरज असणारच आहे तेव्हा त्यामध्ये आम्ही येणे बरोबर नाही, अशी सारवासारव केली.

हा मजुरांचा कारवा चालू आहे तोवर मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश येथील सरकारांनी कामगार कायद्यांमध्ये बदल करून कामाच्या आठ तासांऐवजी १२ तास काम करवून घेण्याची मुभा मालकांना दिली. कारण काय, तर त्यांचा नफा इतके दिवस बुडाला आहे, त्याची भरपाई करून देण्याची जबाबदारी मजुरांवर आहे, असा त्या कायद्यातील बदलाचा अर्थ आहे. कॉन्फडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीने जेव्हा केंद्रीय कामगारमंत्री संतोषकुमार गंगावर यांची भेट घेतली, तेव्हा त्यांच्याकडे मागणी केली की- मजूर जर आपापल्या कामावर रुजू झाले नाहीत तर त्यांच्यासाठी 'ताबडतोब रुजू व्हा', असा हुकूम काढला जावा अन्यथा त्यांनी बेकायदा संप केला आहे, असे समजून त्यांच्यावर कारवाई व्हावी. त्यांनी पुढे अशीही जोड केली की- जे मजूर शेल्टर होममध्ये

रहात आहेत, त्यांचा शोध घेऊन ते जिथे राहत असतील त्याच्या जवळपासच्या उद्योगधंद्यामध्ये त्यांनी कामाला जावे, अशी सक्ती त्यांच्यावर करण्यात यावी.

हे बदल होत आहेत तोवर ओडिशा सरकारने परत येणाऱ्या मजुरांवर जबाबदारी टाकली की- तुम्ही चाचणी करून सिध्द केले असेल की तुम्हाला कोरोनाचा संसर्ग झाला नाही, तरच तुम्हाला ओडिशामध्ये प्रवेश मिळेल. यामध्ये एक तर ओडिशामधील कोरोनाबाधितांची संख्या वाढू नये, हा मुद्दा असावा. आणि दुसरा मुद्दा- परत आलेल्या मजुरांना काम काय द्यायचे, म्हणून ते न आल्यास बरे- अशा तऱ्हेने जबाबदारी झटकून टाकण्याची वृत्ती. टोलवाटोलवी ही तर मजुरांना सहानुभूती न दाखविण्यासाठी सोईची सर्कस, असेच म्हणावे लागते. परराज्यात गेलेल्या लाखो मजुरांनी पाठविलेल्या पैशांमुळे ओडिशा सरकारची अर्थव्यवस्था कशीबशी टिकून आहे याची बेदखल करणे, असा याचा अर्थ आहे. गंमत म्हणजे, सरकारने परदेशी असलेल्या विद्यार्थ्यांना व अडकलेल्या पर्यटकांना आणण्यासाठी विमाने पाठविली आणि आताच्या मिशन दोनमध्ये दुबई व इतर इमरातीतील मजुरांना- ज्यांची नोकरी गेलेली आहे अशांना- आणण्यासाठीही विमानांची सोय केली आहे. यातील अनेकांमुळे पुन्हा एकदा कोरोनाची साथ वाढणार असण्याची शक्यता आहे, हे माहिती असूनही सरकारने त्यांना परत आणले. काहींनी त्यांची तिकिटे स्वत: काढली. पण त्यांना सन्मानाने वागविले. त्यातील महत्त्वाचा भाग हा आहे की, हे मजूर व नोकरदार घरी परकीय चलन पाठवीत असत. चीन व भारत या दोन्ही देशांना या प्रकारे भरपूर परकीय चलनाचा फायदा मिळालेला आहे. आपली निर्यात आयातीपेक्षा कमी आहे, पण या नोकरदारांनी मिळविलेल्या परकीय चलनाचा आपल्याला नेहमीच उपयोग झालेला आहे. थोडक्यात, परकीय चलन आणणाऱ्या स्थलांतरितांना एक न्याय आणि देशांतर्गत स्थलांतर करणाऱ्यांना दुसरा न्याय, अशी विषम नीती येथे वापरली गेली होती.

सर्वोच्च न्यायालयाकडे जेव्हा अर्ज केला गेला की, या मैलोन्‌मैल पायी गावाकडे निघालेल्या मजुरांना थांबवा. तेव्हा न्यायालयाने निर्णय दिला की, ते स्वतंत्र आहेत. आपल्या संविधानाप्रमाणे त्यांना चालण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यांना कोणी अडवू शकत नाही. तरीही पोलीस ठिकठिकाणी त्यांना अडवत होते, त्यांचे ट्रक्स थांबवीत होते आणि ओढून बाहेर काढत होते. का, तर लॉकडाऊन कायद्याचे उल्लंघन केले म्हणून. परंतु त्या वेळी सर्वोच्च न्यायलयाला या मजुरांची काळजी वाटली नाही आणि त्याने केंद्र सरकारला त्यांच्यासाठी रेल्वेगाड्यांची सोय करायला सांगितले नाही. जेव्हा हा मजुरांचा एक्सोडस संपत नाही असे लक्षात आले, तेव्हा कोठे गाड्यांची सोय करण्याचे ठरले. जूनच्या पहिल्या आठवड्यात पंधरा दिवसांच्या आत या मजुरांना त्यांच्या गावी जाण्याची सोय करा, असा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आला. गाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची, खाण्याच्या सोई नव्हत्या अशा अनेक तक्रारी ऐकायला मिळाल्या, तरीही रेल्वेमंत्र्यांना तंबी देण्याचे न्यायालयाला सुचले नाही हेही लक्षात घेण्याजोगे आहे.

या सर्वाचा अर्थ एकच होतो की- पब्लिक इंटरेस्ट, सर्वांच्या भल्यासाठी किंवा देशाच्या भल्यासाठी कामगारांनी स्वत:च्या हक्काचा बळी द्यायचा. सरंजामशाही आणि पुढे वासाहतिक शासनसंस्था आल्यावर अशा तऱ्हेने बंधुआ मजूर गोळा करण्याची पद्धत होती. वेठबिगारी काम करण्यासाठी त्यांना सक्ती केली जायची, तसेच वातावरण आज तयार होते आहे असे दिसते. चिन्मय दुबे यांनी स्थलांतराचा इतिहास लिहिला आहे आणि त्यामध्ये १८३० पासून कसे खंडित मजूर किंवा इंडेंचर्ड मजूर घेऊन ब्रिटिश कसे मॉरिशसला गेले, पुन्हा एकदा १९२० मध्ये असाच मजुरांचा जथा कॅरेबियन बेटांकडे, मग दक्षिण आफ्रिकेकडे आणि पुन्हा एकदा मॉरिशसकडे नेला- याचे पुरावे दिले आहेत. हे काळ्या लोकांसारखे गुलाम नव्हते. त्यांच्याबरोबर करार केला जाई, पण कामगार कायद्यांचेही फायदे दिले जात नसत. उसाच्या शेतांमध्ये ते रात्रंदिवस राबत. मुख्यत: शेतीचे काम करण्यासाठी त्यांचा उपयोग केला जात असे, परंतु परतीचे कोणतेच मार्ग त्यांच्याकडे नसत. ती एक प्रकारची तस्करीच होती.

या चारही लेखांतून स्थलांतरित कामगारांच्या आर्थिक योगदानाचे, तसेच या लॉकडाऊनच्या काळात ते त्यांच्या कष्टाच्या संधीला व त्यातून मिळणाऱ्या रोजी-रोटीला किती प्रमाणात मुकले आहेत याचे चित्र दिसू लागते. मग पंतप्रधान कितीही म्हणू देत की- पुन्हा सर्व नॉर्मल होईल, देशाची आर्थिक प्रगती होईल; पण या काळात कात्रीत सापडलेल्या या मजुरांना गरिबीच्या खाईतून वर येण्याची संधी मिळण्याची शक्यता कमी वाटते.

**छाया दातार,** मुंबई
chhaya.datar1944@gmail.com

# प्रतिसाद

## चिनी वस्तू खरेदी न करण्याचा निश्चय केला पाहिजे

'चीनविषयक विशेष अंक' यात सर्वपैलूस्पर्शी मांडणी अपेक्षित असते, ती दि.४ जुलैच्या अंकात पुरी झाली आहे. रामचंद्र गुहा हे इतिहासकार, विचारवंत व तज्ज्ञ आहेत. त्यांच्या लेखातील प्रतिपादनाशी खूपच सहमत झालो तरी, एक बाब लिहावीशी वाटते. चीनबाबतीत पंडित नेहरू यांच्याकडून गाफिल राहण्याची ऐतिहासिक चूक झाली, याबाबतीत कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही. नेहरूंचे देशाच्या स्वातंत्र्योत्तर जडण-घडणीत मोठे भरीव योगदान आहे, पण ते भारावून गेले. चीनविषयी इशारे मिळत असूनही ते बेसावध राहिले आणि त्याची किंमत देशाला मोजावी लागली. सध्याच्या बाबतीत नरेंद्र मोदी गाफिल राहिले, असं म्हणता येणार नाही. मोदी बरेच धूर्त आहेत. त्यांनी वेळप्रसंगी चिनी सत्ताधाऱ्यांच्या गळ्यात गळे घातले म्हटले तरी, त्यात राजकारणाचा भाग बराच आहे, असे म्हणता येते. मोदींनी सावधपणा सोडलेला दिसत नाही. जशास तसे वागताना दिसतात, याचे प्रत्यंतर डोकलामप्रसंगी दिसून आले आहे. सत्तर दिवस खडाजंगी झाली व प्रश्न पूर्ण सुटला नाही, असे असूनही कुणाचा जय वा पराभव झाला, असे मुळीच म्हणता येणार नाही. आताही संयमाने परिस्थितीला तोंड देत जागेवर उभे राहण्याची भूमिका पार पाडताना ते दिसतात. काय होईल हे सांगता येत नसले, तरी येईल त्या आव्हानाला तोंड देण्याची तयारी करीत आहेत, त्यांत बेसावधपणा आहे असे म्हणता येणार नाही.

संकल्प गुर्जर यांचा 'चीनचे खरे आव्हान राजकीय आहे' हा लेख उत्तम आहे. राजकीय पातळीवरूनच सोडविण्याचे प्रयत्न चालू आहेत. प्रश्न राजकीय असला तरी त्यासोबत आर्थिक व लष्करी बाजू येतात. प्रसंग आलाच तर लढाईचे आव्हानही स्वीकारावे लागेल, हे उघड आहे. कारण आंतरराष्ट्रीय राजकारणात तोल सांभाळत वाटचाल करायची असेल, तर चीनचे राज्यकर्ते बऱ्याच प्रमाणात आततायी व विस्तारवादी भूमिका घेत आहेत. त्यांना लष्करी व आर्थिक शक्तीचा गर्व सध्या झालेला आहे. ते चीनला व त्याबरोबर आपल्याला युद्धाच्या खाईत लोटतील याची शक्यता नाकारता येत नाही. अर्थात हे युद्ध मर्यादित प्रमाणात, मर्यादित क्षेत्रात व बरेच पारंपरिक शस्त्रांनी होण्याची शक्यता आहे. यामध्ये दोन्ही देशांचे अतोनात आर्थिक व सैनिकांच्या जीवांचे नुकसान होईल. आपल्याला आजच्या आर्थिक परिस्थितीत युध्द खूप महागात पडेल. म्हणून युद्ध टाळण्यास प्राधान्य देणे भाग आहे. पण वेळ आलीच तर विजयासाठी युध्द करण्याची तयारी ठेवणे भाग आहे. यांतून सर्वंकष युध्दाची ठिणगी पडणार नाही, यांची काळजी दोन्ही देशांना घ्यावी लागेल; अन्यथा विजय, विकास, विस्तार पडतील बाजूला आणि अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनही सावध राहत, प्रसंगी समंजस भूमिका घेत सावधानता बाळगावी लागत आहे.

प्रभाकर देवधर यांची आत्मनिर्भरतेची चिकित्सा उत्तम आहे. दीर्घकालीन योजना अमलात आणली पाहिजे. संकल्प गुर्जरही राजकीय आव्हान पेलण्यासाठी संयमाने दीर्घकालीन धोरण राबवले पाहिजे, असे सांगत आहेत. प्रश्न आजच्या घडीला जरा वेगळा आहे. चीन आपला मित्र, प्रतिस्पर्धी की शत्रू- हा प्रश्न गेल्या साठ वर्षांत जसाच्या तसा आहे. मित्र नाही, हे उघड आहे; पण मैत्री दाखवावी लागते. प्रतिस्पर्धी म्हणावा तर आर्थिक बाबतीत चीनने एवढी आघाडी घेतली आहे की, आपण त्यांच्यापुढे लहान दिसायला लागलो आहोत. आपला 'मॉरल' लोकशाहीचा व चीनचा संक्रांतीच्या हुकूमशाहीचा. त्यांतले आपले मॉडेलच यशस्वी व्हायला पाहिजे, हे खरे. पण आज चीनचे मॉडेल प्रभावी झाले आहे. या परिस्थितीत चीन शत्रू असला तरी शत्रू न म्हणता मैत्रीचे राजकीय नाटक चालू ठेवत, त्याच्याशी होता होईल तेवढी स्पर्धा करीत राहिले पाहिजे. पण प्रश्न याने मार्गी लागत नाहीत. चीनवर आपण इतके अवलंबून आहोत की, चीनला एकदम बाजूला झटकणे इष्ट वाटत असले तरी ते शक्य नसेल. फार्मसी, इलेक्ट्रॉनिक, दूरसंचार, खेळणी या क्षेत्रांत आपण चीनवर अवलंबून आहोत. त्यामुळे चिनी

मालावर बहिष्कार किंवा त्या पेटवणे, या कृती योग्य वाटत असल्या तरी पूर्ण शक्य नाहीत. हे सारे भाबडे स्टंट वाटतात. आपली निर्यातही आपल्या चीनकडून होणाऱ्या आयातीवर अवलंबून आहे. हे सारे असेच चालू द्यायचे का, हा प्रश्न आहे. आपण चीनला करायच्या निर्यातीत बहुतांशी कचरा माल निर्यात करतो व चीनचा तयार माल आयात करतो. आपली आयात निर्यातीच्या दुपटीहून जास्त आहे. यामुळे व्यापारात आपले वसाहत असल्यासारखे शोषण चीन करीत आहे. या बाबतीत आपल्याला एकदम आत्मनिर्भर होता येत नसले तरी झाले मात्र पाहिजे. त्यासाठी वैयक्तिक पातळीवर आपण शक्यतो चिनी माल, सेवा खरेदी न करण्याचा प्रयत्न अवश्य केला पाहिजे. याचा परिणाम हळूहळू पण निश्चितपणे होईल. आजची स्टंटबाजी नकोय, त्याऐवजी चिनी वस्तू खरेदी न करण्याचा निश्चय केला पाहिजे. दुसरे असे की– देश म्हणून आपण चीनकडून आयात करतो, त्या आयातीसाठी अन्य देशांचा पर्याय शोधण्याचे प्रयत्न वाढवले पाहिजेत. वेळ लागेल, पण ते जमेल. आत्मनिर्भर होण्यासाठी वेळ लागेल, तोपर्यंत ह्या पर्यायांचा उपयोग होईल.

साधनामध्ये डॉ.सतीश बागल चीनविषयी ऐतिहासिक मालिका लिहीत आहेत. तिच्यापासून बरेच शिकण्यासारखे आहे. भारत–चीन संबंधांची सद्य:परिस्थिती बरीच चिंताजनक आहे, पण घाबरून चालणार नाही. धैर्याने व संयमानेच आव्हानांना तोंड दिले पाहिजे. याउलट युध्दज्वर होऊ देणे शहाणपणाचे नाही. वस्तुस्थिती मान्य करीत, लष्करी व त्यापेक्षा जास्त महत्त्वाचे आर्थिक सामर्थ्यवान होण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणेच हितावह आहे.

**अरुण वि.कुकडे,** नाशिक

## तो अंक एकहाती वाचताना मजा आली

शारीरिक दूरी व लॉकडाऊनच्या काळात ऑनलाईन प्रशिक्षण आणि विविध विषयांवरील वेबिनारनी डोकं भंडावून गेलं होतं. त्यात दि. २७ जूनचे साधना साप्ताहिक वाचून ग्रीष्माच्या वणव्यात थंड वाऱ्याची झुळूक यावी तसे वाटले. अंक सर्वार्थाने वाचनीय आहे. बोजड वैचारिक लेख वाचायला आणि पचायला वेळ लागतो, जड जाते. पण हा अंक एकहाती वाचताना मजा आली. 'आप'चे शिक्षणविषयक मॉडेल (संपादकीय) आणि समरहिलचा शैक्षणिक प्रयोग (नीलांबरी जोशी यांचा लेख) वाचून हुरूप आला. गांधीजींनी गारूड केलेल्या स्त्रियांवरील लेखात गांधीजींच्या स्वभावाचे विविध पैलू बघायला मिळतात. संजीवनी खेर यांची ही लेखमाला नक्कीच एका बेस्टसेलर पुस्तकाचे धन आहे. जिम कॉर्बेटवरील मनोज बोरगावकर यांचा लेख कॉर्बेटच्या पुस्तकांसारखाच रंजक आहे. वाघिणीला आकर्षित करण्यासाठी त्याने नक्कल केलेल्या प्रियाराधनेच्या डरकाळीची गोष्ट मजेदार आहे. उत्तराखंडमध्ये जन्मलेला, जंगल वाचणारा हा ब्रिटिश तेथील समाजजीवनाशी पूर्णपणे समरस झाला होता. त्यांच्या 'माय इंडिया'मध्ये अशी एक प्रातिनिधिक गोष्ट येते. अंधाऱ्या खोलीत एक म्हातारा पहुडलेला, आजूबाजूला गुदमरवणाऱ्या उदबत्त्याचा धूर, रडणारी–प्रार्थना करणारी आप्त मंडळींची गर्दी त्याच्या मरण्याची वाट पाहत असलेली जिमला दिसते. तो सगळ्यांना बाहेर पिटाळतो, खिडक्या उघडतो, धूर बंद करतो आणि एकाला धावत जाऊन दूध आणावयास पाठवतो. थोडे कोमट दूध पोटात गेल्यावर जिवात जीव आलेला तो म्हातारा पुढे तीन वर्षे जगतो. स्वर्ग–नरकापासून अलिप्त असा जन्म–मरणाचा वस्तुनिष्ठ अभ्यास म्हणजे काय, हे स्पष्ट करताना आम्ही ही गोष्ट सांगतो. साधनाच्या या अंकातील राज्यपालांच्या उचापतींबद्दल वाचून खानदानी राजेशाहीत मोडणाऱ्या या राज्यपालांच्या पदासंबंधी पुनर्विचार मांडणारा एक वैचारिक लेख पुढील अंकात यायला हरकत नाही.

**प्रभा पुरोहित,** मुंबई

## सगळाच अंक एका सूत्राने बांधलेला...

१३ जूनचा अंक वाचला. कृष्ण चंदर यांचं 'उघडा, दरवा जे उघडा' हे नाटक वाचलं. फारच सुंदर! साधं आहे, पण आजच्या काळाला (तर) ही अगदी उचित! संपादकीय वाचलं. तुमचं काम मोठं आहे. किती सायास घ्यावे लागतायत, कळतंय. सगळाच अंक एका सूत्रानं बांधलेला. माझ्या मोबाईल कान्टॅक्समधील सगळ्यांना पाठवला. आवडल्याचे मेसेज आलेत. 'खूप छान!' म्हणून. मराठीत हे नाटक नाही आलं मंचावर, पण साधनानं योग्यवेळी आणलं.

सआदत हसन मंटो वरील 'मंटो' सिनेमा बघितला असेल, त्यातील 'बोल के लब आजाद़ है तेरे... बोल जुबाँ अब तक तेरी है.' हे गीत त्याच्या काळात जेवढं गाजलं, तेवढंच आजही साद घालावी एवढं आवश्यक झालंय.

**वंदना साबळे,** चंदगड, जिल्हा कोल्हापूर

१०० व्या स्मृतिदिनानिमित्त
अभिवादन



(१८५६ ते १९२०)

१ ऑगस्टचा साधना अंक

# लोकमान्य टिळक

विशेषांक

**सहभागी लेखक**

कुमार केतकर
सदानंद मोरे
अरविंद गोखले
शैलेश माळोदे

८ ऑगस्टचा साधना अंक

# अण्णा भाऊ साठे

विशेषांक

**सहभागी लेखक**

राजन गवस
लक्ष्मीकांत देशमुख
राजा शिरगुप्पे
मनोहर जाधव

१०० व्या जन्मदिनानिमित्त
अभिवादन



(१९२० ते १९६९)

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP- 6 /31-12-2020
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Registration No. PCW/080/2018-2020
Posted at PUNE PSO GPO 411001 / EveryThursday, Date of Posting : 18-7-2020 / Date of Publication : 18-7-2020




२५ जुलै पासून
उपलब्ध

नवी आवृत्ती

एका महत्त्वाच्या पुस्तकाची

# साने गुरुजी

## व्यक्ती आणि विचार

चैत्रा रेडकर

पृष्ठे १६८ । किंमत १५० रुपये
सवलतीत १०० रुपये (ट.ख. ५० रु. वेगळा)

२०१० मध्ये या पुस्तकाची
पहिली आवृत्ती
श्री गंधर्व वेद प्रकाशन, पुणे
यांच्याकडून आली.
दुसरी सुधारित आवृत्ती
२०१७ मध्ये हर्मीस प्रकाशन, पुणे
यांच्याकडून आली.
आणि आता तिसरी आवृत्ती
साधना प्रकाशनाकडून आली आहे.

रूढ अर्थाने या संहितेचा ढाचा चरित्राचा नाही.
आयुष्यातील मैलाचा दगड मानावा
अशा घटनांनुरूप प्रकरणे पाडून
चरित्रनायकाच्या आयुष्याचा पट
कालक्रमणेनुसार उलगडून दाखवण्याचा
चरित्रलेखनाचा फॉर्म येथे वापरलेला नाही.
साने गुरुजींच्या आयुष्याच्या वेगवेगळ्या
टप्प्यावरील घटनांचा परस्परांशी मेळ घालत,
त्या घटनांना एकमेकांच्या प्रकाशात न्याहाळत
साने गुरुजींना आणि त्यांच्या भूमिकांना
समजून घेण्याचा आणि त्याद्वारे साने गुरुजींच्या
वैचारिक चारित्र्याचा पट उलगडण्याचा हा प्रयत्न आहे.
साने गुरुजींच्या आयुष्यातील अनेक घटनांचे
त्यांच्या अनेक चरित्र लेखकांनी
'गुरुजी संवेदनशील–भावनाप्रधान होते, भोळे होते,
हळवे होते' या प्रकारचे एकच स्पष्टीकरण
वारंवार दिले आहे. त्याच्या पलीकडे जाऊन
गुरुजी समजून घेण्याचा हा प्रयत्न आहे.

संपर्क
**साधना प्रकाशन**
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
Ph. 020 24459635
mediasadhan@gmail.com